
उ/८




हिमालयातील देवांची तपोभूमी

बदरीकेदार, पशुपतिनाथ, नेपाळ इ. प्रवास

- ना. तु. ठाकूर





हिमालयांतील देवांची तपोभूमी

□

लेखक : श्री. ना. तु. ठाकूर बी. ए.

(' ना. तु. बाग, ' ' जपान व अतिपूर्वेकडील देश '

इ. पुस्तकांचे लेखक)

□

पॅरॅमाउंट प्रकाशन ७३

किंमत रु. सहा

प्रकाशक :
श्री चा. ना. ठाकूर, बी. एससी. डी. बी. एम.
कार्यं संचालक :
पॅरेमाउट पब्लिसिटी सि. प्रा. लि.
४८१ शनिवार पुणे ४११०३०
फोन : ५६३६७

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन

मुद्रक :
अभयकुमार गंगाधर पाठक
अभय मुद्रणालय
४६१/१ सदाशिव,
पुणे ४११०३०

3/6

प्रस्तावनेदाखल

हिमालयातील देवांची त ोभूमी– उत्तराखंडयात्रा-या यात्रावर्णनाच्या पुस्तकाला प्रस्तावनेद ाखल चार शब्द लिहितांना मला आनंद वाटत आहे. हे हिमालयातील यात्रावर्णन आमचे मित्र प्रसिद्ध लेखक श्री. ना. तु. ठाकूर यांनी लिहिलेले ाहे. ते वर्तमानपत्राच्या व्यवसायात असल्याने लोकांना काय सा ा वे आणि थोडक्यात कसे सागावे-याचा त्यांना उत्तम सराव आहे त्याचा प्रत्यय हे छोटेसे प्रवास वर्णन वाचताना आल्याशिवाय राहात नाही. हे पुस्तक वाचल्याने घर-बसल्या हिमालयातील महत्त्वाच्या तीर्थक्षेत्रांची प्रत्यक्ष तीर्थ यात्रा केल्याची अनुभूती मिळेल अशी माझी खात्री आहे.

हिमालय हे भारतीयांच्या मनाला वेध लावणारे फार मोठे आकर्षण आहे. गंगा, यमुना या आमच्या जगाला पावन करण्याचे सामर्थ्य असलेल्या महानद्यांची उगमस्थानें हिमालयात आहेत. बदरीनारायण, केदारनाथ ही आमची सर्वश्रेष्ठ देवस्थाने बर्फाने वेढलेल्या हिमालयाच्या कुशीत आहेत. वाटेत पर्वत चढतांना सृष्टिसौंदर्याने यात्रेकरू भारल्यासारखा वेडा होतो. जागोजाग इतिहासपुराणातील कथांचे स्मरण देणारी स्थळे यात्रेकरूशी हितगुज करीतच राहातात. हरिद्वार कनखल, दक्षयज्ञस्थळ वगैरे स्थाने तर इतिहास सांगून जातात व अविस्मरणीय अशी पकड घेतात यात्रेहून आलेला मनुष्य पुढे कित्येक महिने यात्रेच्या स्मृतिविश्वात विहरत असतो.

हिमालयाच्या कैलासशिखरापासून रामेश्वरापर्यंत सर्व भारतभर आमची तीर्थक्षेत्रे पसरलेली आहेत' आम्ही तेथील यात्रा भक्तिभावाने करीत आहोत. जन्मात एकदा तरी लहानमोठी यात्रा घडावी अशी आमची इच्छा असते. शेवटही देवाचे नाव घेऊन गंगा मुखात घालून आम्ही देह ठेवतो अशी ही यात्रा संस्था आमच्या जीवनाचे अंग झालेली आहे स्त्री पुरुष, गरीब–श्रीमंत, उच्च-नीच सर्वांना ती करिता येते महाभारतादि आमचे धर्मग्रंथ पांडवादिकांच्या तीर्थ-यात्रांनी भरलेले आहेत पांडवादि थोर लोकांनी आपले देह हिमालयातच ठेवले. अशी आमची यात्रासंस्था ही जागृत संस्था आहे. तिची सेवा करण्याचे महत्वाचे राष्ट्रीय कार्य हे पुस्तक लिहून श्री. ना. तु. ठाकूर यांनी केले, याबद्दल त्यांना धन्यवाद देतो.

पुणे. सिद्धेश्वरशास्त्री चित्राव

तपस्विनी भगिनी गोदूताईस
' देवांची तपोभूमि ' अर्पण

–नाना

[श्री. लक्ष्मीबाई भागवत– गोदूताई– निवर्तल्याला बेचाळीस वर्षे झाली. नि. भा. आयुर्वेद विद्यापीठाच्या त्या पहिल्या स्त्रीवैद्या. इंदूर येथे भरलेल्या वैद्य संमेलनांत इन्फुलएंझावरील संस्कृतमधील निबंधासाठी त्यांना सुवर्णपदक मिळाले. खादी, आयुर्वेद इ. वरील लक्ष्मीबाईच्या निष्ठेमुळे त्यांच्या ' लक्ष्मी भेषजागारम् ' या दवाखान्याचे उद्घाटनास पूज्य कस्तुरबा गांधी आल्या होत्या. वृत्ति तपस्विनीची– पति निधनानंतर संस्कृत वैद्यक या विद्यात पारंगतता मिळवून जनसेवेत जिणे घालविले. निधन दि. १२–१२–१९३३ मुंबई]

हिमालयातील देवांची तपोभूमी
(उत्तराखंड यात्रा)



विरहव्यथेवर जेटयुगाचा तोडगा

प्रवास......आता सहासष्ट वर्षं पुरी झाली वयाला. पण गेली पाच तपं प्रवासाचा जो भोवरा लागला आहे माझ्या पायांना, त्यात अजूनही खंड पडन नाही. गतिमानता हे जीवनाचं सर्वश्रेष्ठ सूत्रच ठरलं आहे म्हणाना अस्मादिकांचे. खाण्या–पिण्याच्या आवडी निवडीप्रमाणे प्रवासाचे बाबतीतही ‘ भिन्नरुचिर्हि लोकः ’ असा येतो अनुभव ! प्रवास, यात्रा, सहली इत्यादी बाबतीत माझे काही मित्र आमच्यासारखे उत्साही तर काही स्नेह्यांच्या अंगावर प्रवास म्हटला की काटा उभा राहतो. अर्थात ज्याची त्याची रुचि समजून मी सध्याच्या लोकशाही जमान्यात या प्रश्नावर वाद टाळतो.

' केल्याने देशाटन पंडित—मैत्री, सभेत संचार ' ही काव्यपंक्ति आता चावून चोथा झाली आहे. प्रवासाच्या आवडीबरोबर पैसा हीही महत्त्वाची बाब. पण ' पंडित मैत्री अन् सभेत संचार ' यांचे लक्ष्मीशी साधारण जुळते नसल्यामुळें मजेसाठी सहली करणारांना या गोष्टींच्या लाभाची वानवाच–किंबहुना Far from the madding crowd जाण्यासाठी आणि निसर्गाच्या सान्निध्यात मनाला तेवढाच विरंगुळा वाटावा याकरिता सहलीचे सव्यापसव्य करणारे थोडे नाहीत. ज्या काळात पंडितांना मान होता त्यांना शोभणारा आहे देशाटनाचा वर लिहिलेला लाभ. पण आजकालचे बहुसंख्य प्रवासी या फायद्याची क्वचितच अपेक्षा करतात.

तरीही कूपमंडूक वृत्ती जाऊन खळखळणाऱ्या प्रवाहात संचार करण्याची संधी प्रवासाने मिळते हे त्याला नाक मुरडणारी मंडळीही मान्य करतील. सुभाषितकारांनी तर स्पष्ट अभिप्राय दिला आहे की,

योन संचरते देशान् यो न सेवेत पंडितान् ।
तस्य संकुचिता बुद्धिः घृतबिन्दुरिवाम्भसि ॥

तात्पर्य पाण्यावर तुपाचा थेंब टाकला तर तो जसा वेगळाच राहतो तशी या मंडळींची समाजापासून काहीशी फटकून वागण्याची वृत्तीच प्रतीत होते.

शेक्सपीअरने एका पात्राकरवी तरुणांना भ्रमंतीचा जो पुढील उपदेश केला आहे तो उचितच म्हणावा लागेल–

Home keeping youth have ever homely wits
I would rather entreat thy company
To see the wonders of the world abroad
Than, living dully sluggardized at home,
Wear out thy youth with shapeless idleness.

पण हेही तितकेच खरे की, प्रवास किंवा सहली करताना चौकस दृष्टी, बौद्धिक उंची आणि मानसिक प्रगल्भता नसेल तर ह्या ' यातायातेतून ' (हिंदी अर्थानेही) म्हणण्यासारखा फायदा होणार नाही. मूर्ख प्रवाशावर जी. व्हिटनेने पुढील कोरडा ओढला आहे–

The fool that far is sent,
Some wisdom to attain,
Returns an idiot, as he went
And brings the fool again.

तसं म्हटलं तर अगदी जुन्या काळापासून प्रवाशांबद्दल कौतुक आणि प्रवासामुळे होणाऱ्या फायद्यांची रसाळ वर्णने वाचावयास मिळतात. मात्र काळाच्या या ऐतिहासिक पर्वात प्रवासाचे एकाधिकार कंत्राट पुरुषांनाच मिळाल्यासारखे दिसते. ह्यूएनशाँग, अल्बेरूनी, झेव्हिअर इ. मातब्बर परदेशीय सोडले तरी अगदी अलीकडचे महाराष्ट्रात गोडसे भटजी आणि अर्वाचीनात प्रा गो. चि. भाटे यांची नावे सहज डोळ्यापुढे येतील. पूर्वीच्या काळात तरी प्रवास हा छंद पुरुषांचाच आढळतो, आणि त्यामुळेच 'पति गेले ग परदेशी' म्हणून उसासे टाकणारी प्रोषितभर्तृका नायिका लक्ष वेधून घेत असे. नेमक्या याच घटनेवर पुढील श्लोकात बोट ठेवण्यात आले आहे–

तीर्थानामवलोकनम् परिचयः सर्वत्र वित्तार्जनम् ।
नानाश्चर्यनिरीक्षणं, चतुरता बुद्धः प्रशस्ता गिरः ॥
ये ते सन्ति गुणाः प्रवासविषये दोषोऽस्ति चैको महान् ।
यन्मुग्धामधुराधराधरसुधापानं विना स्थीयते ॥

प्रवाशाला प्रेयसीच्या अधरपानापासून वंचित व्हावे लागते, म्हणून हा रसिक कवि हळहळतो. पण आजच्या 'जेट युगात' प्रवाशाला कोणती आकर्षणे झाली आहेत याची बिचाऱ्याला त्याच्या काळात कशी कल्पना असणार ? विविध विमान कंपन्यांच्या जाहिरातींत नाजुक ललनांच्या अदाकारीने आमचे वरील कविवर्य आज हयात होते तर निश्चितच भांबावून गेले असतें प्रवासाच्या निमित्ताने मधुमीलनाचे चॅन्स घेण्यास तसं म्हटलं तर काही स्त्रियाही मागेपुढं पहात नाहीत आणि चालू आंतरराष्ट्रीय महिला वर्षांत तरी त्यांचा हात कोण बरं धरणार ?

आतापर्यंत लक्षावधि मैलांचा माझा प्रवास झाला तो निरनिराळ्या निमित्तांनी. मुख्यत्वेकरून व्यवसायासाठी, कधी कधी

व्याख्यान वा परिषदांच्या आमंत्रणावरून, वडिलमंडळींना यात्रा घड- विण्यासाठी, शेतकऱ्यांच्या सान्निध्यात भारतदर्शन, खास मोटारीतून लांब लांबचे दौरे इत्यादी प्रवासाचे अनेक योग आले. ' निमित्त शोधीत असता प्रवासासाठी ' अशी टीकेची फेकही माझेवर कधी घरातून होई, पण हसण्यावर भागवून नेई मी. परंतु या पूर्वी व्यावसायिक यात्रा कंपनीतून प्रवास केला नव्हता मी. तेव्हा यंदाच्या बदरीकेदार–पशुपतीनाथ इत्यादी यात्रेसाठी श्री चंडिका यात्रा कंप- नीच्या सहलीत मी सामील झालो सहकुटुंब, ही ' श्री चंडिकेची इच्छा ' म्हणावयाची नाही तर काय ?


' देवतात्मा ' हिमालयाच्या वाटेवर

या यात्रेतील पहिला खंड हृषिकेश पर्यंतचा. पुण्याहून निघाल्या- वर झाशी, ग्वाल्हेर, आग्रा, मथुरा, दिल्ली, हरिद्वार इत्यादी शहरांना मी अनेकदा भेटी दिल्या आहेत. या शहरातील काही प्रेक्षणीय स्थळां- बद्दल मी पूर्वी लिखाणही केले असल्याने त्यासंबंधी पुनरुक्ति नको म्हणून फक्त आमच्या मार्गांचा उल्लेख केला.

हरिद्वार–हृषिकेशपासून आपल्याला हिमालयाच्या जवळपास आल्याचा प्रत्यय येऊ लागतो आणि प्रस्तुत यात्रेत सामील होण्याचा माझा उद्देश हिमालयीन उत्तराखंडात मनमुक्त संचार करता यावा हाच. दीपमालेच्या नियमित वाचकांना काश्मीर दर्शनात हिमालयाच्या स्वरूपाची एक झलक दिली होती मी ती त्यांच्या स्मरणात असेलच. सिमला, दार्जिलिंग इ. हवा खाण्याच्या ठिकाणी पाहिलेला हिमालयही आगळयाच शोभेचा–तेव्हापासून हिमालयाच्या अगदी पोटात शिर- ण्याची आकांक्षा मनात ठाण मांडून होती. तिची तृप्ती या यात्रेच्या निमित्ताने व्हावी असा संकेत होता म्हणायचा.

हिमालयातील निसर्ग आणि त्यातील अध्यात्म कविकुलगुरु कालिदासाने कुमारसंभवम् या महाकाव्यात इतका आत्मीयतेने व रसिकतेने प्रगट केला आहे की त्याला तोड नाही. या काव्याच्या सुरुवातीच्याच––

हिमालयातील



महामंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांच्या समवेत हिमालयातील यात्रांसाठी निघालेली मंडळी

अस्त्युत्तरस्यां दिशि देवतात्मा हिमालयो नाम नगाधिराजः ।
पूर्वापरौ तोयनिधावगाह्य स्थितः पृथिव्यामिव मानदण्डः ।।

पंक्तींनी भारतवर्षाच्या संस्कृतीतील हिमालयाचे आगळे स्थान प्रगट होते. 'देवतात्मा' या विशेषणाने देवदेवतांची तपोभूमी मानलेल्या हिमालयाकडे अध्यात्माच्या वाटेवरील साधक का आकर्षिले जातात ते स्पष्ट होते.

दोन्ही बाजूच्या सागरांमधील आपल्या उत्तर सीमेवर खडा पहारा करणाऱ्या हिमालयास 'पृथ्वीचा मानदंड' व्यतिरिक्त अधिक सार्थ नामाभिधान ते कोणते ?


तसं म्हटलं तर हरिद्वारपासून हिमालयाचा ध्यास सुरू होतो. गंगेचे विशाल स्वरूप हरिद्वारला प्रत्ययास येते, आणि हरीच्या पायरीवर आपण जरी ध्यानमग्न झालो तरी या क्षेत्राची अधिष्ठात्री देवता गंगाच म्हणावी लागेल.

साहजिकच गंगेच्या घाटालगत खुद्द गंगेच्या देवळाकडे भाविक आकर्षिले जातात यात नवल नाही. पण खरी मौज येते ती सायंकाळी नौकेच्या आकाराचे फुलांचे द्रोण व त्यात तुपाच्या वातीचे दिवे लावून ते गंगेच्या संथ ओघात सोडताना ! इकडे आरती म्हणताना झांजा व अन्य वाद्यांचा निनाद चालू असताना नदीच्या पात्रात दोन्ही बाजूंनी दीप विसर्जनात हजारो स्त्री–पुरुष मग्न दिसतात. 'सहस्र दीप उजळलेले' प्रवाहातून संथपणे दूरवर जाताना पाहून डोळ्यांचे पारणे फिटते.

हरिद्वारचे प्राचीन नाव मायापुरी तसेच गंगाद्वार असल्याचे आढळते. हिमालयाच्या पहाडी प्रदेशातून गंगा हरिद्वारला मैदानात (समुद्रसपाटीपासून ९२४ फूट) खाली येते आणि नदीच्या प्रवाहाचा दुसरा टप्पा सुरू होतो, हे हरिद्वारचे महत्त्वाचे आणखी एक कारण. उत्तरा खंडातील यात्रांना हरिद्वारपासूनच सुरुवात होते. साक्षात श्री विष्णू बदरिकाश्रमास हरिद्वारमार्गेच गेले असा पुराणांतरी उल्लेख आहे. भागवताची मूळ कथा मैत्रेय मुनीकडून

विदुराने या क्षेत्रातच ऐकली. पद्मपुराणात हरिद्वार या क्षेत्रातील गंगास्नानाने मिळणाऱ्या पुण्याचा उल्लेख आहे.

हरिद्वारला 'देवालयांचे शहर' म्हणण्यास हरकत नाही आणि देवळांची उत्तरोत्तर तेथे भरच पडत आहे. हरिद्वारला तशी माझी चवथ्यांदा भेट पण प्रत्येक खेपेस मुक्काम मर्यादित असल्यामुळे दर वेळेला काही नवीन स्थळे पाहण्याचे समाधान मिळतें. मृत्युंजय महादेवाच्या चतुर्भुज संगमरवरी मूर्तीचे दर्शन घेऊन आम्ही कनखल



कनखलक्षेत्र :
गंगाकिनारे

क्षेत्री गेलो. ज्या ठिकाणी दक्षप्रजापतीने यज्ञ केला व सतीने अग्नी-कुंडात प्रवेश केल्याने ती भस्म झाली ते स्थान पाहताना पुराणांत-रीच्या पवित्र स्मृती जागृत होतात. कनखल येथील गंगास्नानाचे पुढील वर्णन ऐकून मी तेथे अगत्याने स्नान केले.


हरिद्वारे कुशावर्ते बिल्वके नीलपर्वते,
स्नात्वा कनखले तीर्थे पुनर्जन्म न विद्यते ।

आतापर्यंत इतक्या तीर्थस्थानी सचैल स्नाने केली आहेत मी की मनात आलं तरी पुनर्जन्म येऊ नये मला !

हरीच्या पेढीवर ब्रह्मकुंडाच्या आसपास मानसादेवी, गंगाधर महादेव, राधाकृष्ण, सीताराम इत्यादी कितीतरी मंदिरे आहेत. राजा भर्तृहरीने (बहुतेक वैराग्य शतक लिहिलेल्या वयात असावे) येथेच तपश्चर्या केली असे म्हणतात व त्याच्या स्मरणार्थ शेदीडशें पायऱ्यांचा उंच घाट बांधण्यात आला असे सांगितले जाते.

हरिद्वारची वैशाखी यात्रा मोठीच प्रेक्षणीय असते. शहराला मीं प्रथम भेट दिली ती याच मोसमात. हिंदूंच्याप्रमाणे पंजाबी शीख स्त्री–पुरुषांची या यात्रेला इतकी प्रचंड गर्दी होते की, आगगाड्यांच्या टपावरून कित्येकांना प्रवास करावा लागतो.

श्रीदक्ष–यज्ञ कुंड कनखल




भगवान विष्णूंचा महिमा-ऋषिकेश

हरिद्वारचा मुक्काम आटोपून आम्ही ऋषिकेशला आलो आणि रेल्वे प्रवासाचे अखेरचे टोक गाठले. वाटेत रशियाच्या सहकार्याने चालू झालेला अँटीबायोटिक्सचा कारखाना वीरभद्र येथे दिसतो. हरिद्वार-पासून उष्णतामान उतरू लागले व ऋषिकेशला मे महिन्यातही गारवा

भासू लागल्याने प्रसन्न वाटू लागले. हरिद्वारपासून ऋषिकेशला आणखी दोनशे फूट उंचावर आलो आपण.

भागीरथीच्या दक्षिण तीरावर चारी बाजूंना पर्वतराजी असलेले ऋषिकेश मोठे मनोहारी शहर. स्टेशन यार्डात कितीतरी यात्रा कंपन्यांचे प्रवासी डबे, प्रवासी यात्रा करून परत येईपर्यंत ताटकळत असलेले आढळतात. खुद्द ऋषिकेश पहायला एक दोन दिवस पुरतात. पण पुढे केदारेश्वर, बदरीनाथ किंवा गंगोत्तरी–जम्नोत्तरीला जावयाचे तर सात आठ दिवसांचा अवधी लागतोच.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे
११३८ सदाशिव पेठ, पुणे ३०



ऋषिकेश :
नावेतून
पैलतीराकडे

हजारावर रेल्वे प्रवासी तरी या आराम करणाऱ्या डब्यांतून आपली पुष्कळशी चीजवस्तू ठेवून पुढे यात्रा करीत असतात. त्या मानाने बंदोबस्तास रेल्वे पोलिसांची संख्या बेताचीच. अलीकडेच एका अगदीच बाजूला पडलेल्या डब्यावर दरोडा पडून यात्रेकरूंची लूट झाल्याचे वृत्त वाचकांच्या नजरेस आले असेल. अधिक सुरक्षिततेची तरतूद हवी.

रैभ्य नावाचा ऋषि येथे तपश्चर्या करीत होता. त्याला उपसर्ग देणाऱ्या मधुकैटभादि दैत्यांचा भगवान विष्णूंनी येथे नाश केला, असे स्कंद पुराणात म्हटले आहे. या घटनेमुळे ऋषिकेश नाव पडले

या क्षत्राचे. रैम्य मुनींना साक्षात विष्णूंनी दर्शन देऊन त्यांचा उद्धार केला. रैम्य शरीराने कुबडे होते म्हणून 'कुब्जाभ्रक' अशीही संज्ञा या क्षेत्राला मिळाली. येथील ऋषिकुंड या रैम्य मुनीवरच प्रतिष्ठा पावले आहे. श्री रामचंद्रजींनी रावणाचा वध केल्यामुळे ब्रह्महत्येचे जे पातक लागले, त्याच्या क्षालनार्थ या पवित्र भूमीत त्यांनी तपश्चर्या केली. श्री रामचंद्रजी व सीतामाई यांची सुंदर मंदिरे ही ऋषिकेशची भूषणे आहेत. भरत मंदिर, चंद्रेश्वर महादेव, वाराह भगवान, सोमेश्वर महादेव इत्यादी देवालये भाविकांना आपल्याकडे खेचताना आढळतात.

लक्ष्मणानेही रामाप्रमाणे इंद्रजित् वधाच्या पापक्षालनार्थ येथे तपश्चर्या केली असे ऋषिकेश महात्म्यात वाचावयास मिळते. शेषाचे रूप धारण करून या जागी लक्ष्मणजी स्थित झाले अशी लोकांची श्रद्धा आहे.

पोलादी तारांचा झुलता पूल 'लक्ष्मणझूला' आधुनिकांनाही कौतुकास्पद वाटतो. कित्येक यात्रेकरू नावेतून नदीपार होतात. पलीकडच्या तीरावरील सीताकुड, साधु आश्रम, गीता भवन, स्वर्गाश्रम इत्यादी स्थळे प्रबोधन करणारी तितकीच प्रेक्षणीय आहेत.

उत्तर भारतात किंवा उत्तराखंडात यात्रा करणाऱ्यांपैकी कोणी 'काली कमलीवाला' हे नाव ऐकले नसेल असे वाटत नाही. महाराष्ट्रातील संत गाडगे महाराजांप्रमाणे बाबा कालीकमलीवाला ही एक थोर विभूती होऊन गेली. श्री १०८ स्वामी विशुद्धानंदगिरी यांनी बद्रीनाथ येथे तपश्चर्या केली व तीमधून प्रेरणा मिळाल्याप्रमाणे त्यांनी उर्वरित आयुष्यात यात्रिकांच्या सेवेसाठी मोठमोठ्या योजना तयार करून त्या सिद्धीसही नेल्या. देशातील दानशूर धनवंतांचे लक्ष आपल्या उद्दिष्टाकडे वेधून धर्मशाळा, सदावर्ते, दवाखाने, पाठशाळा इत्यादी विविध स्वरूपाचे सेवाप्रकल्प त्यांनी कार्यवाहीत आणले. लक्षावधी रुपये धर्मदायासाठी मिळविले तरी बाबांची राहणी अत्यंत साधी होती. पांघरायला काळे कांबळे ते वापरत त्यावरून नाव पडले त्यांचे काळी कांबळीवाला बाबा. विशुद्धानंदजी संवत १८६७ मध्ये

स्वर्गवासी झाले. त्यांचे शिष्य स्वामी रामनाथ व स्वामी आत्मप्रकाश यांच्यात विक्षेप निर्माण झाला. काली कमली पंचायती क्षेत्राच्या कारभाराची सूत्रे स्वामी रामनाथांच्या हाती आली. तिचे मुख्य केंद्र ऋषिकेशला आहे. ते निवर्तल्यावर बाबा मनीरामजी प्रस्तुत कार्य संभाळीत आहेत.

पण स्वामी आत्मप्रकाश यांनी काली कमली बाबा स्मरणार्थ याच स्वरूपाची दुसरी जबरदस्त संस्था 'स्वर्गाश्रम' काढून उत्तम यश मिळविले. स्वर्गाश्रमाच्या वास्तू, देवालय, पाठशाळा इत्यादी भारतीय संस्कृतीचे प्रबोधन प्रभावीपणे करतात.

मानव कल्याण आश्रमाकडील अर्धनारी नटेश्वराच्या प्रतिमेखाली रेखाटण्यात आलेला पुढील श्लोक वाचून गंमत वाटली—

यस्याग्रे च द्राड द्राड द्रुकुटि निनादम् ।
डान्सं डान्सं डिडान्सं डुहडुहडुकृतम् चाम्पकं चाम्पकानाम् ।।
त्रैडं त्रैडं त्रितैडं त्रिखुखु खुखखं खंखखं: खंखखंख: ।
वाद्येपंचप्रभावात् अखिलमिदं धराम् पातु न: शूलपाणि: ।।

नटराजाच्या नृत्यशाळेत आधुनिक 'डान्स' चाही अंतर्भाव झाला म्हणावयाचा !

पुराणकालीन घटनांचे विराट दर्शन

हरिद्वार–ऋषिकेशपासून पुढे हिमालयाच्या मंदिरातील केदारनाथ, बदरीनारायण, गंगोत्तरी, जम्नोत्तरी व त्या रस्त्यावरील बहुविध तीर्थे आणि देवालये ही या उत्तराखंडातील अलौकिक विशेषता ! आर्यांची अगणित दैवते, महाभारत, रामायण, भागवत, पुराणे एवढेच नव्हे तर अपौरुषेय वेद यात वर्णिलेल्या अविस्मरणीय महान व्यक्ती व देवता, तसेच रोमांचकारी घटनांचा मागोवा दाखविणारी स्थळे, इत्यादींचे हे उत्तराखंड विराटदर्शनच म्हणाना ! पुरा तत्त्व संशोधकांनी या प्राचीनतम भूप्रदेशासंबंधी विशेष संशोधन करून सत्य व किंवदन्ती यांचे पृथक्करण हंसक्षीर न्यायाने करणे अगत्याचे ठरेल.


ऋषिकेश स्थानकावरील सायडिंगला टाकलेल्या आमच्या डब्यात आपले बरेचसे सामान ठेवून व आठवड्याच्या यात्रेसाठी आवश्यक तेवढ्याच गोष्टी बरोबर घेऊन आम्ही दिनांक २० मे १९७५ रोजी हिमालयीन यातायात कंपन्यांच्या बसेस केल्या व ऋषिकेशच्या मोटारस्टँडवरून आगेकूच केली. ऋषिकेशहून हिमालयातील अन्य यात्रांसाठी बसेस जातात यामुळे हा परिवहनाचा धंदा जोरात चालू आहे येथे.

ऋषिकेश सोडल्यावर दोन किलोमीटर अंतरावरील मुनीकेरेती-पासून गंगोत्तरी-जम्नोत्तरी आणि बदरीकेदार हे मार्ग वेगवेगळे होतात. केदारनाथच्या रोखाने आम्हास जावयाचे असल्यामुळे ऋषिकेशहून त्या दिशेने बसचा मार्ग संपतो त्या सोनप्रयागकडे आम्ही थेट निघालो.

प्रथम अलकनंदाच्या डाव्या किनाऱ्याने आमची बस चढत होती पण लक्ष्मणझूला पार करताच ती उजव्या किनाऱ्याने जाऊ लागली. ऋषिकेशपासून २७ किलोमीटरवर व्यासी गाव लागते. आणि तेथून ३८ किलोमीटरवर आपण ' देवप्रयागला ' पोहोचतो. गंगा-यमुनेच्या संगमावर महाक्षेत्र प्रयाग सर्वांच्या परिचयाचे; पण प्रयाग म्हणजे संगम हे फार थोड्यांना माहीत. केदारकडे जाताना पहिला संगम पहायला मिळतो तो देवप्रयाग येथे. गंगोत्तरीहून निघालेली भागीरथी व अलकापुरीहून मार्गस्थ झालेली अलकनंदा यांचा १००० फूट उंची-वरील या क्षेत्रातील संगम मन प्रसन्न करतो. या संगमानंतर नदीला गंगा हे नामाभिधान मिळते.

प्राचीन काळी देवशर्मा यांनी या क्षेत्री महान तपस्या केली. तिची आठवण म्हणून प्रभु रामचंद्रांनीं या शहराचे नाव देवप्रयाग ठेवले अशी आख्यायिका आहे. श्री रघुनाथांचे मंदिर हे देवप्रयागचे एक वैभवच.

येथून जवळच खांडव व अलकनंदा नद्यांचा संगम केदारनजीक पहाण्यास मिळतो. महाभारतात वर्णिलेले खांडववन तेथून जवळच आहे.


केदारनाथ बद्रीनाथ यात्रा,
मार्गदर्शक-नकाशा
उ
पू
द
प
बद्रीनाथ
हनुमानचट्टी
विनायकचट्टी
पांडुकेश्वर
विष्णुप्रयाग
जोशीमठ
सिंहधारा
केदारनाथ
रामवाडा
गौरीकुंड
सोनप्रयाग
त्रिजुगीनारायण
रामपूर
फाटा
भ्यूंग
नाला
उखीमठ
गुप्तकाशी
कुंड
चंद्रापुरी
अगस्त्यमुनी
बेलाकुची
पिपलकोटी
चमोली
नंदप्रयाग
कर्णप्रयाग
रुद्रप्रयाग
श्रीनगर
कीर्तिनगर
देवप्रयाग
मुनीकीरेती
ऋषिकेश
हरीद्वार
लाकसर
सहारनपूर
मिरत
अंबाला
कुरुक्षेत्र
दिल्ली
रेल्वे मार्ग
मोटार-बस मार्ग
पायदल मार्ग

शंकराने रूप धारण केलेल्या किराताशी अर्जुनाने घनघोर युद्ध केले. अखेर भगवान शंकर प्रसन्न होऊन त्यांनी अर्जुनाला पाशुपतास्त्र दिले. तो रोमांचकारी प्रसंग या ठिकाणी घडला असे म्हणतात. किरातार्जुनीयात भारवीने महादेवाशी त्याच्या भक्ताने केलेल्या लढाईचे वर्णन मोठे अर्थपूर्णच !

श्रीनगर— बिल्वकेदारपासून थोडयाच अंतरावर श्रीनगर येते. काश्मीरची राजधानी श्रीनगर सर्वश्रुत पण गढवाल राज्याची राजधानी असलेले हे श्रीनगर यात्रेच्या निमित्ताने इकडे येणाऱ्याला प्रथमच माहीत होते या १७०६ फूट उंचीवर असलेल्या पर्वतीय शहरातील श्री कमलेश्वर महादेवाचे मंदिर जितके रमणीय तितकाच त्या मागील पुराणांतरीचा कथाभाग हृदयस्पर्शी. प्रभु रामचंद्रांनी लंका दिग्विजयानतर येथे तपस्या आरंभली व शिवांना सहस्र कमळे अर्पण करण्याचा संकल्प ते पार पाडू लागले. श्री रामचंद्रजींची परीक्षा पहाण्यासाठी शंकरांनी त्यातले एक कमळ चोरले. एक कमळ कमी झाल्याचे राम प्रभूच्या लक्षात येताच आपलें नेत्रकमल काढून शंकरास वहाण्यास ते उत्सुक झाले. श्री रामचंद्रांच्या भक्तीवर शंकर प्रसन्न होऊन त्यांनी श्रीरामांना साक्षात दर्शन दिले असा आहे या कमलेश्वर महादेवाच्या मागील इतिहास !

श्रीनगरमधील भगवान विष्णूचे मंदिर पुरातन आहे. विश्वमोहिनीच्या रूपावर देवर्षि नारद लुब्ध झाले आणि तिचे स्वयंवराचेवेळी नारदांनी विष्णूकडे त्यांच्यासारखे रूप आपणास मिळावे अशी प्रार्थना केली. पण विष्णूंनी नारदाची थट्टा करण्यासाठी त्याचा चेहरा वानरासारखा केला आणि स्वत:च विश्वमोहिनी पटकावली ! नारद क्रुद्ध झालें आणि त्यांनी विष्णूला शाप दिला की, त्यांना स्त्रीवियोग सहन करावा लागेल व अखेर वानराकडूनच त्याला त्याची पत्नी मिळेल. रामावतारी भगवान विष्णूंना दाखला घ्यावा लागला या शापाचा !

श्रीनगरपासून तीन मैलावर 'सुकर्मा चट्टी' येते. येथे व्यास मुनींचा मुलगा शुक यांनी महान तप आचरले होते.

श्रीनगरपासून ३४ किलोमीटरवर येते रुद्रप्रयाग. (उंची २००० फूट) येथे संगम होतो मंदाकिनी अन अलकनंदा या नद्यांचा. आणि केदारनाथ व बदरीनारायणला जाण्याचे वेगवेगळ रस्ते येथूनच फुटतात. अलकनंदेचा पूल ओलांडून केदारनाथकडे मंदाकिनीच्या किनाऱ्याने रस्ता गेला आहे; तर बदरीनारायणकडे जाणारा रस्ता अलकनंदेच्या बाजूबाजूने जातो 'बदरीकेदार' अशी जोड संज्ञा प्रस्तुत यात्रेला दिली जात असली तरी प्रथम केदारनाथजींचे दर्शन घेणे शास्त्रविहित आहे. अर्थात कट्टर वैष्णव केदारनाथाकडे न जाता बदरीनारायणकडेच मोर्चा वळवितात हे सांगणे नलगे !

अनेक देवालये या क्षेत्री आहेत पण संगमावरील रुद्रेश्वर महादेव विशेष उल्लेखनीय. नारदांनी याच ठिकाणी सगीत विद्या समूळ हस्तगत करण्यासाठीं श्री शंकराची उपासना केली. शिवजी प्रसन्न झाले व त्यांनी नारदाला संगीताच्या रहस्याची शिकवण दिली असा केदारखंडात उल्लेख आहे. पहाडातील येथला एक बोगदाही वैशिष्टयपूर्ण आढळतो.

रुद्रप्रयागहून आणखी हजार फूट चढल्यावर 'अगस्तिमुनी' गाव लागते. समुद्र प्राशन केल्याच्या पापाचे प्रायश्चित्त तपश्चर्या करून अगस्ति मुनींनी या ठिकाणी घेतले, म्हणून अगस्ति मंदिर उभारण्यात आले आहे या गावी. अगस्ति मुनींची तांब्याची मूर्ती लखलखत उठून दिसते.

गुप्तकाशी

आणखी दीड हजार फुटांची चढण घेतल्यावर आपण गुप्त काशीला येतो. या गावास 'गुप्त वाराणसी' अशीही संज्ञा आहे. येथेही विश्वेश्वर मदिर व मणिकर्णिका नावाचे कुंड आहे. तेथील पंड्यास सुक्या नारळातून गुप्तदान द्यावे लागते असा प्रघात आहे. ४५०० फूट उंचीवर हे स्थान असून चंद्रेश्वर महादेवाची ऋषिमुनींनी येथे आराधना केली. गुप्तकाशीतील शिवलिंग स्वयंभू आहे. येथून जवळच गरुडाचे मंदिर आहे. आणखी एका देवळातील नदीवर आरूढ झालेली अर्धनारी नटेश्वराची मूर्ती काहीशी असामान्यच वाटते.

याच क्षेत्राचा उल्लेख पुराणांतरी गुप्त वारासणी असा करण्यात आलेला आहे. मनकर्णिका कुंडात स्नान केल्यावर पुढील प्रवास करण्यास तरतरी आली आम्हाला !



गुप्तकाशी श्री विश्वेश्वर मंदिर

केदारमार्ग सोडून मंदाकिनीच्या पलिकडच्या तीरावर उखीमठ वसले आहे. बाणासुराची कन्या उषा व श्रीकृष्णाचा नातू अनिरुद्ध यांच्या विवाहाचे पूर्वी सुर असुरांच्या सैन्यात मोठे युद्ध झाले ते याच ठिकाणी अशी आख्यायिका.

बाणासुराने श्री शंकरांना प्रसन्न करण्यासाठी मोठे तप आचरले या पवित्र भूमीत. बाणासुर, अनिरुद्ध व पंचमुखी महादेव यांच्या मूर्ती

येथील देवालयात आढळतात. श्री केदारनाथांची उत्सवमूर्तीची पूजा-अर्चा सदर देवालय हिमाने व्याप्त झाल्यावर उखीमठातच केली जाते.

गुप्त काशीपासून दीड मैलावरच नालाचट्टी येते. नल नृपतीने वनवास काळात या ठिकाणी तपश्चर्या केली भगवती देवीची. साहजिकच येथील नल–दमयंतीचे मंदिर यात्रिकांना पुराणांतील नल–दमयंतीच्या कथेची आठवण करून देते.


पुढे वाटेत नारायण कोटिही (भेळगाव) लागते. मोहिनी–भस्मासुराची अघटित घटना या ठिकाणी घडल्याची आख्यायिका. साहजिकच येथे शिव व विष्णू या दोघांचीही मंदिरे आहेत.

सोनप्रयागला आमच्या बसेस सोमवार दि. २० मे रोजी सायंकाळी पोहोचल्या. आता गारठा चांगलाच भासू लागला होता. ऋषिकेश ते सोनप्रयाग प्रवास १४२ मैलांचा व तोही पहाडी मुलुखातून नदीचा मागोवा घेत जाणारा असल्याने प्रवासी मंडळी थकून जातात. शिवाय मोटर प्रवासास येथेच विराम पडत असल्याने व दुसरे दिवशी भल्या पहाटे पायी वा अन्य साधनांनी यात्रा पुढे चालू ठेवायची असल्याने नवखे यात्रेकरू काही चिंताग्रस्तच असतात. त्यामुळे सोनप्रयागला रात्रीचा मुक्काम अपरिहार्यच.

नदीच्या कडेला लाकूड व बांबूंची झोपड्यावजा घरे निवासासाठी असल्यामुळे कशी तरी सोय करून घ्यावी लागते. अर्धनिद्रिस्त यात्रेकरूना खालूनच वहाणाऱ्या मंदाकिनीच्या जलप्रवाहाचा निनाद आगळीच गुंज घालतो, आणि क्षणभर असाही भास होतो की, मंदाकिनी आपल्या बालकांना झोपविण्यासाठी अंगाई गीत म्हणते आहे !

सकाळी आम्हा प्रवाशांच्या तीन–चार तुकड्या झाल्या. पदयात्रा करणारे, कंडीतून वाहकाच्या पाठुंगळीवर बसणारे, घोड्यावर स्वार होणारे, तर चार भारवाहकांच्या दांडीतून जाणारे पालखी पदस्थ. सोनप्रयागला आल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळसाठी आम्ही नोंदणी फी भरून पुढील प्रवासाकरिता स्वतःकरता घोडं, पत्नीसाठी कंडी राखून ठेवली व काहीसे निश्चित झालो. पण सकाळी पहातो तो

कशाचाच पत्ता नाही ! आमच्या बरोबरीच्या काही मंडळींनी अगोदर आगेकूच केले. शेवटी आदल्या दिवशीच्या नोंदीकडे कानाडोळा करून आम्ही दोघांनी मिळाल्या त्या कंड्या घेतल्या व त्रिजुगीनारायणकडे निघालो. ८००० फूट उंचीवर आहे हे स्थान. शंकर-पार्वतीचा विवाह येथेच झाल्याचा महाभारताच्या अनुशासन पर्वात उल्लेख आहे. त्यावेळी झालेल्या लाजाहोमाचे अग्निकुंड तीन युगे प्रज्वलित अवस्थेत टिकवण्यात आल्याचे सांगण्यात येते. बहुतेक यात्रे-




त्रिजुगीनारायण

करू तेथे विकत मिळणारे एखादे दुसरे लाकूड या अग्नीत टाकतात. आम्हीही तसे करून अग्निनारायणास नमस्कार केला. तत्पूर्वी रुद्रकुंडात स्नानविधीही उरकला. मुख्य देवालयात सिंहासनावर श्री

विष्णूंची मूर्ती अधिष्ठित असून त्याचे दोन्ही बाजूंना सरस्वती व लक्ष्मीच्या सुंदर मूर्ती दिसतात.

त्रिजुगीनारायण ओवरीत आम्ही फराळ वगैरे आटोपून तेथून दीड मैलावर असलेल्या शाकंभरी देवीच्या दर्शनास गेलो. भगवतीने या ठिकाणी फक्त भाजीपाला सेवन करून घोर तपश्चर्या केली म्हणून या देवींला शाकंभरी म्हणतात.

ही देवदर्शने झाल्यावर कंडीवाल्यांनी आम्हाला सोनप्रयागकडे नेले. मंदाकिनीचे पुलाकडे आलो आम्ही व आता केदारेश्वराच्या रस्त्याने मार्ग आक्रमायचा तो मला वाहणारा गढवाली कंडीवाला थकून गेला व दुसरी व्यवस्था करा असे म्हणाला. आली का पंचाइत! पण सुदैवाने वरून एक घोडेवाला मोतद्दार येत होता. व त्याने घोड्यावरून पुढे नेण्याचे कबूल केल्यामुळे आमची अडचण भागली.



सोनप्रयाग

पहाडातून उड्या मारीत येणारी मंदाकिनी

कंडीवाल्यांनी ११० पौंडापर्यंत मानवी ओझें घ्यावे असा नियम आहे आणि तसा तो योग्यच. पण 'पेट के लिए' ते पाठुंगळी घेत असलेल्या सवाऱ्या बहुतेकदा यापेक्षा अधिक वजनाच्या असतात.

आमच्या सौभाग्यवतींचा कंडीवाला नेपाळी जवान होता. त्याचे चेह-ऱ्यावर थकावट मुळीच नव्हती.

गौरीकुंडात मुक्काम

आता गौरीकुंडाच्या दिशेने आमची वाटचाल सुरू झाली. उजव्या बाजूला मंदाकिनीचा स्फटिकाप्रमाणे पांढरा शुभ्र, उड्या घेत जाणारा खालचे दरीतील प्रवाह तर डाव्या बाजूला उंच उंच पहाड अशा निमुळत्या मार्गाने हा प्रवास आम्हाला अपूर्व भासला. या प्रवासात 'ज्याचा तो' अशी वेळ येते. संस्कृतच्या क्रमिक पुस्तकात 'अश्वमारोढुं मतिर्जाता' या मनीषेची अस्मादिकांची हौस 'श्यामा' घोडी शांतपणे पुरवीत होती. घोडीचा लगाम नावालाच माझ्या हातात कारण तिच्याबरोबर तिचा रिसालदार तिला योग्य मार्गाने चालवत होता. कित्येकदा रस्ते दगड गोट्यांनी व्याप्त आढळत तेव्हा 'श्यामा' ठेचकळत असली तरी उजव्या बाजूच्या दरीची तिला जाणीव असल्यामुळे ती सावधपणे स्वत:ला सावरी. एकदा आमची अश्विनी मध्येच थबकली. मोतद्दाराला कारण विचारले मी. तेव्हा तो उत्तरला, 'पहाडातून एखादी शिला घरंगळत येत असल्याचा आवाज तिने ऐकला असावा, म्हणून ती थबकली.' आणि त्याच्या म्हणण्या–प्रमाणे थोड्याच वेळात वरून दरड खाली येऊन सरळ रस्त्यात आडवी झाली. मी त्या 'दगडी नागोबाला' मनातच वंदन करून श्यामाची पाठ कौतुकानें थोपटली.

शिरकट गणेश– सोमप्रयागपासून दीड मैलावरच 'शिरकट गणेश' मूर्तीचे छोटेसे देऊळ आपल्या दृक्पथात येते. या स्थानासंबंधी स्कंद पुराणातील कथा काही गंमतीचीच म्हणायची ! पार्वतीने स्नानाला जाताना त्या बाजूला कोणाला येऊ न देण्याची सूचना श्री गणेशांना दिली. तिचे पालन करीत असता खुद्द श्री शंकर पार्वतीला भेटण्यासाठी तेथे आले. तेव्हा गणेशांनी त्यांनाही मज्जाव केला. शंकर क्रुद्ध झाले व त्यांनी गणपतीचे मुंडकेच धडावेगळे केले ! पार्वती हा प्रकार पाहून रागाने लाल झाली व तिने तपसामर्थ्याने उत्पन्न केलेल्या

हिमालयातील

शक्तीशी श्री शंकरांना सामना द्यावा लागला. या युद्धामुळे देव भय-भीत झाले व उभयतांची युद्ध विरामासाठी प्रार्थना करू लागले. अखेर पार्वतीने एकदंत असलेल्या हत्तीचे मुंडके आणण्यास सांगितले. ते येताच गणेशांच्या धडावर बसविले गणेशांना जणू काय संजीवनीच मिळाली, व तेव्हापासून गजानन रूपाने ते वावरू लागले. रोमहर्षक प्रसंगाच्या मानाने प्रस्तुत मार्गावरील गणेशाची प्रतिमा काहीशी प्रतीकात्मच वाटते.

गौरीकुंड– सोनप्रयागपासून गौरीकुंड तसं म्हटलं तर पाच किलोमीटरवर आहे. पण त्रिजुगीनारायण करून येथपर्यंत मोठमोठे डोंगर चढून पोहोचेपर्यंत पायी येणाऱ्या यात्रेकरूंची दमछाक झालेली असते. त्यामुळे तो गौरीकुंडावर मुक्काम करण्यास उद्युक्त न झाला तरच आश्चर्य !

कडाक्याच्या थंडीने रात्री मिळेल तेवढी झोप घेऊन आम्ही सकाळी ताजेतवाने झालो व गरम पाण्याच्या गौरीकुंडात सचैल स्नान केले आम्ही. तप्त कुंडातील पाणी सदैव गरम असते, पण कोकणातील गरम पाण्याच्या झऱ्याप्रमाणे या पाण्याला गंधकाचा वासही येत नाही हे एक आश्चर्यच ! याच ठिकाणी पार्वतीचा जन्म झाला ही आख्यायिका. तेथून जवळच खाराकुंड लागते. तेथे म्हणे गौरीचे पहिले ऋतुस्नान झाले ! थोड्याच अंतरावर केदारनाथचा कोतवाल भैरवनाथचे देऊळ आहे.

हरिद्वार–ऋषिकेश पासून हिमालय यात्रेतील प्रमुख ठिकाणी खास हिमालयीन औषधे विकणारी दुकाने व वैद्यराज कितीतरी आढळतात.

आमच्यापैकी कित्येकांनी व्हॅसलीनच्या आकाराची शुद्ध केलेल्या शिलाजिताची पॅकबंद केलेली बाटली घेतली. महिन्यानंतर पुण्यात आम्ही बाटलीचे वेष्टण काढले तो ते गोमयाने लपेटलेले ! आश्चर्य वाटले मला. अखेर वैद्यराज लावगणकर याना सदर बाटली दाखविताच गोमूत्र व गोमय इत्यादी पदार्थ शिलाजित शुद्ध करताना वापर-

तात–बाटलीतील शिलाजित खरे आहे अशी ग्वाही दिली तेव्हा बरे वाटले.

हिमालयातील कितीतरी वनस्पतींची परदेशात निर्यात होते व पक्क्या मालात रूपांतर झालेली औषधे आम्ही भारी किंमत देऊन विकत घेतो. सुदैवाने उत्तर प्रदेश सरकारचे लक्ष हिमालयीन औषधी वनस्पतींकडे गेले असून ते आता त्यापासून व्हावयाच्या औषधी उत्पादनाकडे पाहू लागले आहेत.

रामपारा– गौरीकुंडापासून पुढे चढच चढ लागतो. साडेतीन मैलावरील ' रामपारा ' या चिमुकल्या गावी काहीं मामुली हॉटेले आहेत. चहा व एकादशी असल्यामुळे उपवासाचे पदार्थावर कशीतरी क्षुधाशांती करावी लागली. यात्रेत, प्रवासाने बदलणारे पाणी व हवामान लक्षात घेऊन बेतानेच खाणे प्रकृतीच्या दृष्टीने उत्तम. रामपारा ९८०० फूट उंचीवर वसले आहे. कंडीवाल्याप्रमाणे घोडयानांही विश्रांतीची जरूरी भासते. बेसन व गूळ पाण्यात कालवून घोडयांना वेळोवेळ ते पेय पाजण्यात येते. त्यामुळे आवश्यक ती उष्णता व ताकद या घोडयात येते. महागाईमुळे हा खर्चही मोतद्दारांना पुष्कळ वाटतो.

रामपारा ९८०० फूट उंचीवर असल्याने येथून पुढें हिमसृष्टि सुरू होते असे म्हणावयास हरकत नाही. काश्मीरमध्ये जुलै महिन्यात चंदनवाडी येथे ग्लेसिअर अथवा हिमनदी चालून गेलो होतो मी. गुलमर्गहूनही पुढे खिलनमर्गावरचे बर्फाचे खंडहर विसरण्यासारखे नाहीत पण रामपारा ते केदारनाथ रस्त्यावर अधूनमधून हिमाच्या आलयातूनच जाण्याचा अनुभव आगळाच. मंदाकिनीच्या पलीकडील उत्तुंग पर्वतावरून पांढरट गुलाबी हिमनद्या व सूर्यकिरणे त्यावरून परावर्तित झाल्यामुळे पांडुर पर्वतराजीतून चमचमणारा प्रकाश अवर्णनीय शोभा आणतो. हिमखंडावरून श्यामा घोडीचे खूर कधी घसरत पण तेवढयात मोतद्दार तिला सावरे व काही अवघड वाटा आल्या तर घोडीवरून उतरून पायीच चढावे लागे. वाटेत भेटणारे यात्रेकरू एकमेकांना 'जय केदारनाथ' म्हणून सलामी देऊन सलगी दाखवितात. एवढी बिकट वाट चढून भगवान श्री शंकराच्या दर्शनाने

पुनीत होऊ इच्छिणाऱ्या आबालवृद्ध स्त्रीपुरुषांची श्रद्धा काय वर्णन करावी ? भारतातच या प्रकारचा भक्तीचा मळा इतक्या उत्कटत्वाने फुललेला दिसतो. रामपारा ते केदारनाथ ३॥ मैलांचा मार्ग अतिशय चढणीचा असल्याने तो पार पाडण्यास जवळजवळ तितकेच तास लागतात. घोड्यावरच्या सवारीस सुमारे निम्मा वेळ लागतो. घोड्याचा मोतद्दार बरोबर झपझप चालत असतो ना.



ब्रह्मकूट
पर्वत
शिखर

धूर्जटीचे
नैसर्गिक
दर्शन

समोरच्या पर्वत शिखरावरील अधून मधून हिमाच्छादित भागामुळे काही स्वयंभू शिल्पाकृती डोळ्यापुढे तरंगतात. एका शिखरास धूर्जटी शंकराचे स्वरूप आलेले आढळले. जटासंभार, धवल भस्मचर्चित विशाल कपाळ, त्याखाली हिमाने तयार केलेली भेदक नेत्रकमळे, नीलकंठास लपेटलेली नागाची आकृती पाहून मी क्षणभर स्तंभितच झालो. 'मनी वसे ते स्वप्नी दिसे' असे म्हणतात. पण पायी किंवा घोड्यावर समोर दिसणाऱ्या हिमालयाच्या शिखराकडे टक लावून पहाताच हे श्री शंकराचेच प्राकृत स्वरूप असल्याची माझी धारणा झाली. या शिखराचे मी लांबून साध्या कॅमेऱ्याने घेतलेले छायाचित्र या यात्रावर्णनात छापले आहे. त्यावरून वाचकांनाही या

दिव्य अनुभवाची कांहीशी कल्पना येईल. सुमेरू पर्वताच्या मध्यावरील २३००० फूट उंचीच्या ब्रह्मकूट पर्वताच्या शिखरांत समाधिस्थ शिवाचे प्रतिबिंब पहावयास मिळते असा सार्वत्रिक समज आहे त्याचाच हा साक्षात्कार आम्हाला झाला असावा. आमचे कुटुंबासही हा दृक्प्रत्यय आल्याचें त्यांची आमची केदारनाथास दोनतीन तासांनी भेट झाली तेव्हा त्यांनी सांगितले मला.

चढण चालू असताना अधून मधून तुरळक हिमवर्षावही चालू झाला. रघुवंशात 'आचारलाजैरिव पौरकन्या:' या पंक्तींत रघुराजावर भाताच्या लाह्यांचा वर्षाव नगरातील तरुण मुली मोठ्या आदराने करीत असल्याचें वर्णन आहे. आमच्या अंगावर पडणारे हिम अशा लाह्यांचे स्वरूपाचे वाटले. या हिमलाह्या तोंडात टाकून त्यांची चवही घेतली. गारापेक्षा त्या ठिसूळ वाटल्या आणि बर्फाइतक्या थंड भासल्या नाहीत. माझेनंतर आलेल्या सौ. ठाकूर तर भर हिमवर्षावात सापडल्यामुळे केदारला येईपर्यंत त्या अगदी गोठून गेल्या होत्या व कंडीही हिमाने भरून गेली, अन गुरखा कंडीवाल्याने एखादे मुटकुळे टाकावे तसे धर्मशाळेत येताच आपले ओझे खाली केले.

केदार अर्ध्या मैलावर आले तेव्हा वळणावर 'देवदेखणी' नावाचे एक स्थान लागते तेंथून केदारेश्वर मंदिरे व आसपासचा निसर्गरम्य प्रदेश स्पष्ट दिसतो 'अक्ष्णां फलं प्रापु:' असा विचार या वेळी मनात आल्याखेरीज रहात नाही.

दुपारी तीनच्या सुमारास आम्ही केदारनाथ धर्मशाळेत पोहोचल्यावर पहिली गोष्ट केली ती रसरशीत निखाऱ्यांनी भरलेल्या शेगड्या मागविल्या–त्या शेकाने थंडी काहीशी कमी झाली पण शेकोटी सोडावीशी वाटेना–रजयांचाही ढिगारा तेथील व्यवस्थापकांनी आमचेंकडें आणून टाकला आणि मग आम्ही आमच्या तुकडीतील अन्य यात्रिकांची वाट पाहू लागलो. सायंकाळपर्यंत सर्व मंडळी आली व वाटेतील प्रत्येकाचे वेगवेगळे अनुभव ऐकण्यात गर्क झालो आम्ही.

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे
(डेक्कन व्ह. ट्रा. सोसायटी, पुणें)
११३३, सदाशिव पेठ, पुणें ३०

सर्वोच्च ज्योतिर्लिंग

बारा ज्योतिर्लिंगापैकी केदारनाथ हे सर्वाधिक उंचीवरील (११,७५० फूट) स्थान अनादि कालापासून पवित्रतम मानले गेले आहे. केदारखंडांत स्पष्ट म्हटले आहे की

न केदारात्परं स्थानं, न केदारात्परं तपः।
न केदारात्परो मोक्षः, स्वयं देवेन भाषितम् ॥

भोजराजाच्या शिलालेखाचे प्रमाणे प्रस्तुत देवालय १०१९ इ. स. मध्ये बांधले गेले असले तरी त्या भूमीच्या तीर्थमाहात्म्याचा मागोवा काढण्यास अधिक प्राचीन कालात जावे लागते.



यात्रिकेचे ओझे नेणारा
कंडीवाला

सत्ययुगात उपमन्यूने याच स्थानी श्री० शंकराची दीर्घ उपासना करून त्यांना प्रसन्न केल्याचा उल्लेख आहे.

कौरव–पांडवांच्या युद्धात पांडवांकडून आपल्या बांधवांचे वध झाल्यामुळे त्यांना जे पाप लागले त्यांतून मुक्त होण्यासाठी महर्षि व्यासांच्या सूचनेनुसार ते शंकराच्या आराधनेसाठी येथे आले पण त्यांचा हेतू ओळखून शंकर म्हशीचे रूप घेऊन पळू लागले. भीमाने ही चलाखी ओळखली व कोपाविष्ट होऊन म्हशीला गदा मारताच तिची शकले झाली. पृष्ठभाग केदारला राहिला व म्हशीचे मुंडके जमिनीत घुसून ते नेपाळात काठमांडूजवळ प्रगट झाले, तोच पशुपतिनाथ. या घटनेमुळे पशुपतिनाथास अर्धज्योतिर्लिंग म्हणतात व केदारेश्वर बदरीनाथाची यात्रा संपल्यावर पशुपतिनाथास जाणे शास्त्रोचित समजले जाते.

पांडवांच्या भक्तीने शंकर प्रसन्न होऊन पांडवांना त्यांनी साक्षात दर्शन दिले व म्हशीच्या पृष्ठभागाची शिला झालेल्या आत्मरूपाची यथाविधी पूजा केल्यास पांडव पापमुक्त होतील असे सांगून शिवजी अन्तर्धान पावले. त्यामुळे म्हशीच्या पाठीच्या आकाराच्या या स्वयंभू महादेवाला प्रथम यात्रिकांनी आपली छाती टेकून मग घृतमर्दन करण्याचा आगळाच पूजाविधी येथें विहित आहे.

श्री केदारनाथ
स्वयंभू
ज्योतिर्लिंग



पद्मपुराणात साक्षात शंकरांनी या स्थळाचे महत्त्व पार्वतीस सांगताना म्हटले आहें–

ये वदन्त्यपि केदारं गमिष्यामि इति क्वचित् ।
पितरस्तस्य देवेशि त्रिशतं कुलसंयुताः ।
गच्छन्ति शिवलोकें तु सत्य नात्रसंशयः ।।

महिषीरूप शिवाचे जे तुकडे झाले ते काहीं अंतरावर विभिन्न ठिकाणी पडले व उत्तरा खंडातील पुढील चार ठिकाणे सुप्रतिष्ठित झाले व तेही केदाराचेच अंश समजण्यात येतात. या भागातील

सर्वोच्च शिखर तुंगनाथ (१२०७२ फूट) येथे स्वयंभू शिवाचे बाहू आहेत तर रुद्रनाथ (११६७० फूट) येथे मुख, नाभि मदमहेश्वरास (९७०० फूट) आणि जटा कल्पेश्वर येथे. केदारनाथास पहिले अग्रस्थान असल्यामुळे बाकी केदारांना द्वितीय, तृतीय, चतुर्थ व पंचम अशी संख्या विशेषणे जोडण्यात येतात. याच पंचकेदारांची कल्पना पुढील श्लोकावरूनही स्पष्ट होते–

केदारं मदमहत्तुंगं रुद्रं गोपेश्वरं तथा।
केदारपंचकं नित्यं स्मरेत्पातकनाशनम् ॥

स्कंद पुराणातील कथेप्रमाणे केदारनाथाचे हे विशाल देवालय मूळ पांडवांनी बांधले. पुढे आद्य शंकराचार्यांनी त्याचा जीर्णोद्धार



श्री केदारनाथ मंदिर

केला. केदारनाथाची शृंगारमूर्ती पंचमुखी आहे. तिच्यावर पोशाख चढविल्यानंतर साक्षात शंकर आपल्या डोळ्यासमोर उभे राहतात. सध्या देवळाचे शिखरावर जो देखणा सुवर्णकलश लखलखतो त्याची उभारणी अहल्यादेवी होळकर यांच्याकडून झाल्याचा इतिहासात उल्लेख आहे. मुख्य देवळासमोरील द्रौपदीची व पांडवांच्या मूर्ती

पांडवांचा या तीर्थाशी निकटचा संबंध आला होता ही गोष्ट स्पष्ट करतात.

सायंकाळी केदारनाथांच्या आरतीला भाविक न चुकता येतात. आमच्या निवासापासून हिमखंडातून काढलेल्या वाटेने मीही देवळात आरतीच्या वेळेलाच येऊन ठेपलो. कापूर–उदबत्त्यांचा सुगंध सर्वत्र दरवळून गेला होता आणि कल्याणकारी शंकराच्या प्रतिमेकडे सर्वांचे लक्ष खिळून गेले होते. आरती आटोपताच 'जय केदार' च्या जय–घोषात हळूहळू भाविकांची पांगापांग झाली.

दिवसभरचा कष्टमय प्रवास, त्यातून एकादशीचा उपवास, हिमवृष्टि व अतीव थंडी यामुळे आलेली हुडहुडी यामुळे आम्ही यात्रेकरू अगदी थकून गेलो होतो. तरीही क्षेत्रातल्या बाजारात फेरफटका मारण्यात मौज वाटली.

इतक्या दूरच्या ठिकाणीही वीज पूर्वीच पोहोचली असल्यामुळे प्राचीनतेत आधुनिकतेची भर जाणवली. त्यातून वसंतऋतूतील शुद्ध पक्षातील टिपूर चांदणे आणि सभोवतालच्या पर्वतातून वाहणाऱ्या हिमनद्यांचे रजतप्रवाह यामुळे एक विलोरी झालर या क्षेत्रस्थलीस लाभल्याचे दृश्य मनाला उल्हास देत होते व मन तहानभूक विसरून जात होते. तसं म्हटलं तर इतक्या उंचीवर भात वगैरे अन्नपदार्थ शिजविणेही दुरापास्तच. यात्रा चालकांनी बऱ्याचे तांदूळ शिजविण्याचा प्रयत्न केला पण प्रवाशांना कच्च्या लापशीसारखी ती भगर वाटली. पण श्री केदार दर्शनाने सर्वांची पोटं इतकी भरून गेलेली की अन्नावर लक्ष तरी कोणाचे रहाणार ?


रात्री अर्धसुषुप्तावस्थेत दिवसा अनुभवलेल्या अपूर्व प्रसंगांची दृश्ये डोळ्यापुढे तरळत प्रवाही अभ्रकाचे तरंगच मंदाकिनीच्या पात्रातून निघत असल्याचा देखावा, समोरच्या गगनचुंबी पर्वत शिखराशी हिमाने केलेल्या लपेटणीमुळे त्यातून दिसणाऱ्या विविध प्रतिमा, यात्रेकरूंना वाहणारे कंडी–दांडीवाले, धापा टाकणारे घोडे, दैवताच्या दर्शनासाठी आसुलेले गलितगात्र वृद्ध स्त्री–पुरुष अशी कितीतरी दृश्य पहुडलेल्या यात्रेकरूंची मने जागृतावस्थेत नेत होती. आम्हीही या

स्वप्ननगरीत इतके मश्गूल की, पहाट केव्हा झाली ते समजलेच नाही.

गरम केलेले पाणी अल्पावधीत थंड होत असल्यामुळे आम्ही झटकन स्नान करून घेतले. पैसे भरून पूजेचा पास काढला व गाभाऱ्यात गर्दी होती तरी पंड्याच्या साह्याने यथोचित पूजा केल्याचे समाधान घेतले.

शंकर हे दैवत अखिल जनतेचे असल्याने बहुतेक महादेवाच्या देवालयात लोकांना स्वहस्ते पूजाअर्चा करता येते. ही संधी लाभण्यात आगळे समाधान मिळते हे सांगणे नकोच. निरंजन पेटवून देवळात तेवत ठेवण्याची प्रथाही आम्ही अनुसरली. देवदर्शनाने तृप्त झाल्यावर बाहेरचा परिसर आस्थेने पाहून काही छायाचित्रेही घेतली.

श्री शंकराचार्यांची समाधी



श्री शंकराचार्यांची समाधी

केदारनाथ

केदाराचे सम्यग् दर्शनानंतर देवळाचे मागील बाजूला उंचवटयावर असलेल्या आद्य शंकराचार्यांच्या समाधीकडे वळलो. कित्येक यात्रेकरूंना या स्थानाची नीटशी कल्पनाही नसल्यामुळे ते तिकडे आवर्जून जात नाहीत. हे कळल्याने मन उद्विग्न होते. समाधीचे ठिकाण छोटेखानी हेही या अनास्थेचे कारण असू शकेल.

श्रीशंकराचार्यांच्या समाधीकडे जाताना अवघ्या बत्तीस वर्षांच्या आयुष्यात या अवतारी पुरुषाने आसेतुहिमाचल वैदिक धर्माच्या उत्थानासाठी केवढे प्रयत्न केले त्याचा चित्रपट डोळ्यापुढे उभा राहिला. थोड्याच वर्षांपूर्वी नैर्ऋत्य भारताचा सहकुटुंब प्रवास करताना मुद्दाम केरळातील कालडी येथील श्रीशंकराचार्यांच्या जन्मस्थळाचे दर्शन घेतले होते. डॉ. के. बी. पाठक यांनी श्रीमत् शंकराचार्यांच्या जीवनाविषयी संशोधनपूर्वक लिहिलेल्या ग्रंथात त्यांच्या कार्याचे वर्णन पुढीलप्रमाणे अर्थगर्भ पंक्तीतून केले आहे.

दुष्टाचारविनाशाय प्रादुर्भूतो महीतले ।
स एवशंकराचार्यः साक्षात् कैवल्यनायकः ॥
अष्टवर्षे चतुर्वेदान् द्वादशे सर्वशास्त्रकृत् ।
षोडशे कृतवान् भाष्यं द्वाविंशे मुनिरभ्यगात् ॥

सन ७८८ मध्ये जन्मास आलेल्या या विभूतीने ८२० साली या पवित्र क्षेत्री समाधी घेऊन आपल्या आयुष्याचे सार्थक केलेच पण—

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ।
अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ॥

या साक्षात् भगवंतांनी अर्जुनाला दिलेल्या आश्वासनाची भारतवर्षाला खात्री पटवून दिली.

उत्तराखंडातील केदारनाथ, बदरीनारायण, जोशीमठ इत्यादी अनेक तीर्थक्षेत्रातून आचार्यांनी केलेल्या मूलग्राही कार्याची परंपरा आढळून येते. ईश्वराने विविध देवतांच्या स्वरूपात आपला आविष्कार या अवनितलावर केल्याचे प्रचीतीस येते. आचार्यांनी विभिन्न देवदेवतांवर जी प्रासादिक स्तोत्रे लिहिली आहेत व जी संस्कृतीचे महत्त्व जाणणाऱ्या कित्येकांच्या मुखोद्गतही आहेत, ती पाहिली तर विशिष्ट देवतेच्याच पूजेचा आग्रह त्यातून दिसत नाही. असे असले तरी शंकराचार्यांनी स्वीकारलेल्या संन्यासावरून व धारण केलेले नावावरून भगवान् शंकराचे ते नितान्त उपासक होते, आणि त्या श्रद्धेनेच केदारनाथाच्या सान्निध्यात ते शिवस्वरूप झाले हे स्पष्टच दिसते.

हिमालयातील

श्री शंकराचार्यांची समाधी पत्र्याचे आच्छादन असलेल्या एका लहानशा ठिकाणी आहे. तेथील श्री शिवलिंग व शंकराचार्यांची संगमरवरी प्रतिमा यांची भाविक पूजा करतात. बदरी-केदार देवस्थान कमिटीने या स्थानाकडे अधिक लक्ष देऊन त्याला भव्य स्वरूप द्यावे व श्रीमत् शंकराचार्यांच्या कार्याचे स्वरूप दर्शनास येणाऱ्या अगणित यात्रेकरूंना कळेल अशा पद्धतीने तेथे स्मारक उभे रहावे हीच इच्छा.

'शंकरविजय' ग्रंथातही श्री शंकराचार्यांच्या उत्तराखंडातील कार्यावर पुढील प्रकाश पाडला आहे.

गत्वैकादशवार्षिको बदरिकारण्ये सुपुण्याश्रमे ।
पंचाब्दान्तरकुठ्या निजधिया भाष्याणि यः षोडशः ॥
निर्माय प्रथयांचकार बदरीनारायणार्चा तथा ।
श्रीज्योतिर्मठभावबन्धनगुरुः श्रीशंकरो वन्दते ॥

पुढें बदरीनारायण मठाच्या उभारणीचे संबंधात श्री शंकराचार्यांच्याबद्दल लिहावे लागेलच. असुरांना यज्ञादि कर्मकांडापासून परावृत्त करण्यास बौद्ध धर्माचा उदय झाला आणि बौद्ध मीमांसकांचा युक्तिवाद हटविण्याची कामगिरी शंकराचार्यांनी केल्याचा पुढील उल्लेख शिवरहस्यात वाचावयास मिळतो.

कलौ गते त्रिसाहस्रे वर्षाणां शंकरो यतिः ।
बौद्धमीमांसकिमत जेतुमाविर्बभूव ह ॥

खुद्द शंकराचार्यांची केदारेश्वरावर केवढी श्रद्धा होती हे त्यांचे शब्दातील पुढील प्रार्थनेवरून समजतें-

महाद्रिपार्श्वे च तटे रमन्ति संपूज्यमानं सततं मुनीन्द्राः ।
सुरासुरैर्यक्षमहोरगाथः केदारमीशं शिवमेकमीडे ॥

प्रस्तुत क्षेत्रास 'केदार' नामाभिधान मिळण्याचे कारणही ब्रह्मावर्तपुराणात आढळते.

सत्य युगातील 'केदार' नावाच्या राजाने शिवाला प्रसन्न करण्यासाठी या स्थळी उत्कट तपश्चर्या केली. त्या भक्ताचें नावावरून

क्षेत्रास केदार म्हणण्यात येऊ लागलें. नद्यांचे संगम किंवा प्रयाग पवित्रच मानलें जातात, आणि या ठिकाणी तर पाच नद्यांचे मीलन झाल्यामुळे त्याच्या पवित्रतेत भरच पडली. मंदाकिनी, सरस्वती, क्षीरगंगा, स्वर्गद्वारी तशीच महोदधी या पाच नद्या केदार येथें एकत्र येंतात, व पुढे मंदाकिनी या नावाने या पाच नद्यांचे एकत्र प्रवाह ओळखलें जातात. या संगमावर स्नान करण्यास यात्रिकांची झुम्मड न उडाल्यास आश्चर्य !

केदारनाथाचे मंदिर हिमालयातील थंडी, हिमवृष्टि इत्यादि प्रतिकूल हवेमुळे वर्षातून सहा महिने बंद राहते. अक्षय्य तृतीयेस खुलें केलेलें मंदिर दिवाळीतील पाडव्यात म्हणजें बलिप्रतिपदेस बंद केलें जाते. बर्फाच्छादित मंदिर खुलें करण्याच्या क्रियेला ' कपाट खोलणे ' अशी संज्ञा आहे. कपाट बंद करण्यापूर्वी लावलेल्या नंदादीपाची ज्योती ते खुलताना तशाच स्थितीत प्रतीत होते त्यामुळें भाविकांची मने भारावतात. या कार्यक्रमास समुदाय पुष्कळच जमतो.

केदारनाथांचे पुजारी रावळ घराण्याचे लिंगायत ब्राम्हण समाजातील असावेत अशी परंपरा आहे. त्यांना विवाह करण्यास मुभा आहे. मंदीर पहाटें ५ वाजताच उघडते. ५।। ते ८ वाजेंपर्यंत महाभिषेंक, पूजा वगैरे कार्यक्रम होतो. ८ ते दुपारी २ वाजेंपर्यंत यात्रिकांना दर्शन, पूजा, अभिषेक इत्यादीसाठी खुले ठेंवलें जाते. नंतर महानैवेद्य वगैरे झाल्यानंतर सायंकाळी ५ वाजेंपर्यंत देवळाचे दरवाजे बंद होतात.

पोषाखाने शृंगारित शिवाचे दर्शन त्यानंतर होऊ शकते आणि मग आरती वगैरे होऊन सायंकाळी ७।। वाजता पुन्हा देऊळ बंद केले जाते. यात्रिकांनी आपली धार्मिक कृत्ये वरील कार्यक्रमानुसार करावयाची असतात.

यात्रिकांना उतरण्यासाठी काही सार्वजनिक धर्मशाळा आहेत कोणी पंड्याकडेही उतरतात. बाबा कालीकमली क्षेत्र, मंदिर कमिटी, राणी जयदेवी, जयरामदास भागचंद्र इत्यादी धर्मशाळा आवश्यक त्या सोयींनी युक्त वाटतात.

हिवाळ्यात मंदिरातील उत्सवमूर्तीची पूजाअर्चा उखीमठ येथे होते. त्यामुळे त्या काळात येणारे यात्रेकरू श्रीच्या दर्शनासाठी उखीमठातच जातात.

द्वादशी सोडून आम्ही काहीशा जड पावलांनीच परतीच्या प्रवासास निघालो. साहजिकच केदारला येताना जो उत्साह व प्रतीक्षापूर्ण मनोवृत्ती होती ती मावळली तरी ज्यासाठी केली ही यातायात ती सफल झाल्याचे समाधान मनाला प्रसन्नच ठेवते. परततानाही आम्ही गौरीकुंडास मुक्काम केला. एक कंडीवाला ठेचाळून पडल्यामुळे धोका उंबरठ्यावर आला होता पण तेवढ्यात त्याने स्वतःला व त्याच्या कंडीतील आमच्या गटातील एका भगिनीस सावरल्याचे वृत्त आल्याने समाधान वाटले.

डोंगर चढून जाताना जी दमछाक होते ती परतताना साधारण उतार असल्यामुळे सहसा ग्रासत नाही, पण 'जपुनि टाक पाऊल जरा' ही सावधगिरी खाली येताना जास्त कसोशीने पाळावी लागतेच.

सोनप्रयागहून रुद्रप्रयागला नॉनस्टॉप पोहोचल्यावर तेथून आम्ही अलकनंदेच्या बाजूबाजूने व बदरीनारायणाच्या दिशेने धावू लागलो. हाही रस्ता चढणीचा तसाच वळणावळणाचा, पण कुशल गढवाली सारथी मोठ्या सावधानतेने बस हाकीत होता.


जोशीमठ याने ज्योतिर्मठ

रुद्रप्रयागपासून १४ किलोमीटर अंतरावर घोलतीर हे गाव येते व येथूनच चमोली जिल्ह्याची हद्द सुरू होते. त्यानंतर ८ किलोमीटरवरील गोचर या गावी नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात यात्रा भरत असते. कर्णप्रयाग, नंदप्रयाग, चमोली, बिरही, पीपलकोटी, हेलंग इत्यादी गावे वाटेत घेत घेत आम्ही जोशीमठापर्यंत पोहोचलो. पण पुढे एकेरी वाहतूक काही विशिष्ट तासांकरिता विहित असल्यामुळे बसेसना तास-दीडतास थांबावे लागते. रुद्रप्रयाग समुद्रसपाटीपासून २००० फूट उंचावर तर जोशीमठापर्यंत आम्हास आणखी ४१५० फूट चढण घ्यावी लागली. महाराष्ट्रीयांना जोशीमठातील

जोशी नावामुळे आपुलकी वाटते. पण ‘ ज्योतिर्मठ ’ या नावाचे जोशी मठ हे अपभ्रष्ट रूप आहे असे कळताच त्यांचा भ्रमनिरास होतो.

बस रस्त्याहून नदीच्या बाजूकडे खालच्या रस्त्याला अर्ध्या मैलावरच श्री नृसिंहाचे मंदिर आहे. देवळातील नृसिंहाच्या मूर्तीचा एक हात दुबळा दिसतो. त्यासंबधी या ठिकाणी पुढील कथा प्रचलित आहे–

प्राचीन काळी या देशाचा राजा शिकारीस गेला असता भगवान नृसिंहांनी ब्राह्मणाचें रूप धारण करून राजवाडयात प्रवेश केला. राणीने त्यांचे स्वागत केल्यावर ब्राह्मण राजमंचकावरच पहुडला.



श्री बदरीनाथ मार्गावरील जोशीमठ

राजा शिकारीवरून परत येतोय तो त्यांच्या पलंगावर या ब्राह्मणाला पडलेला पाहून तो कोपाविष्ट झाला व त्याच्या हाताला जोराने मार दिला. पण जखमी दंडातून रक्त निघण्याच्या ऐवजी दुधाची धार निघाली, तेव्हा राजा नतमस्तक झाला. नृसिंहांनी आपले स्वरूप राजास दर्शवून तो मुलूख सोडून जाण्याची आज्ञा दिली व देवळातील नृसिंहाच्या मूर्तीचा हात दुबळा दिसेल असे सांगितले. जेव्हा मूर्तीचा

हा हात तुटेल तेव्हा बदरीनाथाची यात्रा दुर्गम्य होईल, असेही पुराणात म्हटले आहे. हा पहा तो श्लोक–

> यावद् विष्णोः कला तिष्ठेद् ज्योतिःसंज्ञे निजालये ।
> गम्यं स्याद् बदरीक्षेत्रम् अगम्यं च ततः परम् ।।

या मंदिरामध्ये श्रीकृष्णाची तसेच बलरामाची मूर्ती असून त्यांची स्थापना श्री शंकराचार्यांनी केल्याचे सांगण्यात येते. या देवळासमोरच दोन जलप्रपात आढळतात. त्यांची नावे दंडधारा आणि नृसिंहधारा. येथे नवदुर्गा मंदिरही प्रख्यात असून त्यात विविध देवींच्या मूर्ती आहेत. रस्त्याला लागून असलेल्या डोंगरात अर्धा मैल उंचावर जैतेश्वर महादेवाचे मंदिर आहे आणि तेथेच जगद्‌गुरु श्री १०८ शंकराचार्यांचीं गादी विराजमान आहे. या पीठाची स्थापना श्री शंकराचार्यांनी इ. स. ८७५ मध्ये केली. श्रीशंकराचार्यांनी स्थापिलेला हा पहिला मठ. येथेच एका वृक्षाच्या छायेत श्रीमत् शंकराचार्यांनी तप करून शांकरभाष्य लिहिलें. १८५१–५२ मध्ये भूकंपामुळें प्रस्तुत स्थान उध्वस्त झाले त्यावेळी श्री शंकराचार्यांची गुंफा तसेच ज्या झाडाखाली शांकरभाष्य लिहिले गेले तो वृक्ष सांपडला त्यामुळेच मठाची पूर्वीची जागा निश्चित करण्यात आली.

येथूनच कैलास –– मानसरोवराकडें जाण्याचा एक रस्ता मिळतो. जोशीमठापासून ७ मैलावर तपोवन लागते. भगवान व्यासांनी याच तपोवनात आपल्या काही शिष्यांना वेदपुराणांचे ज्ञान दिले असे म्हणतात. तपोवनापासून ८ मैलावर नंदादेवीचे मंदिर उभारलेले आहे आणि तेथून २५ मैलावर द्रोणागिरी पर्वत दिसतो. रामायणात श्री लक्ष्मण युद्धात मूर्छित झाल्यावर त्यांना औषध म्हणून संजीवनी वनस्पती आणविण्यासाठी श्री हनुमंतांना हिमालयातील ज्या पर्वताकडें पाठविले तोच हा द्रोणागिरी. हनुमंतांनी सर्व पर्वतच श्री रामचंद्रांपुढें आणून उभा केला तीच ह्या पर्वताची ख्याती !

विष्णुप्रयाग – जोशीमठाहून पुढे ११ किलोमीटर गेल्यावर विष्णुप्रयाग लागले. आता ४५०० फूट उंचीवर आलो होतो आम्ही.

विष्णुगंगा आणि अलकनंदा ह्यांचा संगम होतो यथे. नारदांनी अष्टाक्षर मंत्राचे ध्यान करून भगवान विष्णूंना प्रसन्न केले त्यामुळे विष्णुप्रयाग असे पडले या स्थानाचे नाव. साहजिकच येथे श्री विष्णूचे प्राचीन मंदिर आहे.

पांडुकेश्वर– विष्णुप्रयागपासून ६० कि. मी. वर गोविंद घाट लागतो. येथे शिखांचे गुरुद्वार व गोविंदघाट या नावाचे तीर्थक्षेत्र आहे. तेथून ३ कि. मी. वर आहे पांडुकेश्वर. पांडवांचा जन्म याच ठिकाणी झाल्याची नोंद आहे. योगध्यानी बदरी आणि भगवान वासुदेव यांचे येथील मंदिर प्राचीन आहे. पांडवकालीन चार ताम्रपट या मंदिरात सापडले ते सध्या बदरीनाथाचे मंदिरात पहावयास मिळतात. असे म्हणतात की, हस्तिनापूरचा राजा पंडु हा कुंती व माद्री या आपल्या स्त्रियांसह हिमालयाचे प्रस्तुत भागात मृगयेसाठी फिरत होता. तेथे त्याने हरीण व हरिणी ही एकत्र विहार करीत असताना त्यांना ठार मारले. परंतु वास्तवात मृग–मृगीचें रूप घेंतलेले ते तेथील ऋषि दाम्पत्य होते. या अत्याचारामुळे क्रुद्ध झालेल्या ऋषीने पंडूला शाप दिला की, त्याचाही मृत्यू स्त्रीसंग करण्यानेच घडेल. या शापाने खिन्न झालेला पंडु आपल्या स्त्रियांसह कैलास पर्वताकडें तपश्चर्येला गेला आणि तपाचे फल म्हणून कुंतीला मंत्रशक्तीने पाच पुत्र झाले ते पांडव. पांडवांच्या जन्मामुळे पंडूला शापाचा विसर पडला आणि माद्रीशी रममाण झाला असता शाप शक्तीनेंच त्याचा मृत्यू घडला. येथील श्री विष्णूचे मंदिर पंडुनेच स्थापिल्याची आख्यायिका आहे. हिवाळचात श्री बदरीनाथांचे उत्सवमूर्तीची पूजा पंडुकेश्वर येथेच करण्यात येते.

हनुमानचट्टी–उत्तरोत्तर आमचा प्रवासाचा मार्ग अधिक वळणावळणाचा व अवघड होऊ लागला. लष्करी गाडचांची हालचालही या सीमा भागाच्या निकटच्या प्रदेशात जोराने चालू असलेली दिसली. ११ कि. मी. तोडल्यावर ८००० फूट उंचीवरील हनुमान चट्टीवर आम्ही पोहोचलो. या ठिकाणाचे अगोदर १ मैल क्षीरगंगा अलक–नंदेला मिळते. या क्षेत्राला वैखानस तीर्थ असेही नाव आहे. याच ठिकाणी राजा मरुताने आणि वैखानस मुनींनी तप व यज्ञ केला अशी

महाभारतात कथा आहे. यज्ञामध्ये एकसारखें तूप प्राशन केल्यानें अग्निदेवांच्या जिभेला मळमळ सुटली आणि त्यासाठी कृष्ण व अर्जुन यांच्या साहृयाने त्यांनी खांडववन जाळून टाकले असाही महाभारतात उल्लेख आढळतो. तेथील अग्निकुंडातून अजूनही तीळ व निखारे बाहेर पडताना दिसतात. या ठिकाणी अलकनंदेस मिळणाऱ्या प्रवाहाला घृतगंगा असे नाव दिले गेले आहे.

हनुमान चट्टीला हनुमानांचे नाव लावण्यासंबंधी मनोरंजक आख्यायिका आहे. वनवास कालात गंधमादन पर्वताकडे पांडव निघाले असताना एक बुढ्ढा वानर त्यांना रस्त्यात दिसला. त्याच्या लांबलचक शेपटीने रस्ताच अडला गेला होता, म्हणून भीमसेनाने त्या म्हाताऱ्या कपिला शेपूट बाजूला करण्यास सांगितले. तेव्हा तें वानर म्हणालें की, भीमानेच ते बाजूला करावे. भीम मोठ्या अभिमानाने तें शेपूट उचलू लागला, पण ते वजन त्याला उचलेना तेव्हा त्याच्या डोक्यात प्रकाश पडला व साक्षात हनुमान तेथे असल्याची भीमाला खात्री पटली. त्यानंतर दोघाहीं पवनपुत्रांनी एकमेकांना आलिंगन दिले म्हणून पडले आहे हनुमानचट्टी असे या ठिकाणाचे नाव ! तेथून थोड्याच अंतरावर केदारयात्रेत आढळले तसेच 'देवदर्शनी' हें मोक्याचें ठिकाण. येथून विशाल बदरी हे क्षेत्र, त्याचा आसमंत व खुद्द देवालयाचे शिखर स्पष्ट दिसते व यात्रिक समाधानाचा सुस्कारा सोडतो.

गजबजलेल्या मोटार स्टॅन्डवर पोहोचावयास आम्हाला सायं-काळ झाली. जवळजवळ बारा तासांच्यावर बसच्या प्रवासामुळे साह-जिकच सर्वजण थकून गेलो होतो आणि केव्हा एकदा मुक्कामाला जाऊ असे झाले होते. बदरीनाथाच्या पंड्याने आम्हास सुमारे अर्धा मैल चालत आपल्या निवासस्थानाकडे नेले आणि थोडीशी विश्रांती घेतल्यानंतर देवदर्शनासाठी जाण्यास सुचविले.

श्री बदरीनाथाचे मंदिर जेवढे प्राचीन तितकेच ते विशालही आहे. वैशाख शुद्ध पौर्णिमेचा हा दिवस अविस्मरणीय वाटला. केदार-नाथाइतकी जरी नाहीं तरी स्थानाची उंचीच १०३५० फूट असल्या-

मुळे साहजिकच येथेही हिमाचे खंडहर ठिकठिकाणी आढळतात. थंडी मी म्हणत होती आणि बर्फाळलेल्या वातावरणात अंधुकशा वाफाही दृश्यमान होत होत्या.

खाली बर्फाची बिछाईत आणि आकाशात पौर्णिमेचा चंद्रमा, बाजूच्या पर्वत शिखरांवरून वाहणाऱ्या हिमनद्या यामुळे निसर्गाचे मोठे लोभस आणि प्रसन्न चित्र डोळ्यापुढे उभे राहिले. सायंकाळ झाल्यामुळे देवदर्शन तितके बारकाईने घेता आले नाही. तरीपण बदरीनाथांचे आरतीचेवेळी जे कमनीय दर्शन घडले त्याने मन तृप्त झाले. तिरुपती प्रमाणे हे देवस्थानही अत्यंत समृद्ध असून कुबेराची संपत्ती तर येथे लोळण घेत नाही ना, असा विचार मनात येतो.

शिव आणि विष्णु ह्या दोन्ही देवतातील जी भाववैशिष्टये ती त्यांच्या देवालयातूनही प्रकट न झाल्यास आश्चर्य ! त्यामुळे केदारनाथ आणि बदरीनाथ ह्यांचे तुलनेचा विचारही मनात डोकावतो. केदारनाथाचे देऊळ साधेपणाची साक्षात् प्रतिमा तर बदरीनाथाचे देवालय ऐश्वर्याचे प्रतीक.


बदरीनाथ व केदारेश्वर या उभय देवालयांची व्यवस्था एकाच समितीकडे असली तरी तिचे मुख्य केंद्र बदरीनाथ येथे असल्यामुळे कचेरीत येणारा पैशाचा झरा येथेच सहजासहजी प्रत्ययास येतो.

केदार येथे श्री शिवाच्या ज्योतिर्लिंगाची कोणाही भक्तास पूजा करता येते. परंतु बदरीनाथच्या गाभाऱ्यात तेथील पुजाऱ्याखेरीज कोणासही प्रवेश मिळू शकत नाही. त्यामुळे प्रत्यक्ष मूर्तीच्या पायांवर डोके ठेवण्याची संधी पंढरपुरास श्री विट्ठलाचे भक्तांना मिळते तिचा येथे अभाव आहे.

बदरीनाथ येथील आमची ही पहिली रात्र असल्यामुळे बाजारातून फेरफटका मारताना करमणूक झाली. देवदेवतांचे फोटो व रंगीत चित्रे, स्थानमहात्म्याची हिंदीतील पुस्तके, श्री नारायणाच्या चिमुकल्या मूर्ती, पंचखाद्य नैवेद्याची दुकाने इत्यादींनी देवळाकडे जाणारा रस्ता गजबजून गेला होता. देशातील विविध भागातून यात्रेकरू आलेले

आढळले आणि त्यांच्या चेहऱ्यावर एक अवघड यात्रा सफल केल्याचा आनंद विलसताना आढळला.

विशाल बदरीचे देवालयाच्या सभोवती २५० फूट लांबीचा तट संरक्षणार्थ बांधला असून मध्यभागी बदरीनाथाचे मंदिर सुमारे ४५ फूट उंचीचे भक्कम बांधलेले आहे. मंदिराच्या भिंतीवर व आतील कमानीतही प्रेक्षणीय कोरीव काम सहज डोळ्यात भरते. शिखराजवळ लावलेला सुवर्णाचा पत्रा सूर्यप्रकाशात चांगलाच लखलखतो. पांढऱ्या दगडाचें चुन्यात केलेले बांधकाम भक्कम असले तरीं कित्येक शतके लोटलेल्या या मंदिरावर काळाचा परिणाम जाणवतो. मध्यंतरी



चारधामापैकी
श्री बदरीनाथांचे
भव्य
मंदिर

झालेल्या भूकंपामुळेही काही भाग खिळखिळा झाला असून सध्या मंदिराच्या काही भागाची नव्याने बांधणी चालू आहे. या संबंधात बिर्ला घराण्याने पुढाकार घेतला आहे. परंतु बांधणी पुराणकाळच्या नमुन्याप्रमाणें करावी का आधुनिक स्वरूपाचे देवालय व्हावे यासंबंधी काहीसा मतभेद झाल्याचे समजले. पण आता जोमाने बांधकाम सुरू आहे.

बदरीनाथाचा गाभारा १६ फूट लांब व १२ फूट रुंद असा असून केरळातील नंबुद्री ब्राह्मण रावळ व त्यांचे सहाय्यक अशा दोघा

पुजाऱ्यांनाच मूर्तीच्या सान्निध्यात जाता येते. इतर यात्रेकरूंना बाहेरूनच दर्शन घेण्याची संधी मिळते. सकाळी ७ ते ८ नारायणाची पूजा होते. त्यावेळी मूर्तीवरील पोशाख व मस्तकावरील हिरा काढून ठेवतात. प्रस्तुत दर्शनाला निर्वाण दर्शन अशी संज्ञा आहे.

श्री विष्णूंची मूर्ती पद्मासनात प्रतिष्ठित असून तिची उंची सुमारे २ फूट आहे. मुख्य मूर्तीच्या आसपास गाभाऱ्यात नर, नारायण, कुबेर, उद्धव, नारद व गरुडलक्ष्मी यांच्या मूर्तीही डोळ्यात भरतात. केदारेश्वराचे मंदिराप्रमाणे या देवळातही रात्रंदिवस नंदादीप तेवत असतो, आणि दिवाळीचे पाडव्याचें दिवशी मंदिर सर्वबाजूंनी बंद करताना हा नंदादीप कपाट उघडेपर्यंत तेवतच राहील अशी तरतूद केली जाते. येथेही अक्षय्य तृतीयेचे दिवशी कपाट उघडताना जळत असलेला नंदादीप भाविकांची मने उचंबळून आणतो. मुख्य मंदिराचे बाहेर गणेश, हनुमान, घंटाकर्ण इ. मूर्ती असून पिछाडीला लक्ष्मीचे मंदिर आहे. दुपारी ४ वाजल्यापासून नारायणाचे शृंगारदर्शन सुरू होते.

ज्या यात्रिकांना निरनिराळे विधियुक्त भोग नारायणांना अर्पण करावयाचे असतील त्यांना ईप्सित रकमेची तिकिटे विकत घेता येतात व त्यानुसार विधी केले जातात.

दुपारची पूजा आटोपल्यावर मूर्तीला महानैवेद्य दाखविला जातो. सोन्याच्या ताटात चांदीच्या नऊ वाट्यांतून वेगवेगळे नैवेद्यासाठी पदार्थ घालून नैवेद्य दाखवितात. त्याला म्हणतात राजभोग. यानंतर सायंकाळची आरती मोठ्या थाटामाटात होते. ती पहाण्यास शेकडो यात्रिक उपस्थित होतात व ' बदरी विशाल की जय ' अशा जयजयकारात सायंकाळचा कार्यक्रम संपवून देवालय बंद होते.

श्री बदरीनाथाचे तीर्थक्षेत्र भारतवर्षातील शेकडो क्षेत्रांमध्ये पवित्रतम मानले जाते. चार धामांमध्ये श्री बदरीनाथांचा अंतर्भाव तर आहेच परंतु येथे श्री विष्णूंनी तपश्चर्या केली होती, त्यामुळे या सर्व क्षेत्राला आगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे. स्कंदपुराणात स्पष्टच म्हटले आहे की–

" बहूनि सन्ति तीर्थानि. दिवि भूमौ रसासु च ।
बदरी–सदृशं तीर्थं न भूतं न भविष्यति ।। "

भारताच्या चारही दिशांना म्हणजे पूर्वेस श्रीजगन्नाथपुरी, पश्चिमेस श्रीद्वारका, दक्षिणेंकडील श्रीरामेश्वर आणि उत्तरेकडील बदरीनाथ ह्या ४ धामांनी भारताच्या सीमा दर्शविलेल्या आहेत.

सत्ययुगामध्ये भगवान विष्णूंनी नरनारायणाच्या रूपाने श्री बदरिकाश्रमामध्ये घोर तप आचरिलें तेव्हापासून या क्षेत्राला असामान्य महत्त्व प्राप्त झाले. बदरी तीर्थास विशाल बदरी असेही म्हणतात. त्याचे कारण स्कंदपुराणात पुढील श्लोकार्थांतून स्पष्ट होते–

तीर्थानां बसतिर्यत्र देवानां वसतिस्तथा ।
ऋषीणां वसतिर्यत्र विशाला तेन कथ्यते ।।

तीर्थे, देवता आणि ऋषि ही या तपोभूमीत सत्ययुगापासून वास्तव्य करीत. त्यामुळे विशाल असे विशेषण या क्षेत्रास साहजिकच मिळालें.

वराहपुराणात 'विशाल' विशेषणाचा निराळा उल्लेख आहे. प्राचीन काळी काशी येथील राज्याचा अधिपती विशाल नावाचा-- त्याचे राज्य हिरावून गेल्यामुळे भटकत भटकत गंधमादन पर्वताकडे आला व तेथे त्याने तपश्चर्या केली. वराह महापुराणात म्हटले आहे–

" पूर्वं राजा विशालोऽभूत् काशीपुर्यां महाबलः
गोत्रजैर्हतराज्योऽसौ गन्धमादनमाविशत् ।
तस्य द्रोण्यां महाराज बदरीं प्राप शोभनाम् ।। "

या विशाल राजाच्या तपश्चर्येने नरनारायण प्रसन्न झाले व त्याला साक्षात दर्शन देऊन वर मागण्यास सुचविले. साक्षात् भगवंताचे दर्शन झालें असतानाही राजा विशालाने वर काय मागितला तर आपले गेलेलें राज्य पुन्हाः परत मिळावे. नरनारायणांनी राजाची थोडी कानउघाडणी करून म्हटले की, परत जाऊन राज्य करण्यापेक्षा येथेच राहून तप करीत बस. तुला तुझे राज्य परत मिळेल, एवढेच नव्हे तर या बदरीपुरीलाही तुझेच नाव प्राप्त होईल. राजाने ते मान्य केले व तेव्हापासून या क्षेत्राला 'विशाल बदरी' असे नामाभिधान

मिळाले. स्कंदपुराणात म्हटले आहे की, द्वापारयुगात या क्षेत्राचें नाव विशाला असे होते पण कलियुगात त्याला 'बदरिकाश्रम' म्हणू लागले.

विशाला द्वापरे प्रोक्ता, कलौ बदरिकाश्रमः।

पुराणांच्या प्रमाणानुसार प्रथम येथे बदरीनारायणाची मूर्ती नव्हती. कारण भगवान नर व नारायण पर्वतरुपानें बदरिकाश्रमात तपश्चर्या करीत होते द्वापार युगात विष्णूंनी श्रीकृष्णाचे रूप धारण केले व ते बदरिकाश्रम सोडून जाऊ लागले. तेव्हा ऋषि व अन्य देवतांनी श्रीविष्णूंना ते स्थान न सोडण्याची विनंती केली. नारदीय पुराणात असे म्हटले आहे की, भगवंतांनी त्यांना शरण आलेल्या मंडळींना आश्वासन दिले की, आपण जरी येथून गेलो तरी भक्तांना मूर्तीरुपाने येथें आपले दर्शन होईल. येथे जी अलकनंदा नदी वहात आहे तीमध्ये पाषाणाची दिव्य मूर्ती सापडेल. ती नदीतून काढून या भूमीवर तिची प्रतिष्ठापना केल्यास माझे दर्शन मिळाल्याचे समाधान मिळेल. नदीच्या नारद कुंडातून शालिग्राम दगडाची चतुर्भुज मूर्ती आणल्यावर विश्वकर्माने देऊळ बांधले व तेथे मूर्तीची स्थापना केली. मूर्तीची पूजाअर्चा भगवान नारद करू लागले. वर्षातून सहा महिने म्हणजे वैशाख ते मार्गशीर्ष, कलियुगात मानवांनी या प्रतिमेचे पूजन करावे आणि देऊळ जेव्हा हिमानें बंदिस्त होते तेव्हा सहा महिने देवतांनी श्री बदरीनारायणाची पूजा करावी अशी व्यवस्था अमलात आली. नारदीय पुराणात म्हटले आहे–

वैशाखे मासि वै देवाः गच्छन्ति निजमन्दिरम्।
कार्त्तिके तु समागत्य पुनरर्चां चरन्ति च।
ततो वैशाखमारभ्य मानवा हिमसंक्षयात्।
अतः षण्मासं दैवतैः पूजा, षण्मासं मानवैस्तथा ॥

नर नारायणांची तपश्चर्या

या पवित्र स्थानाचा विचार करता सृष्टीच्या उत्पत्तीपासून तिचा मागोवा घेता येतो. ब्रह्मदेवाचा पुत्र अयोनिसंभव दक्ष प्रजापति यांचा

विवाह मनूची कन्या प्रसूनी हिचेबरोबर झाला आणि या दम्पत्यास सोळा कन्या झाल्या. यापैकी तेरा मुलींचे विवाह धर्मांशी करण्यात आले. त्यापैकी सगळ्यात लहान पत्नी मूर्ती नावाची होती; आणि तिच्यापोटी भगवान नरनारायणांनी जन्म घेतला. श्रीमत् भागवतात या नरनारायणांचे जन्माची कथा पुढील श्लोकात वर्णिली आहे.

धर्मस्य दक्षदुहितर्यजनिष्ट मूर्ति यां ।
नारायणो नरऋषिः प्रवरः प्रशान्तः ॥
नैष्कर्म्यलक्षणमुवाच चचार कर्म ।
योऽद्यापि चास्त ऋषिवर्यनिषेधितांघ्रिः ॥

नर आणि नारायण या दोघा पुत्रांनी मातेची असाधारण सेवा केली. तीमुळे संतुष्ट होऊन आईने मुलांना हवा तो वर मागण्याचे सुचविले. नरनारायणांनी आईला म्हटले, " माताजी, आपण आमच्यावर प्रसन्न आहात. तर आम्हास घरदार सोडून जगाचे कल्याणाकरता वनात तपश्चर्या करण्याची अनुमती द्या. " हे ऐकताच मूर्ती साहजिकच विमनस्क झाली, पण शब्द गेला असल्यामुळे तिने ' तथास्तु ' म्हटले व मुलांना वनामध्ये तप आचरण्यास अनुमती दिली.

ऋषिमूनींच्या तपश्चर्येने पवित्र झालेल्या या नैमिषारण्य क्षेत्रात सरस्वती नदीच्या तीरावर उभयतांनी महान तपश्चर्या केली. साक्षात् भगवंतांचे अवतार अशा या बंधूंच्या तपश्चर्येने आसमंतात सर्वत्रांना आश्चर्य वाटले. नर–नारायण ईश्वराचे साक्षात् अंश. नराचे तपश्चर्येने नारायणांनी वर मागण्यास सुचविले. तेव्हा नर नारायणास म्हणाले, " माझ्यावर जर आपण प्रसन्न आहात, तर आपण माझे सारथीच व्हा ना ! " तेव्हा नारायण म्हणाले, " या तपस्व्याच्या वेषात सारथी होणे योग्य दिसणार नाही. परंतु पुढील जन्मी, ही तुझी इच्छा पूर्ण होईल. " द्वापारयुगात नरनारायणांनी अर्जुन व श्रीकृष्ण यांचे रूप धारण केले आणि कौरव–पांडवांच्या युद्धात अर्जुनाचे सारथ्य श्रीकृष्णांनी पत्करले ही कथा सर्वश्रुतच आहे. देवी भागवतात नर नारायणांच्या तपस्येबद्दल पुढील उल्लेख आढळतो–

नर–नारायणौ चैव चेरतुस्तपमुत्तमम् ।
प्रालेयाद्रिं समागत्य तीर्थे बदरिकाश्रमे ॥

उभयतांचे तपश्चर्येचे स्वरूप इतके जाज्वल्य झाले की इंद्रासह निरनिराळे देव भयभीत झाले. आपले आसन डळमळीत तर होणार नाही ना, अशी इंद्राला भीती वाटली. आणि या तपस्व्यांचे चित्त हरण करण्यासाठी आपल्या अधिकारातील अप्सरांचा ताफा बदरी-काश्रमाकडे पाठविला. त्या लावण्यलतिकांनी विविध प्रकारच्या नाजुक अंगविक्षेपांनी ह्या तपस्व्यांचा तपोभंग करण्याचा प्रयत्न केला. नारायणांनी काहीशा क्रोधाविष्ट नजरेने त्या अप्सरांकडे दृष्टिक्षेप करताच त्यांची घाबरगुंडी उडाली आणि नारायणांच्या तेजाने आपले भस्म तर होणार नाही ना, अशी धास्तीही त्यांना वाटली. पण आपला क्रोध आवरून सस्मित वदनाने नारायण म्हणाले, " देवींनो, घाबरण्याचे कारण नाही. आमच्या आश्रमात पाहुणचार घेऊन जा " आणि त्यांना शरमिंदे करण्यासाठी आपल्या मांडीतून श्री नारायणांनी हजारो अप्सरा एकीपेक्षा एक सुंदर अशा निर्माण केल्या. भगवान असेही म्हणाले की, " यापैकी उर्वशी या अप्सरेला इंद्राकडे घेऊन जा व आमच्यावतीने ही भेट म्हणून सांगा. " हा सर्व प्रकार इतका स्तिमित होणारा घडला की इंद्रानी पाठविलेल्या अप्सरांनी भगवंताची करुणा भाकली. तेव्हा प्रसन्न होऊन हवा तो वर मागण्यास नारायणांनी सांगितले. त्या अप्सरा म्हणाल्या की, " आम्हास दासी म्हणून स्वीकारून आमचा उद्धार करावा. " नारायण उत्तरले, " तपस्व्यांचे वेशात हे शक्य होणार नाही परंतु श्रीकृष्णावतारी गोपी म्हणून तुमची सेवा मला घेता येईल. "

कालिदासाच्या ' विक्रमोर्वशीयम् ' नाटकात नारायण कन्या उर्वशीचा उल्लेख या संदर्भात सहज लक्षात येतो. पुरूरवा उर्वशीवर मोहित झालेल्या मनःस्थितीत म्हणतो-

अस्याः सर्गविधौ प्रजापतिरभूत् चंद्रो नु कान्तिप्रदः ।
शृंगारैकरसः स्वयं नु मदनो मासो नु पुष्पाकरः ॥
वेद्याभ्यासजडः कथं नु विषयव्यावृत्तकौतुहलः ।
निर्मातुं प्रभवेन् मनोहरमिदम् रूपं पुराणो मुनिः ॥

तात्पर्य, साक्षात नारायणांनी आपल्या उरुपासून निर्माण केलेल्या उर्वशीबद्दल विक्रम राजानें वरील काढलेले आश्चर्योद्गार त्याच्या अज्ञानाचे द्योतकच म्हणावयाचे. असे आहे या तपोभूमीचे महत्त्व. पद्मपुराणात या तपोभूमीत नित्य कोणती धार्मिक कृत्ये चालत त्याचे पुढीलप्रमाणें वर्णन केले आहे—

तत्र देवा वसन्तीहऋषीणां चाश्रमास्तथा।
अग्निहोत्राणि वेदानां ध्वनिः प्रश्रूयते सदा ।।

बदरीतपोभूमीबद्दल श्रीमत भागवत, वराहपुराण, ब्रह्मांडपुराण, स्कंदपुराण इ. विविध ग्रंथांतून वैशिष्टचपूर्ण वर्णने आली आहेत परंतु विस्तारभयास्तव ती येथे देत नाही.

महाभारतातील वनपर्वांत या पुण्यभूमीबद्दल पुढील माहिती वर्णिली आहे—

' यत्र नारायणो देवः परमात्मा सनातनः।
तत्र कृत्स्नं जगत् सर्वं तीर्थान्यायतनानि च ।
तत् पुण्यं परमं ब्रह्म तत् तीर्थं तत् तपोवनम् ।
तत् परं परमं देवं भूतानां परमेश्वरम् ।।

केदारखंड व स्कंदपुराण यात साहजिकच या क्षेत्राचे वर्णन जास्त विस्ताराने केले आहे.

श्री बदरीनाथाच्या यात्रेचे महत्त्व स्कंदपुराणात पुढीलप्रमाणें वर्णिले असून यात्रेची फलश्रुतीही सांगितलेली आहे.

ततो ऽ हं यति—रूपेण तीर्थान्नारद—संज्ञकात् ।
उद्धृत्य स्थापयिष्यामि हरिं लोकहितेच्छया ।।
यस्य दर्शनमात्रेण पातकानि महान्त्यपि ।
विलीयन्ते क्षणादेव सिंहं दृष्ट्वा मृगा इव ।।

नर आणि नारायण ह्यांचेमधील पवित्रक्षेत्रांत बदरी-नारायणाची उभारणी झाली असल्यामुळे ही सर्वच क्षेत्रे मंगलमय समजली जातात आणि त्यानुसार क्षेत्रांतर्गत कितीतरी पवित्र स्थानें पहावयास मिळतात. सकाळी बदरीनारायणाचे देवळानजीक तप्त-

कुंडात यात्रिक मोठ्या हौसेने स्नान करतात. पुरुष आणि स्त्रिया यांच्यासाठी शेजारी शेजारी दोन गरम पाण्याची कुंडे असून तेथे यात्रेकरूंची एकच गर्दी होते. या कुंडाला अग्नितीर्थ अशीही संज्ञा आहे. या अग्नितीर्थाची कथा पुराणात वाचावयास मिळते ती मनो-वेधक म्हटली पाहिजे. महर्षि भृगु यांचे पत्नीवर एका राक्षसाचा तिच्या कुंवार अवस्थेपासूनच डोळा होता. एकदा भृगुमुनी बाहेर गेले असता राक्षसाने आश्रमात प्रवेश केला, आणि तेथे प्रज्ज्वलित असलेल्या अग्नीसमक्ष भृगुच्या गरोदर पत्नीचे हरण केलें.

बिचारी भृगु पत्नी वाटेतच प्रसूत झाली व तिनें बालकाला जन्म दिला. तोच पुढे महर्षि च्यवन म्हणून ज्ञात झाला. बालकाने राक्षसाकडे पहाताच त्याच्या तेजाने राक्षस भस्म झाला. इकडे आपली कामे आटोपून भृगु ऋषी आश्रमाकडे आले, तेव्हा पत्नी दिसेना हे पाहून ते चिडले. अग्नीला या संबंधी विचारता त्याने घडलेली हकीगत सांगितली तेव्हा भृगुऋषी संतप्त होऊन त्यांनी शाप दिला अग्नीला–ज्या अर्थी तुझ्या साक्षीने राक्षसाने हा अत्याचार केला त्याअर्थी ह्यापुढे तू भेटशील त्यांना आगीने खाऊन टाकशील.

त्यामुळे अग्निदेव दुःखी होत्साते या शापातून सुटका करण्यासाठी प्रयत्नशील झाले. याच सुमारास प्रयाग येथील दशाश्वमेधेश्वर शंकराच्या मंदिरात ऋषीमुनींची परिषद भरली होती, भगवान व्यासांचे अध्यक्षतेखाली. अग्निदेव त्या ठिकाणी उपस्थित होते व त्यांनी मिळालेल्या शापातून आपली मुक्ति होण्यासाठी उपाय सुचविण्याची विनंती केली. तेव्हा भगवान व्यासांनी बदरीकाश्रमास गेल्यास शापातून मुक्त होशील असा अग्नीला आशीर्वाद दिला. बदरीकाश्रमात जाऊन अग्नीने तप केले तेव्हा भगवान विष्णू संतुष्ट झाले आणि त्यांनी वर मागण्यास सुचविले. भृगूने दिलेल्या शापातून आपण मुक्त व्हावे अशी प्रार्थना करताच भगवान 'तथास्तु' म्हणाले. परन्तु त्यांनी असेही सांगितले की, शापमुक्त झाल्यावरही अग्नीने जलकुंडाचे रूपाने या पुण्यक्षेत्रीच वास्तव्य करून इतरेजनांना तेथे स्नान केल्यास पापमुक्ती द्यावी. साहजिकच श्रद्धाळूंची धारणा आहे

हिमालयातील

की, या अग्निकुंडात स्नान केल्याने पापापासून मुक्ती मिळते. नारद-पुराणांत म्हटले आहे की,

चान्द्रायणसहस्त्रैस्तु कृच्छै: कोटिभिरेव च ।
यत् फलं लभते मर्त्यस्तत्स्नानात् वन्हितीर्थत: ॥

पवित्र पंचशिला

या कुंडानजिकच पाच पवित्र शिला आहेत. त्यांना नारद, नृसिंह, वराह, गरुड आणि मार्कंडेय ह्यांची नावे दिली आहेत. या पंचशिलाशी सध्याच्या राजकीय परिभाषेत ख्यात असलेल्या पंच-शिलेशी काही संबध नाही. अलकनंदेच्या काठीं एका शिलाखंडावर भगवान नारदांनी श्रीनारायणाचे दर्शनाचा लाभ व्हावा म्हणून प्रतिकूल हवामानात अन्न वर्ज्य करून साठ हजार वर्षे तपश्चर्या केली. तेव्हा भगवान विष्णु प्रसन्न झाले व ब्राह्मणाचे रूप घेऊन नारदाचे सन्मुख आले. ब्राह्मणाने नारदांना तपश्चर्येचे कारण विचारले आणि ते समजताच चतुर्भुज विष्णूचे साक्षात स्वरूप नार-दास दर्शवून त्यांना कृतकृत्य केले. नारदशिला व त्याशेजारी नारद कुंड यांचा मुमुक्षूंना लाभ होत आहे त्याचे कारण नारदांनी श्री विष्णूची अशी प्रार्थना केली की आपले स्थान नारायणाचे जवळच रहावे आणि जेथे नारदांनी तपश्चर्या केली त्या ठिकाणी येणाऱ्या भाविकांना व जवळच्या कुंडात स्नान करणाऱ्यांना पापमुक्ती मिळावी. श्रीनारायणानी नारदाला पुढील आशीर्वाद आकाशवाणीनें दिला.

एवमस्तु तव स्नेहात्तव तीर्थे वसाम्यहम् ।
चराचराणां जन्तूनां विदेहाय न संशय: ॥
गृहणीध्वं मामकीं मूर्ति, शैले नारदकुण्डगाम् ।
(' नारद पुराण ')

अलकनंदेच्या डाव्या बाजूस सध्याच्या पुलाखाली जी शिला दिसते तिला म्हणतात नृसिंहशिला. हिरण्यकश्यपूच्या वधानंतर संतप्त झालेल्या भगवान नृसिंहाचे स्वरूप पाहून देवदेवता भयभीत झाल्या व त्यांनी सामुदायिक प्रार्थना केली, की नृसिंहाचे अक्राळ

विक्राळ स्वरुप श्री विष्णूंनी टाकावे व भक्ताच्या हृदयात श्रीविष्णूची जी मूर्ति वास करिते त्याप्रमाणें ते व्हावे. संतापाने तापलेल्या भगवंतांनी ही प्रार्थना मान्य केली व अलकनंदे नजिकच्या थडगार ठिकाणी वास्तव्य करण्यासाठी प्रस्तुत शिला शोधून काढली म्हणून तिला पुढे नाव पडले नृसिंह शिला.

वाराह अवतारी श्रीविष्णूंनी डुकराचे स्वरूप घेऊन पाताळा-तील हिरण्याक्ष राक्षसाला ठार करून पुन्हा ते पृथ्वीवर आले व अलकनंदेच्या काठी स्थित झाले या शिलेवर. म्हणून तिला वाराह शिला असे म्हणतात. या शिळेचा आकार डुकरासारखा दिसतो.

आदिकेदारेश्वराच्या मंदिरालगत यात्रिकांना गरुड शिला आढळते. या ठिकाणी गरुडांनी श्रीं विष्णु प्रसन्न व्हावेत म्हणून घोर तपश्चर्या केली. त्यामुळे विष्णु प्रसन्न झाले तेव्हा गरुडाने वर मागि-तले ते असे– गंधर्वादि देवतापासून आपण अजिक्य राहू, बदरिका-श्रमाजवळ आपल्या नावानें जी शिळा दिसेल तिच्या स्मरणाने सुद्धा मनुष्यावर विषाचा परिणाम न होंवो आणि श्री विष्णूनी आपणास त्यांचे वाहन करावे. श्री विष्णुनी गरुडाच्या तीनही इच्छा पूर्ण केल्या. या शिळेच्या आसपास रहाणाऱ्यांना सर्प चावू शकत नाही असा समज आहे.

श्री मार्कंडेयाची कथा सुप्रसिद्धच आहे. अल्पायुषी होणार असे प्राक्तनात ठरलेल्या मार्कंडेयाने तीव्र तप केले व भगवान विष्णूचे आशीर्वादाने कित्येक कल्पाचे आयुष्य मिळविले. मथुराक्षेत्री नारदांची व त्यांची भेट झाली असताना बदरी आश्रमाचे महात्म्य नारदांनी मार्कंडेयांच्या मनावर बिंबविले आणि त्याक्षेत्री प्रस्तुत शिलेवर तप-श्चर्या करून मार्कंडेयांनी नारायणाकडून वरदान मिळविले. आपल्या नावाच्या शिलेजवळ नारायणाचे सदैव वास्तव्य राहो असा मागित-लेला वर श्री विष्णूंनी त्याला दिला.

अग्निकुंडात स्नान केल्यानंतर आम्ही वरील शिलांची दर्शने घेतली व पंड्याचे सांगण्याप्रमाणे ह्या पवित्र क्षेत्राचे भूमीचे पूजन सामुदायिक रीत्या केले. २५–३० मंडळीच्या दोन तुकड्याकडून,

ब्राह्मण भूमीची पूजा यथा सांग करून घेत होते. सामुदायिक पूजा करतांना वेळ वाचत असला तरी व्हावी तशी एकाग्रता मिळत नाही; व कधी कधी झटपट रंगारीपणाही होतो.

ब्रह्मकपाल तीर्थ

पूजेनंतर आमच्यापैकी कित्येकजण अग्निकुंडापासून सुमारे ४०० फूट अंतरावर असलेल्या ब्रह्मकपाल क्षेत्राकडे श्राद्धविधीसाठी गेले. या ब्रह्मकपाल तीर्थाचा पुराणांतरीचा इतिहास मनोवेधकच म्हणावयाचा. स्कंद पुराणात ती कथा विस्ताराने दिली आहे. सृष्टीचा उत्पत्तिकर्ता ब्रह्मदेव त्याचीच कन्या सरस्वती इजवर मोहित झाल्यामुळे श्री शंकर संतापले व त्यांनी ब्रह्मदेवाचे एक तोंड छाटून टाकले. परन्तु हे कापलेले शिर शंकराचें हाताला चिकटले आणि ब्रह्महत्येच्या पापामुळे ते वणवण फिरू लागले. अखेर ब्रह्महत्येच्या ह्या पापातून मुक्त होण्यासाठी श्री शंकर बदरिकाश्रमाकडे आले. चमत्कार असा झाला की सध्या ज्ञात असलेल्या ब्रह्मकपाल या ठिकाणी शिवाचें हाताला चिकटलेले ब्रह्मदेवाचें शीर गळून पडलें आणि शंकर पापमुक्त झाले. पद्मपुराणातही या संबंधात कथाभाग आला आहे. ब्रह्मदेवाला प्रथम पाच मुखे होती. परन्तु त्यातील एक मुख शिवाच्या हस्ते काटले गेले यासंबंधात विविध कथा प्रचलित असल्या तरी या ब्रह्महत्येपासून श्री शंकर ह्या ठिकाणी पापमुक्त झाले ह्या निष्कर्षात मतभेद नाहीत. जी मंडळी ब्रह्मकपाल तीर्थांत पूर्वजांची श्राद्धे करतात त्याचे पितर स्वर्गांत तर जातातच परंतु त्यांना पुन्हा आप्तेष्टांची श्राद्धे करण्याची आवश्यकता उरत नाही असे सांगितलें जाते. ह्या संबंधात स्कंद पुराणात पुढीलप्रमाणे आधार मिळतो.

> **श्राद्धं कृत्वा विशालायां, पितॄमुद्दिश्य मामापि ।**
> **अन्यतीर्थे नच श्राद्धं केवलं तर्पणं चरेत् ॥**
>
> **पितॄणां वत्सरे प्राप्ते न पिंडं कारयेत्सुधीः ।**
> **कृते तु पिण्डदानेन रौरवं नरकं व्रजेत् ॥**

पिण्डं विधाय विधिवत् नरकात् त्रायते पितृन् ।
पितृतीर्थमिदं प्रोक्तं गयातो ऽष्टगुणाधिकम् ।।
(स्कन्द पुराण)


ब्रह्मकपाल तीर्थावर पितरांची श्राद्धादि कर्मे केली तर पुन्हा अन्य क्षेत्री किंवा घरी श्राद्ध करण्याची आवश्यकता उरत नाही; असे सांगण्यात येते. ही कर्मे करणाऱ्या तेथील ब्राह्मणांचे असेच म्हणणे पडले परंतु पुढील प्रवासात गया क्षेत्री गेलो असता तेथील ब्राह्मणानी या संबंधात गयेला अग्रस्थान असल्याचे सांगितले आणि ब्रह्मकपाल येथे श्राद्ध केल्यावरही पितृगयेस तीं करणे शास्त्रविहित असल्याचे समर्थन केले. मला वाटते मातृगयेतील भटजींचाही त्यांच्या तीर्थाबद्दल या प्रकारचा आग्रह असावा. या मतभेदामागे आर्थिक हितसंबंधापलिकडे विशेष तात्पर्य नसावे कारण पुण्यातील आमच्या घराण्याचे वेदमूर्ती पुरोहितांनी असे सांगितले की, श्राद्धतिथी पाळणे हे विहित कर्मच आहे आणि वरील तीर्थांचे ठिकाणी श्राद्ध केल्यावरही घरीं पिंड श्राद्ध किंवा साधें श्राद्ध करणे शास्त्र विहितच ठरेल. या मतभेदातून व्यावहारिक निष्कर्ष असा काढण्यास हरकत नाही. की श्राद्ध हा आई-वडिलांचा स्मृति दिन असल्यामुळे तो पुराणोक्त मार्गाने पाळावा पण वरील तीर्थात ही क्रियाकर्मे केली असली तर पिंडदान त्या कर्मातून वगळण्यात हरकत नाही.

वसुधारा–पाप्यांना लाभ नाही

बदरीनाथाच्या आसमंतातील काही पवित्र स्थानांचाही थोडासा परामर्श घेऊ या. श्रीबदरिकाश्रमापासून ५ मैलावर वसुधारा तीर्थ तेथील प्रेक्षणीय ‘ वसुधारा ’ नावाच्या धबधब्याने प्रसिद्ध झाले आहे. उंचीने बदरीनाथाहून सुमारे १६०० फूट अधिक अशा पर्वताच्या कड्यावरून ४०० फूट खोल दरीत पांढरा शुभ्र जलप्रवाह उडी घेतो त्यामुळे तेथील निसर्गाचे दृश्य मोठे लोभनीय दिसते. या धबधब्याचे आसपास येताच यात्रिकाचे अंगावर पडणाऱ्या तुषारांनीं त्याचे मन प्रसन्न होते. पण स्कंद पुराणात म्हटले आहे की पापी

माणसाच्या अंगावर या पवित्र जलप्रपाताचे थेंबही पडू शकत नाही. पुराणात या तीर्थाचेही महत्त्व पुढील कारणावरून असल्याचे सांगितले आहे. श्रीबदरिकाश्रमाचे माहात्म्य श्रीनारदाचेकडून अष्टवसूंनी ऐकले आणि त्यांनी या ठिकाणी येऊन तपश्चर्या केली व नारायणाकडून वरदान मिळविले. पापी लोकांना ह्या तीर्थाजवळ स्थान नाही असे वर म्हटले त्याला स्कंदपुराणातून पुढील आधार मिळतो.

ये ऽ शुद्धपितृजा: पापा: पाखण्डमतिवृत्तय: ।
न तेषां शिरसि प्राय: पतन्त्याप: कदाचन ॥



वसुधारा

बदरीनाथाच्या देवालयापासून दोन मैलावर श्री विष्णुचे चरण पादुका स्थान येते. तेथून उर्वशी कुंडाला जाण्याचा मार्ग आहे. नारायणाच्या मांडीतून उर्वशीचा जन्म झाला ही कथा पूर्वी दिलीच

आहे, त्या प्रसंगाची स्मृति उर्वशी कुंडामुळे होते. परंतु तेथे जाण्याचा मार्ग दुष्कर आहे.

नरपर्वतावर १४२०० फूट उंचीवर भ्यूडार गावी लोकपाल नावाचे पवित्र तीर्थ आहे. या क्षेत्रातील पुष्करिणी डोळयाना आल्हाद देतात. निसर्गाच्या विविध छटा या क्षेत्रात पहावयास मिळतात.

लोकपालजीचे आदिमंदिर प्राचीन आहे. भगवान विष्णूनी या ठिकाणी लोकपालाची नेमणूक केली तेव्हा तेथे पाण्याची सोय नव्हती; तेव्हा विष्णूनी तेथे दोन अडीच मैल लांबी रुंदीचे 'हेमकुंड' नावाचे सरोवर निर्माण केले. असे म्हणतात की, प्रभू रामचद्राच्या आज्ञा लक्ष्मणाकडून दोनदा नाइलाजाने पाळल्या गेल्या नाहीत, त्यावेळेस रामाच्या आज्ञेवरून गंधमादन पर्वतावरील लोकपाल क्षेत्री श्री लक्ष्मण समाधिस्त होऊन पापमुक्त झाले. कृष्णावतारी लक्ष्मणाने बलरामाचा जन्म घेतला हे सर्वश्रुतच आहे.

लोकपाल देवालयापासून थोडया अंतरावर शिखांचे गुरुद्वार असून गुरुगोविंदसिंहाशी या स्थानाचा निकटचा संबंध लागतो. कित्येक शीख धर्मीय या स्थानाची यात्रा करतात.

हेमकुंडामध्ये कमळाची रेलचेल पहावयास मिळते तर तेथून जवळच भ्युडार खोऱ्यात हिमालयीन चित्रविचित्र फुलझाडांचे भांडार Valley of flowers पाहून मन तृप्त होते. कित्येक फुलाचे शौकिन, परदेशी प्रवासी या ठिकाणी येऊन विविध फुलझाडांचे नमुने संग्रहित करून परदेशी पाठवितात. ह्या खोऱ्यातील फुलांचे नैसर्गिक उद्यान १६७०० फूट उंचीवर असल्याने त्याचा आगळेपणा सिद्ध होतो. मिस्टर स्मिथ नावाच्या एका इंग्रजाने या फुलांचे प्रदेशा संबंधी Valey of flowers नावाचे पुस्तकही लिहिले आहे. काहीना फुलाचे वेड किती असते याची साक्ष १९४० साली कुमारी जीन लेग ह्या प्रस्तुत पुष्प वाटिकेत फुले टिपण्यास आल्या असताना त्यांना घडलेल्या अपघातावरून लक्षात येईल. एक दिवस निरनिराळ्या फुलांचे नमुने खुडत असता ही तरुणी पहाडावरून घसरून मृत्युमुखी

हिमालयातील

पडली ही घटना दुर्दैवी खरीच. या खोऱ्यात प्रस्तुत तरुणीच्या नावाचे थडगेही पहावयास मिळते.

बादरायण संबंध

बदरीनाथ क्षेत्राचे नावातील बदरी (म्हणजे बोरीचे झाड) येण्याचे कारण श्री नारायणांनी जेव्हा या काहीशा निर्जन क्षेत्रात घोर तपश्चर्या चालू केली तेव्हा हिम, आतप इ, नैसर्गिक त्रासापासून त्यांचे संरक्षण करण्याकरीता लक्ष्मीने पल्लवित बोरीच्या झाडाचे रूप घेतले आणि त्यांना निवारा दिला. आमच्या यात्रिक गटातील काही प्रवासी जेव्हा या स्थानाचा 'बद्री बद्री' असा उच्चार करीत तेव्हा मी त्यांना 'बदरी' हा शब्द शुद्ध असल्याचा निर्वाळा दिला आणि थट्टेने म्हटले की तुमचा आणि आमचा बादरायण संबंध प्रस्थापित झाला आहे. ते कसे काय असे म्हणताच अस्मादिकांनी म्हटले की या विषयी पुढील चुटका गमतीदार वाटेल – खेडेगावात दोन ग्रामीण पण संस्कृतज्ञ मित्र बोलत होते, आणि एक दुसऱ्यास म्हणाला,

'अस्माकं बदरीचक्रं युष्माकं बदरीतरुः' यामुळे आपल्यात बादरायण संबंध आला आहे. एकाच्या बैलगाडीला बोरीच्या झाडाचे लाकूड वापरले गेले आणि दुसऱ्याच्या मालकीचे बोरीचे झाड आहे म्हणून झाला हा बादरायण संबंध. मीही आमच्या सहप्रवाश्यांना म्हटले की आपण साक्षात बदरीनारायणांचे सहदर्शन घेतले तेव्हा आपलाही बादरायण संबंध सिद्ध झाला. असो.

बदरिकाश्रमाची यात्रा करताना साहजिकच ग्रामस्थ पंड्यांचे कडून निरनिराळ्या दानांचा आग्रह करण्यात येतो व कित्येकदा मागचा पुढचा विचार न करता यात्रिक फसतातही. कधी कधी पंडे आपण यात्रिकाचे सोयीसाठी यात्रिक ज्या समाजातून आला असेल त्यांचे करिता धर्मशाळा बांधीत असल्याचे सांगून पावती पुस्तक पुढे करतो. या संभाव्य वास्तूचा मालक तो स्वतःच होणार असतो पण ४–५ नावे विश्वस्तासारखी दिसावीत अशी घेतली जातात आणि ३–४ आकडी रक्कम यात्रिकांनी द्यावी असा आग्रह होतो.

तेव्हा अधिक खोलवर चौकशी केल्याखेरीज मुक्तदान करणे बावळट पणाच. या संबंधात माझे मित्र श्री. पुंडलिकजी कातगडे हे प्रस्तुत यात्रेस आले असता त्यांना मिळालेला कटु अनुभव डोळे उघडणारा आहे. एका पंड्याने त्यांना गाठून विश्वास दिला की हजार हजार रुपये दिल्यास त्यांच्या व कै. गंगाधरराव देशपांडे यांच्या नावाने दोन खोल्या नियोजित धर्मशाळेत बांधू व त्यांच्या नावाच्या संगमरवरी पाटच्या त्या खोल्याना लावण्यात येतील. सर्व भारतवर्ष फिरलेल्या पुंडलिकजींनाही हा सौदा स्वस्तात वाटला आणि त्यांनी रक्कम देण्याचे मान्य केले. पुढे त्याचेकडे पंड्यानें नाव कोरलेल्या संगमरवरी पाटचा दोन खोल्यांवर लाविलेल्या घराचे फोटोही पाठविले आणि पंड्याकडे आश्वासित रक्कम जमाही झाली. पुढे काही कालाने यात्रेस गेलेल्या पुंडलिकजींच्या स्नेह्याना त्यांनी ह्या खोल्या पाहून येण्यास सुचविले पण तेथे कशाचाच पत्ता नव्हता. मागाहून लक्षात आले की या प्रकारची फसवणूक करण्याचा या पुण्य-क्षेत्रीही काहींचा धंदाच आहे !

यमुनोत्तरी

उत्तराखंडातील केदारनाथ, बदरीनाथ या प्रमाणेच गंगोत्तरी व यमुनोत्तरी ह्या तीर्थांची यात्रा कित्येक प्रवासी करतात. ऋषिकेशहून देवप्रयागला आल्यावर एक फाटा फुटतो, तो यमुनोत्तरीकडे जातो देवप्रयागपासून सुमारे १०८ मैलावरील यमुनोत्तरीकडे या वेगळ्या रस्त्याने जाता येते. या रस्त्यावर वाटेत नरेन्द्रनगर हे शहर लागते. महाराजा नरेन्द्रशहाने १९२५ साली ते वसविले. जिल्ह्याची राजधानी टिहरी ही याच मार्गावर आहे. बसमार्ग सियानाचट्टी या ७००० फूट उंचीवरील गावापर्यंत जातो व तेथून १८ किलोमिटर प्रवास पायी अगर अन्य साधनाने करावयाचा. सियानाचट्टीहून यमुनोत्तरी पर्यंतचा चढाव आणखी सुमारे ४००० फूट आहे. १०९०० फूट उंचावरील या तीर्थापासून यमुनेचा उगम होतो. कालिंद पर्वतातून यमुना प्रगट होते म्हणून म्हणतात तिला कालिंदी. यमुनेसंबंधी कूर्म पुराणात पुढील उल्लेख आढळतो.

तपनस्य सुता देवी त्रिषु लोकेषु विश्रुता ।
समागता महाभाग यमुना तत्र निम्नगा ।।
येनैव निःसृता गंगा तेनैव यमुनागता ।।
योजनानां सहस्रेषु कीर्तनात् पापनाशिनी ।।

यमुनेचा प्रवाह एका गुंफेतून येतो तेथे तिची एक मूर्ति प्राचीन काली वसविली होती नंतर टिहरीचे राजे महाराजा सुदर्शन शाह यांनी तेथे छोटेसे मंदिर बांधले आणि कालांतरानें तीन मजली मंदिर उभारण्यात येऊन देवळाचे तिसऱ्या मजल्यावर रुद्रमालेची प्रतिष्ठापना करण्यांत आली. येथेही एक उष्ण पाण्याचे कुंड असून एका बाजूला बर्फ व दुसऱ्या बाजूला गरम पाण्याचा झरा असा विरोधाभास निर्माण होतो.

वरुणावत पर्वतांवरील वाराणसी किंवा **उत्तरकाशी** हे क्षेत्रही सुप्रसिद्ध आहे. येथील परशुराम, विश्वनाथ इ. ची मंदिरे प्राचीन असून चिनी प्रवासी ह्यू-एन-त्संग याने ६व्या शतकांत या ठिकाणाला भेट दिल्याचा उल्लेख आहे. भागीरथीच्या तीरावरील विश्वनाथाचे मंदिर स्वयंभू समजले जाते. दुर्योधनाने पांडवांना नष्ट करण्याकरिता या गावीच लाक्षागृह उभारल्याचा उल्लेख आहे. उत्तर काशीतील श्री परशुराम मंदिर त्याच्या चरित्रांतील अविस्मरणीय कथाभागाने या स्थानाचे महत्त्व वाढवितो. गंगोत्तरी व यमुनोत्तरी या दोन्हीही यात्रांची तयारी करण्यास उत्तरकाशी हें महत्वाचे स्थान असून गंगोत्तरीला जाण्यासाठी येथेंच परवाना काढावा लागतो. ऋषिकेशपासून धरासु पर्यंतच गंगोत्तरी व यमुनोत्तरीसाठी जाण्याचा एकच मार्ग आहे परंतु तेथून दोन्हीं नद्यांच्या उगमांकडे जाण्यास वेगवेगळे रस्ते फुटतात.

श्रीगंगोत्तरी

उत्तरकाशी पासून सुमारें १०० कि. मी. वर गंगोत्तरी येते. गंगावतरणाची सर्व कथा कादंबरीपेक्षांही मनोवेधक. राजा भगीरथाने पितरांचे उद्धारासाठी गंगेला स्वर्गातून खाली आणले तेव्हां जन्हु ऋषीच्या आश्रमाकडे त्या पाण्याचा लोंढा गेला. ते पाहून ऋषी संतापले व गंगेला पिऊन टाकले त्यांनी. अखेर भगीरथानें आपल्या

विनयाने ऋषींचा राग घालविला. तेव्हां जन्हुने दोन्ही कानातून गंगेचे पाणी सोडून दिले म्हणून गंगेला जान्हवी असे नांव मिळाले. श्रीमत् भागवतात उल्लेख आहे कीं भगवान विष्णूंच्या डाव्या पायाचे अंगठ्यातून गंगा प्रगट झाली व ती पुढे जगांतील पापांचा नाश करण्यासाठीं स्वर्गांतून हिमालयांत अवतरली.

श्री गंगोत्तरी हे स्थान १०,००० फूट उंचावर असून भागीरथीच्या डाव्या किनाऱ्यावरील देवालयांत गंगेची सुवर्णमूर्ती भक्तांना प्रसन्न करते. सध्यांचे मंदिर जयपुरचे महाराज अमरसिंह यांनी बांधलेलें आहे. गंगोत्तरीपासून १ मैलावर गौरीकुंड हे महत्वाचे समजलें जाते कारण तेथेंच फार उंचावरून गंगेचा प्रपात पडतांना आढळतो. कुलूगंगेत भगीरथ शिलेवर पिंडदान केले जाते. राजा भगीरथानें याच शिळेवर तपश्चर्या करून गंगेला प्रसन्न करून घेतले.

गोमुख व गोस्तरी

ऋषींचे कुळ आणि नदीचे मूळ शोधणे तसे म्हटले तर दुरापास्तच.गंगोत्रीला भागीरथीचा उगम म्हणतात पण तेथूनही आणखी १२ मैल चढण घेतल्यावर गोमुख नावाच्या स्थानातून गंगा प्रथम निघाली. हे स्थान १२७७० फूट उंचीवर आहे. गोस्तरी ही हिम नदी गुंफेतून गोमुखाचे द्वारे प्रगट होते व पुढे ती गंगोत्रीकडे जाते असे दिसते. ही हिमगंगा स्वर्गारोहण पर्वतातून खाली उतरताना आढळतें. हा सर्वच प्रदेश हिमाने वेष्टित असल्यामुळे जाण्यास दुरापास्त आहे. कलियुगात मानवाच्या उद्धाराकरिता गंगा स्नानासारखे अन्य साधन नाही असे म्हटले जाते. चारही प्राचीन युगातील पुण्यकारी तीर्थांचा निर्देश स्कंद पुराणात पुढीलप्रमाणे केला आहे :—

विससर्ज ततो गंगां हरो बिन्दुसरः प्रति ।
तस्यां विसृज्यमानायां सप्तस्रोतांसि जज्ञिरे ॥

हिमालयातील यात्रा एकंदरीत अवघडच, त्यामुळे पूर्वी ह्या स्थळाना भाविक निघत तेव्हा आप्तेष्टांचा कित्येकदा अखेरचा निरोप घेत. वृद्ध स्त्री पुरुष इहलोकातील सर्व आशा आकांक्षा फलद्रूप

हिमालयातील

झाल्यावर आपल्या देवतांचे अखेरचे दर्शन हिमालयातील पावन क्षेत्री घेऊन तेथे देह ठेवावा ह्या इच्छेनेही कित्येकदा येत. रघुराजाप्रमाणे- 'योगेनान्ते तनु त्यजाम्' अशा प्रकारची धारणाही काही पुण्यशील व्यक्तींची असते. परंतु सध्या प्रवासाच्या सुखसोयी बऱ्यापैकी झाल्याने यात्रांतर्गत सहलीचा आनंदही उपभोगण्याची मनोवृत्ती बळावत चालली. दुर्गम तीर्थक्षेत्रे सुगम झाली व हिमालयातील निसर्ग सौंदर्याचा आगळा अनुभव घेण्यास तरुण मंडळीही पुढे येऊ लागली. एका परीने 'अंगं गलितं पलितं मुंडम् दशनविहीनम् जातं तुण्डम्' अशा प्रकारचे वृद्ध यात्रा करू लागले म्हणजे 'करून करून भागले आणि देवपूजेला लागले', असा प्रवादही ऐकू येतो. तसे म्हटले तर शरीर धडधाकट असताना हिमयुक्त प्रदेशातील संचार जितका रोमहर्षक व आल्हादकारक तितकी जीवनाच्या 'नर्मदायाः उत्तरे तीरे' गेलेल्यांना अशी यात्रा सुफल होणे अवघड. परंतु 'अकरणात् मंदकरणं श्रेयः' या न्यायाने तरुणपणी जमले नाही तरी वृद्धापकाळी ह्या आध्यात्मिक सुखापासून कोणी वंचित न होणेच चांगले.

कैलास मानसरोवर

पूर्वी हिमालयातील यात्रामध्ये कैलास, मानसरोवराचे यात्रेचाही अंतर्भाव होत असे. सध्या हा भाग तिबेटच्या म्हणजे चीनच्या ताब्यात असल्यामुळे भारतीय प्रवाश्यांना तिकडे सहजासहजी जाणे शक्य होत नाही. ही सर्व यात्रा पायी किंवा याक ह्या जनावराच्या पाठीवरून करावी लागते. तिकडे जाण्यास निरनिराळे मार्ग असून यात्रेकरूच्या सोयीप्रमाणे श्रीशंकराचे वास्तव्य असलेल्या ह्या क्षेत्राकडे जाता येते. गंगोत्रीपासून निलंग घाटातून, जोशी मठाहून दमचंग, चोरहोती, निती ह्या तीन विभिन्न घाटातून आणि बदरिनाथापासून मानाखिडीतून मानसरोवराकडे जाता येते. मानसरोवर १४९५० फूट उचीवर असून त्याला प्रदक्षिणा घालण्यासाठी ५४ मैल चालावे लागते. कैलासपर्वत तर २२२०८ फूट उंचीचा असून त्याच्या सभोवती जाण्यासाठी ४६ मैलाची परिक्रमा करावी लागते.

ह्या स्थळी अनेक पवित्र गुंफा असून काहींच्यातील पाली भाषेतील पुस्तके पहाण्यासारखी आहेत. कैलास, मानसरोवरासंबंधी प्रत्यक्ष ही यात्रा केलेले आमचे एक स्नेही श्री. पं मु. डांगरे ह्यांचा ह्या यात्रावर्णनाचा विस्तृत लेख दीपमालेच्या पहिल्याच वर्षीच्या अंकात (सन १९५३ मध्ये) प्रसिद्ध झालेला कित्येकांनी वाचला असेल. त्यावेळी तिबेट स्वतंत्र होता, आणि त्या लामांच्या राज्यात भारतीयांना मुक्त पणे संचार करता येई. पण आज बिचारे लामाच देशोधडीला लागले 'कर्मणो गहना गतिः'

उत्तराखंडातील यात्रा नऊ दिवसात आटोपून आमची मंडळी दि. २६ मे १९७५ रोजी सायंकाळी ऋषिकेशला परत आली. वैशाखाचा शुक्ल पक्ष संपून कृष्ण पक्ष आता सुरू झाला उत्तराखंडातील बसचें मार्ग नागमोडी व अरुंद असल्यामुळे या सर्व बस प्रवासात अधून मधून धोक्याची जाणीव व्हायची. अलिकडेच जोशी मठाच्या पुढे एक बस कोसळून ती मधील सर्व उतारू ठार झाल्याचे वृत्त वाचकांनी पाहिलेच असेल. त्यामुळे ऋषिकेशला आम्ही सुखरूप पोहोचलो तेव्हा सर्वांनी समाधानाचा सुस्कारा सोडला आणि श्री बदरीकेदारांना आम्ही धन्यवाद दिले.

ऋषिकेशहून हरिद्वारला परतताना आमच्या प्रवासाचा तिसरा टप्पा सुरू झाला. दि २७ मे रोजी ऋषिकेशहून आम्ही निघालो तो थेट दुसऱ्या दिवशी सकाळी लखनौला पोहोचलो. या शहराला माझी ही तिसऱ्यांदा भेट. सौ. ठाकूर लखनौला प्रथमच येत होत्या. त्यामुळे त्याना व आमच्या निवडक मित्रांना घेऊन टांग्यातून आम्ही शहराचा फेरफटका केला. भारतातील अति सुंदर शहरात लखनौचा समावेश होतो.

उद्यानांची नगरी–लखनौ

लखनौला 'उद्यानांची नगरी' असेही म्हणतात आणि अशा कित्येक वास्तू येथे आहेत की ज्या शहराच्या ऐतिहासिक वैभवाची साक्ष देतात. गोमतीच्या दोन्ही बाजूना वसलेले हे शहर उत्तर प्रदेशची

राजधानी आहे. रामायणातील लक्ष्मणाच्या नावावरून लखनौ हे नाव पुढें रूढ झाले असे वाटते.

मुघल साम्राज्य विस्कळित झाल्यामुळे औध (अयोध्या)चे नबाब ह्या राज्याचे सत्ताधीश झाले, आणि सन १७२४ पासून ओधमध्ये नबाबांचा अंमल सुरू झाला. ब्रिटिशांनी सन १८५६ साली हे राज्य आपल्या अंमलाखाली आणून नबाब वजीद अली शहा यांची कलकत्त्याला हकालपट्टी केली.


नबाबी अंमलाखाली लखनौचा लौकिक उर्दु काव्याचे सांस्कृतिक केन्द्र असाही पसरला. सध्याच्या लखनौची उभारणी मुख्यत: नबाब असफउद्दौला यांच्या कारकीर्दीत इ.स. १७७५ ते १७९८ या काळात झाली, त्यामुळे बरेचसे ऐतिहासिक इमले अजूनही जुनाट वाटत नाहीत.

आम्ही लखनौमधील काही इतिहासप्रसिद्ध इमारती पाहिल्या. बडा इमामवारा हा गोमतीच्या पश्चिमेकडे बांधण्यात आलेला असून मोहरमात तेथें मुस्लीमांचा धार्मिक सण मोठ्या इतमामाने पाळण्यात येई. सुमारे पन्नास फूट उंचीचा एक विस्तीर्ण दिवाणखाना हे या इमारतीचे वैशिष्टच मानले जाते कारण त्यात मध्यें कोठेही खांब नसल्याने त्याची व्याप्ती डोळ्यात भरते. तेथून थोडयाच अंतरावर रूमी दरवाजा लागतो आणि जवळच आकाराने काहींसा लहान पण आतील नक्षीकाम, रंगणी व झुंबरे, गालिचे आणि नेत्रदीपक शाही वस्तूंमुळे हा इमामबारा अधिक प्रेक्षणीय झाला आहे. हुसेनाबाद इमामबारा असेहीं या बिलोरी इमामबाऱ्याला नाव आहे. लक्ष्मण तीला नावाचा पौराणीक किल्ला आता भग्न स्थितीत दिसतो. लक्ष्मणाचे रामायण कालीन माहात्म्य या स्थानास चिकटलें आहे. परंतु धर्मवेडया औरंगजेबाने किल्ल्याची मोडतोड करून त्याचे प्रेक्षणीयत्वच नाहीसे केले आहे.

लखनौमधील ब्रिटीशांची ऐतिहासिक रेसीडेन्सी येथें अजूनही पहावयास मिळते. ५७ सालच्या बंडांत क्रांतिकारकांनी ह्या रेसीडेन्सीवर हल्ला करून तिची काही प्रमाणावर नासधूस केली त्याच्या

खुणा अजूनही येथें पहावयास मिळतात. लाल बिरादरी नावाची वस्तु-संग्रहालयाची लाल इमारत तेथील पुराण वस्तूंच्या संग्रहासाठी प्रसिद्ध आहे.

लखनौ विद्यापीठ पूर्वीच्या नबाबांच्या उद्यानांचे क्षेत्रांत उभारण्यात आले असल्यामुळें त्याला साहजिकच निसर्गाची शोभा प्राप्त झाली आहे.




लखनौ प्राणी संग्रहालयातील दुर्मिळ पांढरा वाघ

लखनौची झुलॉजीकल गार्डन प्रेक्षणीय स्थळ असून तिचा विस्तार बराच मोठा असल्यामुळे ती पहाता पहाता प्रवासी दमून जातात. वन्य प्राण्यांना शक्य तेंवढचा त्यांच्या नैसर्गिक संचार क्षेत्रात राहिल्यासारखे वाटावे अशी खास योजना या प्राणी संग्रहालयात करण्यात आली आहे. येथील वन्य हिंस्त्र श्वापदापैकी पांढरा पट्टयाचा वाघ वैशिष्टचपूर्ण म्हटला पाहिजे रेवाच्या महाराजांनी काही लाखांना

या म्युजीयमला तो विकला असे म्हणतात. आम्ही त्या वाघाचे या गडबडीत छायाचित्रही घेऊन ठेवले. एकंदर जगात पांढरे वाघ अगदी मोजकेच आहेत, त्यामुळे आम्हाला हा श्वेत व्याघ्र पाहून सहाजिकच समाधान वाटले.


चिकन व कलाकुसरीचे कापड ह्यासाठीही लखनौ चांगलेच प्रसिद्ध. लखनवी झब्बा सर्वांच्या परिचयाचाच आहे. कापड बाजार जोरात चालतो. विविध तऱ्हाची कुल्पी मलाई विकणारी विश्रांति गृहे हेही लखनौचे वैशिष्ट मानायला लागेल. अत्तरांचे शोकीनाना खास कनोजी व विशेष सुगंधांनी नावाजलेली अत्तरे येथे मिळतात. आणि शेवटी " रेवडिचा का न स्वाद चाखावा " म्हणणाऱ्यांना लखनौ सारखी रेवडी कोठेच मिळणार नाही याची प्रचिती येते. दिवसात लखनौ जेवढे पहाणे शक्य होते तेवढे पाहून आम्ही स्थानकाकडे सायंकाळी परतलो. आमच्यापैकी कित्येकांनी लखनौत बरीच खरेदी केली ती पहाण्यात व एकमेकीशी तुलना करण्यातही आमचा काही वेळ गेला.

या नंतरचा आमचा प्रवासी डब्याचा मुक्काम वाराणसीला ठरलेला होता. लखनौहून वाराणसीकडें जाताना वाटेतच अयोध्या लागते आणि चालकांनी हें क्षेत्र जरी आपल्या कार्यक्रमात घातले नव्हतें तरी कित्येक मंडळींनी अयोध्या पाहिली नसल्यामुळे त्यांनी गट करून त्या स्टेशनवर उतरावयाचे ठरविले त्यात आम्हीही सामील झालो. वस्तुतः अशा प्रवासात थोडा वेगळाच कार्यक्रम ठरविण्यात कधीकधी अनपेक्षित त्रास सहन करावा लागतो ह्याचा अनुभव पूर्वी मला आला होता. पण श्रीरामांच्या पदकमलानी पूनित झालेल्या आयोध्येस थोडासा मुक्काम करण्याचा मोह मलाही आवरला नाही. अयोध्येनंतर आम्ही वाराणसीत आलो.




श्रीविश्वेश्वरांचे ज्योर्तिलिंग

काशी क्षेत्री आमचा मुक्काम दोन दिवस होता. माझी पहिली काशी यात्रा तर वयाच्या ८ व्या वर्षी मौंजीबंधनानंतर झालेली. आठरा दिवस मुक्काम त्या क्षेत्री होता आमच्या कुटुंबियांचा. पंचक्रोशी करणे हा ते वेळी यात्रेचा आवश्यक भाग समजला जात असे. सध्याची 'वाराणसी' नावाप्रमाणे विशाल नगरी झाली आहे. या खेपेस सपत्नीक साक्षात श्री विश्वेश्वराची षोड्शोपचार पूजा शांतपणे करण्याची संधी आम्हाला मिळाली, त्याचे वाटले आगळेच समाधान. अलीकडेच तुळसीदासांच्या स्मरणार्थ जे भव्य व दिव्य स्मारक करण्यात आले आहे ते पाहून मनाला अतीव समाधान लाभते. रामायणातील विविध घटनाचे चलत् प्रतिमांच्या साह्याने मोठे कलापूर्ण




श्रीविश्वनाथ मंदिर



दशाश्वमेध घाट

दर्शन ह्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावरील प्रदर्शनीमध्यें होते. बारा ज्योतिर्लिंगापैकी काशी क्षेत्राचे दर्शन वाचकापैकी बहुसंख्यांनी घेतलें असावे म्हणून विस्तार भयास्तव ह्या संबंधात येथे अधिक लिहीत नाही.



मनकर्णिका घाट—ललितागौरी मंदिर इत्यादी

आजचा बिहार

वाराणसीहून आम्ही थेट बिहारमध्ये प्रवेश केला. गयेला एक दिवस आमचा मुक्काम होता. सर्वांनी विष्णुपदाचे दर्शन घेतले आणि ब्रह्मकपाल येथे श्राद्धविधी अगोदर झाले असल्याने त्याची पुनरावृत्ती केली नाही. सरस्वती नदी शापामुळे येथे गुप्त झाली असल्याने देवळा-जवळचे नदीचे पात्र शुष्क व रेताड असे राहाते. त्या गुप्त फल्गु नदीला आम्ही सादर नमस्कार केला.

येथून बुद्धगयेला जाण्याचा इरादा होता. पण रस्त्यामध्यें दरोडे वगैरे पडतात व असुरक्षितता असल्यामुळे सायंकाळची वेळ

हिमालयातील

लक्षात घेऊन आम्ही तो प्रवास करू शकलो नाही. तेथून आमची गाडी पाटण्यास थांबली आणि यात्रियांचा डबा दाणापूर या स्टेशनवर सायडिंगला टाकण्यात आला. बिहार मधील जमशेटपूर वगैरे काही शहरे मी पूर्वी पाहिली होती. पण या राज्यात थोडे अधिक दिवस घालण्याची संधी प्रस्तुत यात्रेमुळें मिळाली. दाणापूरहून आम्ही बसने थोड्याच अंतरावरील पाटणा शहर पहाण्यास निघालो. दाणापूर स्टेशनवर सरकारी व खाजगी दोन्ही प्रकारच्या बसेस वाहतुक कर-



प्रतिध्वनींनी साद देणारा 'गोला'– पाटणा

ताना आढळल्या. खाजगी बसेसमध्ये भरताड फार व कधीकधी टपा-वरही माणसे बसलेली. पण इष्ट स्थळी त्या कमी खर्चात व लौकर जातात. उलट सरकारी बसेसचे भाडे जास्त व इष्ट स्थळी मंदपणे पोहोचणाऱ्या. बसने आम्ही लवकर पाटण्यास पोहोचू ट्रेनपेक्षा, हा अंदाज खोटा ठरला; व रेंगाळतच आम्ही पाटण्यास आलो. अवधी थोडा असल्याने फार ठिकाणे पाहता आली नाहीत. पाटणा शहर

गंगा किनारी ८ मैल पसरले असून राज्याची राजधानी असल्याने त्याला साहजिकच महत्व आले आहे आजच्या पाटणा शहराचे खाली चंद्रगुप्त मौर्यांचे ख्रिस्ताब्दापूर्वी ४०० वर्षे अस्तित्वात असलेले पाटलीपुत्र होते. अशोकाची हीच राजधानी. पण आता हे प्राचीन वैभव नामशेष झालेले दिसते. नाही म्हणायला पुरातत्त्व संशोधकांच्या मते प्राचीन अवशेष एकेकाळच्या विराट साम्राज्याची ग्वाही देतात.

विजापूरच्या गोलघुमटाप्रमाणे येथेही गोला नावाची एक इमारत असून तिच्या प्रचंड घुमटामुळे भितीमधून ध्वनींचे प्रतिध्वनी ऐकावयास मिळतात. खूप उंचीची मधमाश्यांच्या पोवळ्यांच्या आकाराची ही गोला तळाशी ४२० फूट व्यासाची आहे. वॉरन हेस्टिंगच्या काळात धान्याच्या कोठारासाठी ही इमारत बांधण्यात आली होती आणि आजही रेशनसाठी धान्य तीमध्यें साठविले जाते. पाटण्यातील या अत्युच्च इमारतीवरून सर्व शहर दिसते. सभोवतालच्या काही मोहोल्यातून गलिच्छपणाचे साम्राज्य आढळले; इतकेच नव्हे तर स्टेशनच्या पायरीवर एका भिकाऱ्याचे प्रेत दुर्लक्षित अवस्थेत दीर्घकाळ पडलेले पाहून आम्ही थक्कच झालो. राजेन्द्र बाबू, जयप्रकाश, जगजीवनराम यांचेच का हे पाटणा शहर असा विचार क्षणभर मनात येऊन गेला. गंगा व कोशी या दोन्ही नद्या अत्यंत सखल मैदानातून वाहात असल्याने या नद्यांच्या पुराचा थैमान प्रतिवर्षी बिहारला भोगावा लागतो. आमचे प्रवासात पावसाळा सुरू व्हायचा असल्यामुळे पुढे जे बिहारवर पुराचे संकट ओढवले ह्याची यावेळी आम्हास कल्पनाही येऊ शकली नाही.

दाणापूरहून पुढे समष्टीपूर घेतले. माजी रेल्वे मंत्री श्री. मिश्रा यांचेवर हॅडग्रेनेड टाकून खून झाला ती जागा पोलीसांनी पांढऱ्या पट्टयांनी खुणा करून ठेवलेली दिसली. त्यावेळी मिश्रांच्या सभेसाठी उभारलेल्या प्लॅटफॉर्मचें मागेच स्वच्छता गृह दिसले तेव्हा तेथे मारेकरी लपून बसला असावा असे सहज मनात आले. पुढील चौकशीत ही गोष्ट काहीशी सिद्ध झाल्याचे बातम्यावरून समजलें.



नेपाळात प्रवेश

ऋषिकेश प्रमाणे समष्टिपूरच्या डब्यात अवजड सामान ठेवून दुसरे दिवशी सकाळी आम्ही मीटर गेज रेल्वेने रक्सॉलकडे रवाना झालो. नेपाळकडें जाण्यासाठी भारतीय रेल्वेचे हे अखेरचे स्टेशन. रक्सॉलला मुक्काम असल्याने आम्ही तसेच नेंपाळच्या हद्दीत जाऊन आमच्या जवळचें काही चलनाचे नेंपाळी चलनात रूपांतर करून आलो. आपल्या १०० रु. ला नेपाळी बँकेने रु. १३९ दिले. सकाळीच आम्ही रिक्षा करून बीरगंजला पोहोचलो. रिक्षा दोन माणसांना बीरगंज बस स्टँड पर्यंत २ रु. भाडे घेते. रक्सॉल पासून दोन फर्लांगावर एक लहानशी नदी येते तीच भारत व नेपाळ यांची सरहद्द. ही सरहद्द ओलांडल्यावर नेपाळी कस्टम्स् नाके आहे पण तेथे विशेष चौकशी होत नाही. बसस्टॅन्डवर मात्र सर्वांना आपापले बोझे सोडावयास लावले जाते व कसून तपासणी करून त्यावर कस्टम्स तपासणी झाल्याची सिले ठोकण्यात येतात. यात्रेकरूंना कस्टम्सकडून इतका त्रास देण्याची आवश्यकता आहे का हा एक प्रश्नच उभा राहातो. बीरगंजहून काठमांडू १२४ मैल. तेथे थेट बसेस मिळतात. उतारूंसाठी व मालासाठी नॅरोगेज रेल्वे चालू आहे जनकपूर —जयनगर नावाची. बीरगंज ते काठमांडू हा राजमार्ग पूर्वी

तितकासा सोयीस्कर नव्हता. परंतु भारताच्या साह्याने आता हा त्रिभुवन राजपथ पुष्कळच चांगला झाला आहे व त्यावर वहातुकही भरपूर होते.

तस म्हटलं तर नेपाळी प्रदेशात आल्यावर आपण अगदी वेगळ्या मुलुखात गेलो आहोत असे वाटत नाही. नेपाळी भाषा संस्कृत व प्राकृतोद्भव असल्यानें हिंदीतील बातचीत बहुसंख्यांना सहज समजते. नेपाळी, तिब्बती, चीनी लोकांचें चेहेरे मंगोलियन दिसतात. पुरुषापेक्षा स्त्रिया अधिक सुंदर दिसतात आणि हा पहाडी मुलुख परिस्थितीने गरीब असला तरी लोक स्वाभिमानी, काटक व पाणीदार वाटतात.

उत्तराखंडातील बस मार्गाप्रमाणे काठमांडूला जाण्याचा रस्ता पर्वतीय भागातून वळणावळणाने गेला आहे; मात्र केदारनाथ बदरी-नारायण या क्षेत्राकडे जाताना आपण जसे मंदाकिनी व अलकनंदा यांच्या कडेकडेने जातो तसा प्रकार या राजमार्गाबाबत आढळत नाही.

काठमांडूस पोहोचण्यास आम्हास सायंकाळ झाली. वाटेत आमलेकगंज, भैसे, सीमभजाग, दामण, पानकोट इ. पहाडी गावे लागतात. सुमारे ९–१० तासांचा प्रवास होतो हा. काठमांडूहून आमची बस तेथून तीन मैलावरील देवपाटण या गावात पोहोचली. येथेंच श्रीपशुपतिनाथांचे भव्य देऊळ आहे.

दिवसभराच्या बस प्रवासाने यात्रिक मंडळी सर्व थकून गेली होती. उतरण्यासाठी मंदिराजवळची गोशाळा तशी सोयीची आहे. पण यात्रिकांच्या गर्दीच्या मानाने तेथील खोल्या पुरत नाहीत. संस्थेच्या विश्वस्तातर्फे सध्या नवीन बांधकाम चालू असून त्यामुळे जास्त सोय होईल ही अपेक्षा.

सायंकाळी आम्ही देवदर्शनास गेलो. पण उशीर झाल्याने दर्शन होऊ शकले नाही व श्री शंकरापुढील भल्या मोठ्या नंदीला पाहूनच आम्हाला समाधान मानावे लागले.

नेपाळ हे पर्वतीय राज्य असल्याने तांदुळ व तत्सम धान्यापलिकडे अन्नधान्य बेताचीच उत्पन्न होतात. उद्योगधंदेही साधारण. त्यामुळे कित्येक नेपाळी गुरखे रोजगारासाठी भारत व अन्य देशात गेलेले आढळतात. पहाडी प्रदेशात राहिल्यामुळे नेपाळी स्वभावतः काटक व जिद्दी. साहजिकच लष्करी पेशा त्यांना मानवतो. भारतीय सैन्यातील गुरखा फलटणींनी चांगलेच काम केले आहे. इंग्रजांच्या राज्यांतही गुरखा सैनिकांनी असामान्य शौर्य दाखवले आहे.

ह्या भागात पहाटेच चांगले फटफटते. गुरुवार दि. ५ जून रोजी आम्ही सकाळीच पशुपतिनाथाला लागून वाहणाऱ्या बागमती नदीवर स्नानाला गेलो. नदीला पाणी अगदी बेताचेच होते आणि हिमालयीन सफेद रेती उथळ पाण्याच्या पात्रात तळाशी साचलेली दिसली. त्यामुळे पात्राच्या मध्ये जाऊन स्नान करणे जास्त सुलभ. पाणी थंडगार होते पण तो थंडपणा झोंबणारा नव्हता. घाटावर रक्तमुखी माकडांच्या ये जा चालूच होत्या. त्यामुळे बरोबरच्या पिशव्यावर विशेष लक्ष ठेवावे लागे.


अर्धज्योर्तिलिंगाचा महिमा

पशुपतिनाथ हे अर्धज्योर्तिलिंग असल्याचे पूर्वी लिहिलेच आहे. कोटी रुद्र संहितेत या क्षेत्राचा पुढीलप्रमाणे महिमा वर्णन केला आहे.

नयपालाख्यपुर्यां तु प्रलिद्धा या महीतले।
लिंगं पशुपतीशाख्यं सर्वकामफलप्रदम्।
शिरोभागस्वरुपेण शिवलिंगं तदास्ति हि।

बहुतेक सर्व ज्योर्तिलिंगाची पूजा यात्रिकांना स्वहस्ते करतां येते परन्तु श्री पशुपतिनाथसारखे थोडे अपवादही या पद्धतीला आहेत. या देवळाचे गाभाऱ्यात यात्रिकांना जाता येत नाहीं. दर्शनाच्या महिरपीतून पुजाऱ्याचे हाती तबकांतून हार, प्रसादासाठी पंचखाद्य व अन्य भोग देता येतात व त्याच तबकात गंधाची माळ व अन्य पुष्पांचा प्रसाद म्हणून यात्रिकांना पुजारी देतात. शिवलिंग, साक्षात् विष्णूंनी या ठिकाणी स्थापन केल्याचा उल्लेख हिमवत् खंडामध्ये पुढीलप्रमाणे आला आहे.

श्रीपशुपतिनाथ



पशुपतिनाथ मंदिर

वाग्मती पश्चिमे तीरे सर्वदेवतानां क्षितौ ।
ज्योतीरूपी शिव: साक्षात् पशुपतिर्विराजते ॥
सर्वस्य तेजसां पुञ्जं सर्वभूतैरगोचरम् ।
सर्वदा दृश्यते लोकैर्विष्णुना स्थापितं शिवम् ॥

या अर्धजोतिर्लिंगाची कथा, श्रीकेदारेश्वराच्या उत्पत्तीसंबंधी लिहिताना दिलीच आहे. पशुपतिनाथांच्या यात्रेचे फल असे सांगण्यात आले आहे की जे भाविक या शिवलिंगाचे दर्शन घेतात, त्यांची पशुयोनीत जन्म घेण्यापासून मुक्तता होते. यासंबंधी शिव पुराणात पुढील उल्लेख आढळतो.

ये मां पशुपतिं देवं पश्यन्ति मनुजा भुवि ।
पशुजन्म न तेषां तु मत् प्रसादात् भविष्यति ।।

श्री शंकरांना पशुपति अशी संज्ञा असल्याचे अनेक दाखले आहेत. कित्येकांना मुखोद्गत असलेल्या रुद्रामध्यें 'पशूनाम पतये नमः' ही पंक्ती परिचित आहे. या भव्य मंदिराच्या पूर्वेकडील महाद्वाराने प्रवेश करताच प्रथम लाल गणेशाची मूर्ती दिसते. त्यांची पूजा करून पुढील दर्शनांना जावयाचे. देवळाचे विस्तीर्ण आवारात पश्चिमेचे बाजूस दिसतो प्रचंड नंदी. १३ फूट उंच ८ फूट लांब व ७ फूट रुंदीचा असा हा विशाल नंदी एकदम डोळ्यात भरतो. नंदीचें महात्म्य कर्नाटकात विशेष आढळत असले तरी प्रत्येक शिवलिंगासमोर नंदीची प्रतिष्ठापना स्वाभाविकपणें केली जाते. प्रस्तुत नंदीवर सोनेरी मुलाम्याचा पत्रा चढविला असल्याने सूर्यप्रकाशात तो चांगलाच लखलखतो. गाभाऱ्याच्या मध्यावर पशुपतिनाथांचे स्वयंभू लिंग आहे. म्हशीच्या मुखाचे आकाराच्या लिंगावर मूर्तीस चारी बाजूंना मुखें आहेत. या देवालयाचे पुजारीही रावळ घराण्यातील आहेत व ते आलेले आहेत भारताच्या दक्षिणेकडील भागातून. पशुपतिनाथ मंदिराची रचना दुमजली व पॅगोडा पद्धतीची आहे. देवालयाचे चारही दरवाजे चांदीच्या पत्र्याने मढविलेले व आतील संगमरवरी भिंतीवर अत्यंत कलाकुसरीने नक्षीकाम केलेले आहे. पशुपति मंदिरात दुर्मिळ रुद्राक्षांच्या माळा, श्रीमहादेवाचे अलंकार म्हणून जपून ठेवलेल्या आहेत. एकमुखी, पंचमुखी, अकरामुखी अशा रुद्राक्षांच्या सोन्यांत गुंठवलेल्या माळा येथेच एकत्र पहावयास मिळतात. दक्षिणावर्त शंख, नागमणी इ. तसेच सोन्या चांदीचे अलंकार या भांडारात आहेत. पशुपतिनाथांचे दर्शन, पूजा वगैरे संपन्न केल्यावर आम्ही नेपाळची राजधानी काठमांडू शहर पहावयास गेलो.

काठमांडू खोरे

नेपाळदेश पर्वतव्याप्त असला तरी त्याची राजधानी काठमांडू ही सपाट खोऱ्यात वसविलेली आहे. त्यामुळे तिची उंची समुद्रसपाटी-पासून सुमारे ४४२३ फूट एवढीच आहे. म्हणजे साधारण महाबळे-


श्वराइतक्या उंचीवर हे शहर असल्याने हवा माफक प्रमाणात थंड वाटते, आणि उन्हाळ्यात तर दुपारी उकडतेही. काठमांडू खोऱ्यात या राजधानीखेरीज पाटण आणि भडगाव ही शहरे येतात. काठमंडू खोरे सुमारे २१८ चौ. मैलांचे. त्याची लोकसंख्या सुमारे ५०,००० आहे. एकंदर शहर स्वच्छ आणि रस्ते रुन्द व उत्तम स्थितीतले असल्यामुळे राजधानी पद ह्या शहराला शोभते. नवीन स्वरुपाची हॉटेले, विश्रांतिगृहे, उद्याने, गजबजलेल्या बाजारपेठा इत्यादींनी हिमालयातील या शहराला आधुनिकता आली आहे. काठमांडू हा शब्द काष्ठमंडप यापासून आला असून दरबार चौकाजवळ या नावाचा पॅगोडा आढळतो. ह्यावरून शहराचे हे नाव पडले आहे. हा पॅगोडा एकाच झाडाच्या लाकडापासून बांधण्यात आला असे म्हणतात.

सध्याचे शहर राजे गुणकामदेव यांनी इ. स. ७२३ मध्ये वसविले, आणि वेळोवेळी त्यामध्ये सुधारणा व भर पडत जाऊन सध्याचे आधुनिक स्वरूप या नगरास प्राप्त झाले. बाजारात सहज फेरफटका मारला तर आढळून येईल की जपान, चीन, सिंगापूर, हाँगकाँग आणि काही पाश्चात्य देशातील मालाची मोठ्या प्रमाणावर विक्री येथे होते. सरळ कस्टम्समध्ये कर भरून आलेला माल आणि दडपून विक्री चाललेल्या तस्कराचा माल यामुळे खरेदीदारांना आपाततः मोठाच लाभ व्हावा असे वाटते. पण प्रत्यक्षात किंमती तशा चढत्याच आहेत. जे भारतीय येथील काही परदेशी चीज वस्तू विकत घेताना आपणास काही घबाड सापडल्याचे समजतात, त्यांची परतताना कस्टम्समध्ये केविलवाणी तारंबळ उडते आणि उगीच नसत्या भानगडीत पडलो असे होऊन जाते. ह्या प्रशस्त रस्त्यावर जपानच्या टोयोटो टॅक्सी विशेष प्रमाणावर वावरतात. त्या देखण्या टॅक्सीतून फेरफटका मारल्याने आमचे कुटुंबास विशेष समाधान वाटले !

दि. ६ जून शुक्रवारी आमच्या प्रवासी गटानें बसेस मधून काठमांडू व ह्या खोऱ्यातील जवळपासची प्रेक्षणीय स्थळे पाहिली. नेपाळ हे जगातील एकमेव स्वतंत्र हिंदू राष्ट्र असल्याने स्वातंत्र्यवीर सावरकर

व अन्य हिंदुत्वनिष्ठ नेत्यांना त्या देशाबद्दल विशेष जवळीक वाटत असे. त्याच प्रमाणे ब्रिटिश राजवटीत काही क्रांतिकारक आपले बेत सिद्धीस जावेत म्हणून नेपाळात काही खटपटी करीत याची माहितीही क्रांतिकारकाचे कर्मकांड समजून घेताना मिळते. हिंदू देवालय व बौद्ध स्तूप आणि चैत्य यांनी हा देश इतका समृद्ध आहे की श्रद्धाळू माणसांना काय पहावे व न पाहिल्यास चालेल असे होऊन जाते. आम्ही पाहिलेल्या काही निवडक स्थळाची वर्णने खाली देत आहे :–

गुहेश्वरी नावाचे देवालय बागमती नदीच्या पूर्व किनाऱ्यावर आहे. पितळी नलिकांच्या विविध आकृतीनी या देवळास शोभा आणली आहे चार पितळी नागराजावर देवालयाचे छप्पर आधारले आहे. तांत्रिक यंत्राच्या आकृती या देवालयात प्रामुख्याने दृष्टोत्पत्तीस येतात.




स्वयंभूनाथ टेकडी
काठमांडू

स्वयंभूनाथः काठमांडूच्या पश्चिमेस दोन मैलावर स्वयंभूनाथाचे मंदिर आहे. या टेकडीवरील स्तूप बौद्ध शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना आहे स्तूपाच्या चारही बाजूला चार चौथरे असून प्रत्येकावर

चूडामणीची प्रतिकृती आहे. तीमधून अनिमिष नेत्र जगाकडे पहात आहेत असे वाटते. आदि बुद्धाचीच ही सर्व साक्षी नेत्रकमले असल्याची सर्वत्रांना जाणीव होते. या देवतेला बुद्धधर्मीय त्याचप्रमाणे हिंदू जनता भजते. काठमांडू खोऱ्यात स्वयंभूनाथ हे सर्वात प्राचीन बुद्ध-मंदिर आहे. नेपाळी संस्कृतीत हिंदू व बौद्ध विचारांचा काही प्रमाणात मिलाफ झाल्याची साक्षच या देवामुळे मिळते.

जलविनायक : गणेशाचे हे देऊळ सभोवतालच्या वनश्रीमुळे चित्त उल्हसित करते. या देवळाच्या एका खांबावर भला मोठा उंदीर कोरलेला आढळतो. खुद्द काठमांडू शहरातील नेपाळ नरेशांचा राज-




नॅशनल म्यूझियम,
नेपाळ

वाडा नारायण हिती दरबार या नावाने ओळखला जातो. तो स्वतंत्र देशाच्या अधिपतीला साजेसाच आहे.

बालाजु जलउद्यान : ही बाग शहरापासून चार मैलावर आहे. निरनिराळी कारंजी आणि जलप्रवाह यामुळे प्रस्तुत बागेत सर्वत्र जलराज्यच झाल्यासारखे वाटते. सुसरीच्या तोंडातून पाणी पाडणाऱ्या

बावीस दगडी प्रतिकृती या बागेत डौलात दिसतात. आठराव्या शतकातील हे उद्यान असून त्यामधील पोहण्यासाठी तलाव डोळ्यात भरतो.

राष्ट्रीय म्युझियम : नेपाळचे राष्ट्रीय म्युझियमच्या दोन तीन वास्तू शेजारी आहेत. या देशाचा इतिहास, संस्कृति, शिल्पकला त्यातील प्राणी व वनस्पती, शस्त्रसंभार आणि आतापर्यंत नेपाळवर राज्य केलेंल्या सत्ताधीशाची तैलचित्रे इत्यादी या राष्ट्रीय संग्राहलयात पहावयास मिळतात. त्यामुळे देशाच्या प्रगतीची व इतिहासाची सर्वसाधारण कल्पना येते.




दरबार चौक
पाटण

कुमारीचें देवालय : दरबार चौकानजीक काठमांडू येथील जिवंत कुमारी देवतेचा निवास दिसतो. आपल्या देवालयीन निवासाच्या गच्चीवरून या ब्रह्मकुमारी खाली जमलेल्या भक्तांना ठराविक वेळी दर्शन देतात.

हनुमान ढोका : शहरातील हनुमान ढोका येथे नेपाळच्या राजाचे ऐतिहासिक निवासस्थान होते. ह्या भागात तलेंजू देवालय, काळभैरव, वसंतपूर दरबार, राजे प्रतापमल्लाचा पुतळा इत्यादी गोष्टी पहावयास मिळतात. या ऐतिहासिक राजवाड्यात दाराशीच हनुमानाची मूर्ती दिसते.

नेपाळ नरेशाची पूर्वीची राजधानी पाटण ही आम्ही पाहिली. ह्या राजधानीतील दरबार चौक म्हणजे पाच पॅगोडा पद्धतीच्या देवळाचा एक समुच्चयच म्हणावयाचा. शहरातील मोठमोठी दुकाने ह्या चौकाच्या आसपास आढळतात.




श्रीकृष्ण मंदिर
पाटण

कृष्ण मंदीर : पाटण शहरातील हे देवालय शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना म्हणावा लागेल. पाषाणाचे हे तीन मजली देवालय प्रवाशांच्या डोळ्यात एकदम भरते. राजे नरसिंहमल्ल यानी श्रीकृष्णाचे हे देऊळ सोळाव्या शतकात बांधले. ह्या देवळाच्या भिंतीवर महाभारत आणि रामायण यामधील प्रसंगाची विविध दृश्ये अत्यंत

कलापूर्ण रितीने कोरलेली आहेत; मात्र त्यांचा अभ्यास करण्यास पुरेसा वेळ मिळावयास हवा.

हिरण्यवर्ण महाविहार : बाराव्या शतकात बांधलेले भगवान बुद्धाचे लोकेश्वर मंदीरही तीन मजली आहे. भगवान बुद्धाची स्वर्णमयी मूर्ती देवळात झगमगते.

काठमांडू शहराच्या मध्यभागी विस्तीर्ण उद्यान असून त्याच्या चारही बाजुना मोठमोठे रस्ते आहेत. या चौकोनी उद्यानात मुलांना खेळण्यासाठी खास विभाग केले आहेत. शहर हिंडून थकलेली मंडळी या मैदानाच्या हिरवळीवर आनंदाने विश्रांती घेतात.



काठमांडूच्या मध्यवर्ती
उद्यानातील सौध

ह्या रम्य नगरीत आम्ही दोनच दिवस मुक्काम करू शकल्यामुळे सहाजिकच 'रात्र थोडी व सोंग फार' अशी आमची अवस्था झाल्यास नवल नाही. आम्ही राहिलो त्या गोशाळेत पन्नास-साठ तरी माकड यात्रिकांचेवर आपली विदूषकी दृष्टी टाकीत आणि गनिमी काव्याने दिसेल ती खाद्य वस्तू पळवीत. एका माकडाने तर माझे

एअर बॅगमधील ग्लूकोजडीचा पुडा पळविला, व तो खात असताना आमचेकडे त्याने दात विचकून मिस्किल तऱ्हेने पाहिले! "दाने दाने पर लिखा है खानेवालेका नाम" हेच खरे.

भदगाव

काठमांडू खोऱ्यातील तिसरे महत्त्वाचे शहर म्हणजे भदगाव (भक्तपूर). हें शहर शंखाकृति असून इ. स. ८८९ साली राजे आनंद देव यांनी ते स्थापिले. काठमांडूच्या पूर्वेस नऊ मैलावर हे शहर वसले आहे. सुमारे चार चौरस मैलाचा विस्तार आहे या शहराचा. ४६०० फूट उंचीवरील या शहरात अति प्राचीन देवालये विशेष प्रसिद्ध आहेत.

दरबार चौक

काठमांडू, पाटण या शहराप्रमाणे येथेही दरबार चौकाचे आसमंतात राजे भूपेंद्रनाथ मल्ल यांचा पुतळा, सिंह दरवाजा, ५५ खिडक्यांचा प्रासाद, वत्सलेचे देवालय इत्यादी प्रेंक्षणीय वास्तू आहेत. हिंदू व बौद्ध तंत्र विद्येवर प्रकाश पाडणाऱ्या काही प्राचीन चित्रांचा संग्रह याच चौकानजीकच्या चित्रसंग्रहालयांत आहे.

५५ गवाक्षांचा प्रासाद

सोनेरी दरवाजातून आत शिरताच आपण ५५ खिडक्याची गॅलरी असलेल्या प्राचीन प्रासादाच्या आवारात येतो. प्रस्तुत सोनेरी दरवाजाही शिल्पकलेचा सुंदर नमूनाच म्हणावयाचा. गरुडावरील लक्ष्मीची मूर्ती या सोनेरी दरवाजावर अधिष्ठित असल्यामुळे तो वैशिष्ट्यपूर्ण झाला आहे. कलाकुसर व नक्षीकाम यामुळे हा दरवाजा अभ्यासाचा एक स्वतंत्र विषयच वाटतो.

राजे यक्षमल्ल यांनी इ. स. १४२५ मध्ये बांधलेल्या विशाल राजवाड्याच्या सज्जाला ५५ खिडक्या लाकडांत नक्षीकाम करून बसविण्यात आल्या असल्याने प्रासादाची शोभा द्विगुणित झाली आहे.

वत्सलेचे देवालय

वत्सला देवींचे हे देऊळ चिरेबंदी दगडांनी बांधलेले असून त्यांतील नक्षीकाम आवर्जून पाहण्यासारखे आहे. राजे भूपतींद्र मल्ल यांनी एक भली मोठी घंटा देवळाचे गच्चीवर बांधली. ती वाजू लागली की आसपासचे कुत्री आरडा ओरडा करतात. यामुळे कुत्र्याना भुंकायला लावणारी घंटा ' असे या ब्रॉंझ धातूंच्या घंटेचे नामाभिधान झाले आहे.

भैरवनाथ

प्रथम राजे जगत्ज्योतेमल्ल यांनी पॅगोडा पद्धतीचे एक मजली देऊळ उभारले. राजे भूपतींद्र मल्ल यांनी इ. स. १७१८ मध्ये हे देऊळ तिमजली केले. काळभैरवाप्रमाणे हा देव शहराचे रक्षण करणारा असल्यामुळे त्याची मूर्ती उग्र चेहऱ्यांची झाली आहे.

न्यातपोल देवालय

पाच मजली पॅगोडा पद्धतीचे हे देऊळ शहरातील सर्वांत उंच देवालय होय. हेंही राजे भूपतींद्र मल्ल यांनी इ. स. १७०५ मध्ये बांधले. देवळाचे तळमजल्यावर जयमल्ल व फट्टा मल्ल यांच्या प्रतिमा दिसतात. सामान्य माणसाच्या दसपट शक्तिमान या व्यक्ती. देवळाच्या वरवरच्या मजल्यावर ज्या व्यक्तींच्या वा प्राण्यांच्या प्रतिमा आहेत, त्या खालच्या मूर्तीपेक्षा दसपट शक्तिमान असे मानले जाते. म्हणजे एक प्रकारे पराकोटीला गेलेल्या शक्तिसामर्थ्याच्या प्रतीकांचे हे पाच मजली देऊळ म्हणजे पूजास्थान आहे असे म्हणावयास हरकत नाही.

दत्तात्रेय मंदिर

राजे यक्ष मल्लांनी एका झाडाच्या लाकडापासून दत्तात्रेयांचे हे देऊळ इ. स. १४२७ मध्यें बांधले. विश्व मल्लांनी इ. स. १४५८ मध्ये त्याची नव्याने उभारणी केली. या देवळाजवळच एक प्राचीन मठ आहे. त्या मठातील खिडक्या मोराच्या आकृतीच्या असल्याने नावीन्यपूर्ण भासतात.

सूर्य विनायक

जवळच्याच वनराजीमध्ये सूर्य विनायकाचे देऊळ आगळेच भासते. सूर्योदय होताच या गणपतीवर त्याचे प्रथम किरण पडतात, म्हणून म्हणतात या देवाला सूर्य विनायक.

चंगू नारायण

प्रस्तुत खोऱ्याच्या अगदी टोकाला डोंगर माथ्यावर आहे चंगूनारायणाचे अत्यंत प्राचीन देवालय. राजे हरिदत्त वर्मा यांनी इ. स. ३२३ मध्ये हे बांधले, या खोऱ्यांतील पॅगोडा पद्धतीचे हे पहिलेच देऊळ, आणि खोऱ्यापेक्षा पाचशे फूट उंचावर असल्यामुळे तेथून सभोवतालच्या निसर्ग रमणीय प्रदेशाचा देखावा चांगलाच पहावयास मिळतो.

काठमांडूहून अन्य काही प्रेक्षणीय स्थानांना सहली काढता येतात. त्यांतील निवडक पुढे दिलेल्या आहेत.

काकानी

काठमांडूपसून १८ मैलावरील काकानी हे ठिकाण ६५०० फूट उंचावर असल्यामुळे हवा खाण्याचे ठिकाण झाले आहे. तेथून हिमालयाची काही शिखरेही स्पष्ट दिसत असल्यामुळे भटकंती करण्यास काकानी हे आहे छानदार स्थान.

नगरकोट

काकानीपेक्षाही ६३३ फूड अधिक उंचावर असलेले नगरकोट हे बारा महिने थंड हवेचे ठिकाण समजले जाते. तेथून मौंट एव्हरेस्टचे (सागरमाथा) या जगातील सर्वोच्च शिखराचे दर्शन सुस्पष्ट होते. हॉटेल व निवास यांची सोयही चांगल्या पैकी असल्यामुळे परदेशातील प्रवाशांना हे ठिकाण विशेष आवडते.

लुंबिनी

भगवान बुद्धाचे जन्मस्थान लुंबिनी हे नेपाळच्या पश्चिम तराई विभागातील महत्त्वाचे ठिकाण. येथे अति प्राचीन मठाचे अवशेष व

भग्नावस्थेतील अशोक स्तंभ स्थानाचें प्राचीनत्व सिद्ध करतात गौतम बुद्धांच्या मातोश्री मायादेवी यांच्या येथील मूर्तीपुढेही भाविक नतमस्तक होतात. काठमांडूहून भैरहवा येथे विमानाने येऊन तेथून टॅक्सीने लुंबिनीला येणे सोयीचे पडते. लुंबिनी येथील मठाजवळ एक तळेही आहे. त्यामध्ये गौतम लहानपणी स्नान करीत असे सांगण्यात. येते. त्यामुळे त्या तळ्यातील तीर्थ भाविक श्रद्धेने घेतात. नेपाळ सरकारच्या पुरातत्त्व संशोधन खात्यातर्फे या टापूत उत्खनन चालू असून प्राचीन काळातील अन्य काही अवशेष शोधण्याचा प्रयत्न चालू आहे. जगातील बौद्धांची संख्या किती तरी कोटींची असल्यामुळे त्यांचे श्रद्धास्थान असलेल्या 'लुंबिनी'चे महत्त्व साहजिकच वाढले आहे. आगामी काळात तेथें काही भव्य वास्तूंची उभारणी प्रस्तुत संदर्भात होईल ही अपेक्षा.

सौंदर्याचे माहेर-पोखरा खोरे

सृष्टिसौंदर्याने विनटलेले पोखरा खोरे हेही नेपाळमध्ये येणाऱ्या प्रवाशांचे विशेष आकर्षण. काठमांडूहून पृथ्वी राजमार्गाने पोखरास जाता येतें. तरीपण वरुने सहासात लागतात या प्रवासाला. त्रिशूळी वगैरे चार नद्यांनी हे खोरे सांधले असल्याने तेथील वनश्रीने डोळें तृप्त होतात. फेवातळ– म्हटलं तर सरोवर आहे, हे– गोड्या पाण्याने हे समृद्ध आहेच पण मासे पकडण्याचा षौक असणारांना तेथे भरपूर शिकार मिळतें. अन्नपूर्णा या हिमालयातील पर्वतराजीतून वाहणाऱ्या हिमनद्यामुळे या सरोवरात पाण्याची कधीच कमतरता पडत नाही. अन्नपूर्णेच्या शिखराचे प्रतिबिंब सरोवरात पाहाताना आगळाच आनंद लाभतो. या सरोवरामध्येच वराही हे देऊळ सभोवतालच्या पाण्यामुळे विशेषच पवित्र भासते.

पोखरा खोऱ्यातील १६ मैलावर उत्तरेस अन्नपूर्णशिखराचा पायथा दृग्गोचर होती. अन्नपूर्णा समुद्रसपाटीपासून २३००० फूट

उंचीवर आहे. त्याचा पाया मात्र दिसतो माशाच्या शेपटासारखा मच्छपुच्छारे असे नाव पडले आहे म्हणून या पर्वताचे.

'फेवातळा' प्रमाणे 'बेग्नाजतळ' व 'रूपा तळ' अशी दोन लहान सरोवरे प्रस्तुत खोऱ्यांतच आहेत. हे खोरे समुद्रसपाटीपासून २९०० फूट उंचावर असल्याने हवामानाच्या दृष्टीने हिवाळ्यात येथे येणे प्रसन्नकारक. फेवातळ्यानजीक 'रत्नमंदिर' या राजवाड्यात राजघराण्यातील मंडळी हिवाळ्यात विशेषकरुन रहावयास येतात.

पोखरा खोऱ्यांनी बतुलेश्वर गुंफा हीहीं प्रवाशांचा एक आकर्षण वाटते, गुंफेजवळ संत्र्यांचे बागचबाग दिसतात. नेपाळमध्ये अत्युकृष्ट संत्री बतुलेश्वर येथें होतात.

हिमालयाच्या शिखरांचे ऐश्वर्य

नेपाळ हे आर्थिक दृष्ट्या गरीब राष्ट्र असले तरी हिमालयाच्या उत्तुंग शिखरांमुळे जगाचे लक्ष हा चिमुकला देश वेधून घेतो–जगातील अत्युच्च पर्वतशिखर मौंट एव्हरेस्ट ईशान्येकडे चीनच्या (तिबेटच्या) सरहद्दीलगतच. सगरमाथा म्हणजेच मौंट एव्हरेस्ट याची समुद्रसपाटी-पासून उंची ८८४७·७ मीटर म्हणजे २९०२८ फूट आहे. १९५३ मध्ये माणसांनी प्रथम जिंकले हे शिखर आणि त्यानंतर जगातील कित्येक देशातून हे शिखर चढण्यासाठी तुकड्या येतच राहिल्या आहेत. यामध्ये काही तुकड्या यशस्वी झाल्या तर काहींना माघार घ्यावी लागली. अधूनमधून काही धाडसी वीर अपघातात मृत्युमुखी पडल्याचेही आपण वाचतो पण एव्हरेक्ट आरोहणाचा प्रयत्न हेच यश असे म्हणावेसे वाटलें. १९७५ साली तर स्त्रियांनी या शिखरावर जाऊन आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्षाचा पराक्रमी बाहुटा रोवला. आता हें शिखर अधिक अवघड बाजूंनी पादाक्रांत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जपान, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड, इटली, भारत चीन इत्यादी देशा-तून एव्हरेस्टला जाऊ इच्छिणाऱ्या तुकड्यांची अलीकडे इतकी गर्दी झाली आहे की नेपाळ सरकारला या मोहिमेत भाग घेणारांचे काही क्रमांक लावण्याची पाळी आली आहे.

जगातील सर्वात उत्युच्च पर्वत शिखर नेपाळमध्ये आहे एवढेच नव्हे तर जगातील उच्चतर शिखरांची जास्तीत जास्त संख्या नेपाळमध्ये आहे हे पुढील नामनिर्देशावरून लक्षात येईल. कांचनगंगा (८५८५·०५ मी.) माकालू (८४७०·४) घवलगिरी (८१६५·६ मी) चो ओयू (८१५१·४ मी.) मानसलू (८१२५·४) अन्नपूर्णा १ (८०४३·९८) अन्नपूर्णा २ (७९३७·३ मी.) हिमालशूलि (७८६४·१७) आपी (७१३२ मी.)

अशा या हिमालयातील शिखरांचे वर्णन करण्यास शिखरिणी वृत्तांत महाकाव्यच रचावयास हवे !

नेपाळचे परराष्ट्र धोरण

भारताच्या दृष्टीने नेपाळाला अनन्यसाधारण असे राजकीय महत्वही आले आहे. तिबेट स्वतंत्र होता तोपर्यंत भारत आणि चीन या दोन मोठ्या राष्ट्रामध्ये तिबेट, नेपाळ अशी दोन बफरस्टेट्स असल्यामुळे भारताच्या संरक्षणाचा प्रश्न या सरहद्दीवर सुलभ वाटला. पण तिबेट चीनने गिळंकृत केल्यामुळे या बलाढ्य राष्ट्राच्या सीमा काही ठिकाणी नेपाळशी तर बऱ्याच ठिकाणी खुद्द भारताशी येऊन भिडल्यामुळे कित्येकदा कटकटीची परिस्थिती निर्माण झाली. अलीकडेच चौ एन लाय यांच्या निधनानंतर चीनमध्ये ज्या घडामोडी झाल्या त्या पाहता या दोन्ही देशांतील संबंध सुधारणेच्या मार्गावर जातील असे दिसते. विशेषत: भारताने चीनमध्ये कित्येक वर्षानंतर आपले वकील (अॅबॅसडर) नेमण्याचे जाहीर करून श्री. के. आर. नारायणन् या अनुभवी मुत्सद्याची या जागेवर नियुक्ति केल्याचे जाहीर केले हे ठीकच झाले. या घटनेवर गतवर्षीच नियुक्त झालेले नेपाळचे प्रधान मंत्री डॉ. तुळसी गिरी यांनी समाधान व्यक्त केले आहे. भारत व चीन यांच्यातील संबंध सुधारणे हे नेपाळच्या पथ्यावरच पडेल असे डॉ. गिरी म्हणाले. कारण नेपाळ हा चीनच्या काय किंवा भारताच्या काय बाजूने आहे असे जे वृत्तपत्रातून अधूनमधून निष्कर्ष प्रगट होतात त्यामुळे भारत-चीन संबंध सुधारण्यास अडथळा येतो

नव्या घटनेनें नेपाळची तटस्थ भूमिका उभय राष्ट्रांनाही योग्यशी वाटेल. आर्थिक, औद्योगिक व संरक्षण दृष्टचा दुर्बल असलेल्या नेपाळला या खेरीज अन्य भूमिका घेंऊन भागणार नाही.

खऱ्या अर्थाने परराष्ट्रीय धोरण नेपाळने १९५५ सालापासून अंगिकारले. राजे महेंद्र गादीवर आल्यापासून नेपाळचा स्वतंत्र राष्ट्र हा दर्जा उंचावला एवढेच,नव्हे तर त्याचे असे राजनैतिक धोरण प्रत्ययास येऊ लागले नेपाळमध्ये नवयुग सुरू झाले आणि गेल्या वीस वर्षात या चिमुकल्या देशाने आंतरराष्ट्रीय राजकारणातही मानाचा भाग घेतला. देशाची सर्वांगीण उन्नति व्हावी म्हणून राजे महेन्द्रांनी विशेष प्रयत्न केले. १९५५ च्या बांडुग परिषदेत नेपाळने भाग घेंतला व पंचशीलेंस आपली हार्दिक मान्यता दिली त्याच वर्षी नेपाळने चीनशी राजनैतिक संबंध प्रस्थापित केले व चीन आणि नेपाळ यांचेमधील सीमा निश्चित करणारा करार सन १९६१ मध्ये झाला. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात काठमांडूत बाहेरच्या चारपाच देशांचें प्रतिनिधींचे वास्तव्य असे पण आता चाळीसावर देशांशी राजनैतिक संबंध नेपाळनें जोडले असल्याने त्याच्या सुबत्तेतही भर पडली.

संयुक्त राष्ट्रसंघात नेपाळला सन १९५५ मध्ये प्रवेश मिळाला. या संघटनेत आपण संपूर्ण विश्वासाने येत आहोत अशी ग्वाहीही राजे महेन्द्रांनी त्यावेळी दिली. जगांतील लष्करी दृष्टचा सुसज्ज अशा कोणत्याही बलाढ्य गटांशी सामील न होणाऱ्या अलिप्त राष्ट्राची संघटना वाढत आहे हे सुचिन्हच होय. कै. जवाहरलाल नेहरू प्रभृति नेत्यांनी अशा अलिप्त राष्ट्रांच्या संघटनेचा . पोटतिडिकेने पुरस्कार केला. सुदैवाने या मतप्रणालीस चांगला पाठिंबा मिळत असून तिचे वजनही वाढत आहे. बेलग्रेड येथे अलिप्ततावादी राष्ट्रांच्या प्रतिनिधींची परिषद झाली तिला पंचवीस राष्ट्रांचे प्रतिनिधी आले होते तर अलीकडेच लुसाका येथे भरलेल्या परिषदेत ही संख्या साठापर्यंत गेली आहे. नेपाळ या संघटनेतच असल्याने अलिप्ततावादाचे फायदे त्याला साहजिकच मिळत आहेत.

भारताचे परराष्ट्रमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण व डॉ. तुलसी गिरी यांच्यात अलिकडेच ज्या वाटाघाटी झाल्या आणि खुद्द नेपाळांत श्री. चव्हाण यांनी नेपाळ नरेशांची मुलाखत घेऊन जी चर्चा केली त्यावरून मध्यंतरी उभय राष्ट्रांच्या संबंधात जी अभ्रे आली होती ती दूर झाली असल्याचे दिसते.

राजे महेंद्रांनी घालून दिलेले राजकीय प्रणालीनुरूप त्यांचे चिरंजीव राजे बिरेंद्र आपले धोरण चालवीत आहेत ही समाधानाची गोष्ट होय.

नेपाळच्या सध्याच्या राजनीतीचे योग्य दर्शन होण्यासही इतिहासाचाही थोडा मागोवा घेणे इष्ट. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्व काळात ब्रिटिशांनी नेपाळ जिंकण्याचा प्रयत्न केला पण सेनापती भीमसेन थापाच्या सावधपणाने अखेर त्यांनी तो नाद सोडून दिला. पहिल्या महायुद्धातील गुरखा फलटणीच्या कर्तबगारीवर खूष होऊन १९२३ साली ब्रिटिशांनी नेपाळशी तहनाम्यावर सह्या केल्या. नेपाळ हे स्वतंत्र सार्वभौम राष्ट्र असल्याचो या तहनाम्यात प्रथमच मान्यता मिळाली. तत्पूर्वीच्या काळात राजांनी इतर प्रमुख संस्थानांप्रमाणें ब्रिटिश राज्यकर्त्यांची खुशामत करून मिळेल ते पदरांत पाडून घेतले. राणाशाहीला ब्रिटिश राज्यसत्तेचा मोठाच आधार. राजे महेंद्रानी सत्तासूत्रे आपल्या हाती घेतल्यापासून परिस्थितीत क्रांतिकारक बदल झाला.

राजेमहेन्द्रांनी गादीवर येताच लोकशाही राज्यपद्धतीचा पुकार केला. पण बहुसंख्य नेपाळी जनता अशिक्षित असल्याने व लोकशाही-प्रयोग नवाच त्यामुळे तो यशस्वी झाला नाही. पंधरा वर्षात सतरा मंत्री मंडळे झाली आणि फ्रान्समधील अस्थिर मंत्रिमंडळांची पुनरावृत्ति दिसू लागली. राजकारणांत लांचलुचपतीचा समावेश मोठ्या प्रमाणावर होऊ लागला. अखेर राजेमहेन्द्रानी पुष्कळशी सत्ता आपल्या हाती घेऊन 'पंचायत अधिष्ठित लोकशाही' सुरू केली व तोच कित्ता त्यांचे चिरंजीव राजे बिरेंद्र गिरवीत आहेत. या पद्धतीत ग्रामीण

पंचायतींना बरीचशी सत्ता दिली असून मध्यवर्ती मंत्रीमंडळांत पक्षभेदास स्थान नाही. भारताच्या राज्यघटनेत सुधारणा करण्याचे प्रयत्न सध्या चालू आहेत. पक्षनिष्ठ लोकशाहीऐवजी जनताधिष्ठित लोकशाही अंमलात यावी असे कांही जाणत्यांचे म्हणणे आहे. आचार्य विनोबांना राज्यसत्तेचे विकेंद्रीकरण मान्य आहे. ग्रामराज्यांच्या पुरस्काराच्या दृष्टीने नेपाळच्या पंचायत लोकशाहीच्या प्रयोगाचा अभ्यास हितावह ठरावा.

अर्थकारण व उद्योगधंदे

नेपाळच्या राजकारणानंतर या देशाच्या अर्थकारणाकडे वळू या आपण. नेपाळने आर्थिक नियोजन अगीकारले असून स्वावलंबन व देशांतील अंतर्गत सामग्रीचा अधिकाधिक उपयोग यावर भर दिला आहे. नेपाळला जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी परदेशांतून विविध प्रकारचा माल आयात करावा लागतो हे तर खरेच पण हॉंगकॉंग, सिंगापूर याप्रमाणें काठमाडूंचा उपयोग डोईजड जकात चुकवून खुला व्यापार घडविण्याकडे केला जातो हे उघड गुपित आहे.

नेपाळने १९७३–७४ च्या आर्थिक वर्षात एकूण रु. १८,६३, ७४,००० चा माल आयात केला. त्याची वर्गवारी (रु. हजार): कापड ५६८,८१. मोटर-मोटर सायकली २,४३,८७ विमानाचे सुटे भाग १ ७१,०७. ट्रॅक्टर व सुटे भाग २५४० कचेरीसाठी सामान ८६,७१ तयार कपडे ४९.०८, टेलिफोनची सामग्री ४५.८६ पोलादी तक्ते व पत्रे रु. ४४.१८ खते ४१.५६ विद्युत सामान ३९.६५ मसाल्याचे सामान ३७.२९ औषधे इ. ३२,९८ रेडियो, टेपरेकॉर्डर, ट्रॅन्झिस्टर ३०,७८ शास्त्रीय उपकरणे २६,३४, सीमेंट २५,६६ इतर माल २,८५६४.

नेपाळ परदेशांना कोणता माल निर्यात करतो यासंबंधी पुढील तपशील बोधप्रद ठरेल. (आकडे हजार रु.) तागाचा माल ४,८९,५८ कच्चा ताग ४,३३,२१ कातडी १,१८,५९ कलाकुसरीच्या वस्तू ६९, ६८ दालचिनी ६२,६० औषधी वनस्पती ४५,४३, गालिचे ३७,५२

कस्तुरी ३३,०४ पेंड ३०,३५, डाळी २८,१६, सुंठ २३८.५७. ब्रशांचे केस इ. १७,८५ तयार कपडे १०,३० इतर माल ३,२२.८२ एकूण रु. १७,२२,८०

वरील आंकडयावरून दिसून येते की व्यापार संतुलन (Balance of Trade) नेंपाळला रु. १,४०,९४,००० नी प्रतिकूल आहे. साहजिकच हे आंकडे नोंद झालेल्या व्यापारी उलाढालींचे आहे. पुष्कळसा परदेशी माल काठमांडूचा बजारपेठेत अनधिकृत येतो व त्याची विक्रीही तस्करांकरवी होती, त्यासंबंधी न लिहिणेच बरे.

नेंपाळमध्यें ज्या परदेशातून मालाची आयात होते त्यांत पहिला क्रमांक लागतो जपानचा. ७,४९,४७,५१० रु. जपानी माल १९७३–७४ मध्ये नेपाळमध्ये आला. ज्या देशातून विशेष माल येतो ते येणे प्रमाणे :–हाँगकाँग, रु. २,३४,५२,२१३, द. कोरिआ १,३३,१३,८२४. चीन ७५,५४,५२४, सिंगापूर ५१,९२,१९७, पोलंड, २९,०० ६७७, स्वित्झलंड १५,८९,६०८ रशिया २४,०३,८५४ फेडरल रिपब्लीक जर्मनी ७५,७१८७२, इटली ४७,३१,१४४ युनायटेड किंगडम ९९, ३३,१७९ कॅनडा १,३१,५६,२७८, इत्यादी

' नेपाळ ओव्हरसीज ट्रेड स्टॅटिस्टिक्स ' या सरकारी अधिकृत पुस्तकांत नेपाळ आणि भारत यांच्या दरम्यान व्यापार व्यवहारासंबंधी काहीच उल्लेख व आकडे नाहीत याचे आश्चर्य वाटले.

नेपाळ औद्योगिक दृष्टया मागासलेला आहे. अलीकडेच वीरगंज वगैरे दक्षिण पट्टींतील शहरांतून साखर, सीमेंट, कागद, डिस्टिलरी इत्यादी उद्योग चालू करण्याचा उपक्रम झाला आहे. पण तसे म्हटले तर हे धंदे बाल्यावस्थेत आहेत.

परदेशांतून चोरटया पद्धतीने जो परदेशी माल नेपाळात आयात होतो व गुपचूप भारत वगैरे देशांत स्करांकरवी तशा मालाची विल्हेवाट होते या व्यवहारासंबंधी आंकडे अर्थात मिळत नसले तरी त्याचे स्वरूप फार मोठे. नेपाळच्या राज्यकर्त्यांना तशीच आसपासच्या देशांना ही मोठीच डोकेदुखी झाली. अलीकडेच उजेडात आलेला

प्रकार बानगीदाखल देत आहोत. तिबेटच्या सरहद्दी नजीक मानांग जिल्ह्यातील दहा रहिवाशांना सुमारे १७०० जपानी मनगटी घड्याळे चोरट्या रीतीनें आणल्याबद्दल त्रिभुवन विमान तळाच्या कस्टम अधिकाऱ्यांनी सात लाख रु. दंड ठोठावला. हा प्रकार २६ फेब्रु. १९७६ रोजी घडला. घड्याळांची किंमत सुमारे सहा लाख रु. वर होती. गुन्हेगारांपैकी चौघांना दंडाखेरीज सहा महिने कारावासाचीही शिक्षा झाली.

कित्येक मानांगी भूतियांना आयात परवानें नियमाप्रमाणे त्यांची लायकी नसतांनाही दिले जातात. त्यामुळे या स्वरूपाच्या घटना घडतात. नेपाळ व भारत यांच्या दरम्यान अलीकडेच ज्या वाटाघाटी झाल्या त्यांत लहानसहान व्यापाऱ्यांकडें पुरेसे परकीय चलन नसतांना त्याना आयात परवानें दिल्यामुळे काळ्या बाजारास प्रोत्साहन मिळते असे सांगण्यात आले.

भारत सरकार चोरट्या रीतींने भारतांत येणाऱ्या मालासंबंधी विशेष जागरूक असून ते गुन्हे पकडण्याकरतां खास 'कलेक्टोरेट' नेमण्यांत आले आहे. २८ जानेवारी १९७६ पर्यंत दोन हजारावर तस्कर पकडले असल्याचे राज्यसभेत श्री. प्रणव मुखर्जी यांनी सांगितले. दुरुस्त कायद्यान्वये अशा संशयितांना एक तें दोन वर्षं पर्यंत अडकवून ठेवण्याचा खास अधिकार आधिकाऱ्यांना मिळाला आहे.

भारत व नेपाळ या उभय राष्ट्रांत अलीकडेच उच्चस्तरीय राजकीय तसेच अर्थाविषय धोरणांसंबंधी वाटाघाटी झाल्या. त्यामुळे या उभय देशांत सामंजस्याची वाढ झालेली दिसते. चार वर्षानंतर भारताचे परराष्ट्रमंत्री नेपाळला भेट देण्यास गेले ही घटनाही बोलकीच म्हणावयाची. परराष्ट्रांच्या कारस्थानांनी काठमांडूत जाळी विणण्याचा काळ संपुष्टांत आला आणि राजे बिरेंद्र यांनी सुचविले त्याप्रमाणें नेपाळ हा 'शांततेचा टापू' समजला गेला तर देशादेशांतील वादांचे स्वरूप निश्चित बोथट होईल अशी आशा वाटते वरील पार्श्वंय भूमि लक्षांत घेतली तर भारताचे परराष्ट्रमंत्री श्री. यशवंतराव

चव्हाण व नेपाळचे परराष्ट्रमंत्री श्री. के. आर. आयल यांच्या भेटी-गांठीतून प्रत्यक्ष भरीव असे पुष्कळसे निघाले. नेपाळमध्ये हिमालयांत उगम पावलेल्या कित्येक नद्या पुढे मोठया होऊन बिहार, बंगाल, बांगला देश इ. राज्यांतून वाहात जाऊन समुद्राला मिळाल्या. खुद्द नेपाळला या नद्यांचा म्हणावा तितका उपयोग होत नाही. उलट बिहारमध्ये कोशीसारख्या नद्यांच्या महापुरांनी केव्हढी तरी आपत्ती उद्भवते. विद्युदुत्पादनही नेपाळमध्ये आजच्यापेक्षा जास्त होण्याची परिस्थिती आहे. पण ही नैसर्गिक संपत्ति योग्य मार्गाने कार्यवाहीत आणण्यास पुरेसे भांडवल, तंत्रज्ञान, इत्यादींची आवश्यकता आहे. भारत काही बाबतीत नेपाळला सहाय्य करील अशी अपेक्षा.

उभय राष्ट्रांतील व्यापाराबाबत पुढील काही व्यवस्था मान्य होईलसे दिसते. १ भारताने नेपाळकडून ५०,००० टन तांदूळ आपल्या चलनात खरेदी करावा. २ सरहद्दीवरील गोदामात शिलकी रिकामी जागा असेल तर भारताने नेपाळला त्याचा धान्याचा साठा तेथे ठेवण्यात अनुमति द्यावी ३ भारतातून नेपाळला निर्यात करण्यास सुमारे पन्नास प्रकारच्या धातूजन्य वस्तूंना मनाई आहे ती शिथील करणे. ४ परदेशात माल आयात करणारांना नेपाळ सरकार ‘ बोनस ’ देतें त्याचे प्रमाण कमी करणे, त्यामुळे भारताकडे होणाऱ्या चोरटया निर्यातीस आळा बसेल.

महाराष्ट्राबद्दल जिव्हाळा

नेपाळ विषयक प्रकरणाच्या सुरवातीलाच महाराष्ट्रीयांना नेपाळ-बद्दल विशेष आकर्षक वाटलेले आहे असा उल्लेख आहे. त्यासंबंधी अधिक विवेचन जिव्हाळयाचे वाटावे. पेशवाई संपुष्टात आली आणि १८५७ सालचा उठावही विफल झाला. त्या पडत्या काळात पेशव्यांच्या कुटुंबियांना लगतच्या स्वतंत्र हिंदू राज्यांत— नेपाळमध्ये— आधार लाभला. नेपाळ सरकारने स्वातंत्र्य संग्रामात अपयशी ठरलेल्या नाना-साहेबांना त्यांचे व अन्य पेशव्यांचे कुटुंबियांची सोय आपण करू असे आश्वासन दिल्याने नानासाहेबांचे तेवढेच ओझे कमी झाले. त्याप्रमाणे

नानासाहेबांची पत्नी कृष्णाबाई, बाजीरावाची भार्या सईबाई आपल्या दासी व लव्याजम्यासह नेपाळात आल्या. कालांतराने बागमती व रुद्र-मती या नद्यांच्या संगमावरील थापाथली या गावी सईबाईनें छानदार वाडा बांधला व तेथे या पेशव्यांच्या मानी महिला राहू लागल्या आपल्या बरोबरचे बरेचसे जवाहर नेपाळचे राणा जंगबहादूर यांना देऊन गोविंदपूर, सिसिया, धळगढा इ. आठ गावे त्या मोबदल्याने विकत घेतली.

नेंपाळात सईबाईची प्रतिमा उज्ज्वल अशीच दिसली. बाजीरावांच्या मृत्युनंतर सोवळचा झालेल्या या गौरकाय, देखण्या, पुरंध्रीस नेपाळीं जनता महाराणी म्हणून मान देत. भारतातून एक प्रकारे निर्वासित झालेंली ही मंडळी या देशात आपल्या राजतेजानें उठून दिसत होती. व्रतवैकल्य, देवधर्म व शिस्तबद्ध जीवन यांनी सई-बाईची दिनचर्या आखलेंली असे, आणि परदेशात एक छोटेसे संस्थानच त्या स्वतंत्रपणे चालवींत होत्या असे म्हणावयास हरकत नाही. सईबाईची सून कृष्णाबाई सासूबरोबर वाड्यांत राही. ती उंचीला सासूपेक्षा कमीं होती. उभयतांना नेपाळ सरकारातून दरमहा रु. ८०० व रु. ४०० असा तनखा मिळे.

पेशव्यांची व मराठेशाहीची स्मृति सईबाईंनी अखंड जागृत ठेवली होती. खुद्द पेशव्यांची गादीं त्यांनी आपल्या बरोबर आणली होती व वाड्याचे तिसऱ्या मजल्यावर खास खोलीत तिची प्रतिष्ठापना केली होती. गादीलगत रोज रात्री फराळाचे ताट व पाण्याचा तांब्या तेथे ठेवला जाई–तसेच समई, धूप वगैरे लावून त्या जागेचे पावित्र्य राखले जाई. या खोलीत इतरेजनांना मज्जाव होता.

सईबाईने राणीगंज येथें हनुमानाचे व थापाथली येथे लक्ष्मी-नारायणाचे मंदिर बांधले. लक्ष्मीनारायणाचे मंदिर पेशव्यांचे वाड्याचे दक्षिणेस फुलबागेंत उभारण्यात आले असून त्याची एकंदर उभारणी

पुण्यातील पेशवाई कालीन मंदिराप्रमाणें आहें. देवळाची लांबी ३८ फूट व रुंदी १८ फूट अशी भव्य आहे. लक्ष्मीनारायणाच्या मूर्ती जयपुरी पांढऱ्या दगडाच्या मोठ्या देखण्या आहेत.–ब्रह्मावर्ती जन्मलेंल्या रामराव नांवाचे ब्राह्मणाकडे हे देऊळ उभारण्याची जबाबदारी टाकण्यांत आली व त्याने ते काम उत्तम रीतीने बजावलो. माघ शुद्ध १३ शके १८१४ रोजी देवळात मूर्ती, स्थापिल्याचा शिला लेख आहे. रा. सा. ना. गो. चापेकर यांनीं 'हिमालयात' त्या पुस्तकांत या मंदिरासंबंधी विस्तृत तपशील दिला आहे तो जिज्ञासूंनी पहावा. मंदिरांत संस्कृत नेपाळी व मराठीं अशा तीन भाषांत शिलालेख आहेत. मराठीतील शिलालेख दोनच पंक्तींचा असल्यामुळें तेवढाच येथे देतो :–

श्रीमंत बाजीरावांच्या राणीने केंली स्थापना खासी ।
नारायण लक्ष्मीची शोभे द्वारावतीच की जैसी ।।

लक्ष्मीनारायण मंदिराच्या स्थापनेनंतर तीन वर्षातच श्री सईबाई शके १८१७ मध्ये कालवश झाल्या साठीच्या आतच त्यांना मृत्यूने गाळले. पशुपतिनाथानजीकचे आर्याघाटावर त्यांच्या पार्थिव देहास मंत्राग्नी देयांत आला आणि येंथेंच नेपाळ आणि महाराष्ट्र यांच्या तील हा वैशिष्टयपूर्ण दुवा तुटला.

शेवटी 'नेपाळ' या नावाची पूर्वपीठीका काय असा प्रश्न सहज सुचण्यासारखा. अतिप्राचीनकाळी 'गोपाळ' घराण्याचा मूळ पुरुष 'ने' नावाच्या मुनीने हे राज्य रमापले म्हणून ते पुढे नेपाळ या नावाने ख्यात झाले. नेपाळविषयी लिहिण्यासारखे पुष्कळच आहे पण नियोनित पृष्ठ मर्यादेकडे लक्ष देऊन तो लोभ सोडावा लागत आहे.

उपसंहार-आभार

प्रस्तुत पुस्तकांतील पुष्कळसा भाग लेखांतून प्रसिद्ध केला तेव्हांच वाचकांनी हे साहित्य ग्रंथरूपाने प्रगट व्हावे असा आग्रह व्यक्त केला, आणि त्या दृष्टीने आणखी कांही सुधारणा करून व एक दोन नवीन

प्रकरणे घालून ' हिमालयांतील देवांची तपोभूमी ' प्रसिद्ध होत आहे. हे साहित्य लिहितांना सुविद्य वाचकांच्या प्रमाणे बहुसंख्य श्रद्धावान यात्रिकांच्या अपेक्षेकडेही लक्ष दिले आहे. आपले धार्मिक संस्कार ' श्रुतिस्मृतिपुरोणोक्त फलप्राप्त्यर्थम् ' संपन्न होतात म्हणून पुस्तकांत इष्ट ते दाखले मूळ संस्कृतांतून दिले आहेत. वाचकांना सोपे संस्कृत कळण्यासारखे, व पुन्हा भाषांतर दिल्यास विस्ताराचे भय म्हणून त्याचो भर केली नाही.

स्वतंत्र निरीक्षण व संशोधन याशिवाय उद्दिष्ट विषयांवर शक्य ते वाङमय अभ्यासण्याचा माझा कल असल्यामुळे त्या त्या लेखकांच्या अप्रत्यक्ष ऋणाचा उल्लेख प्रांजलपणे करायलाच हवा. माझे जेष्ठ स्नेही विद्यानिधि डॉ. सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांनी विनंति करतांच अल्पावधीत मार्मिक प्रस्तावना लिहून दिली, याबद्दल त्यांना हार्दिक धन्यवाद. श्री. गो. नी. दांडेकर यांच्या सिद्ध हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले त्यामुळे दुधांस साखर लाभली. या पुस्तकाचो मुद्रिते वैयाकरणी दृष्टीतून तपासण्याची कामगिरी मित्रवर्य डॉ. सुरेश लद्द यांनी केली याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. ' ऋषिकेश ' या क्षेत्राच्या नावासंबंधी व व्युत्पति- विषयी मतभेद आढळतात. मला व्यक्तिशः ' हृषीकेश ' हेनाव जास्त अभिप्रेत असता नाही पुस्तकांत, ' ऋषिकेश ' हा शब्द ठेवून दिला आहे. एकतर सरकार दप्तरीं व रेल्वेत हेच नाव रूढ तसेच बऱ्याच उत्तरभारतीय लेखकांनी ' ऋषि ' पासून या क्षेत्राचे नांव आल्याचा निर्वाळा दिला आहे. शेवटी ' शास्त्रात रूढिर्बलीयसी ' या न्यायाने मीही या रूढ नावास मान तुकावली. आहे.

या पुस्तकात वापरण्यासाठी श्री. द. दि. कुलकर्णी यांनी सौजन्याने पाच सहा ब्लॉक्स दिले त्यामुळे त्याच्या आकर्षकतेत भर पडली. उत्तराखंड आणि नेपाळ या संयुक्त यात्रा सहतीची सोय श्री. चंडिका यात्रा कंपनीने प्रथमच चालू केल्यामुळे विस्तृत हिमालयदर्शनाची चांगली संधी मिळाली.

श्रीकृष्णार्पणमस्तु

'शीघ्र साहित्य रत्न' श्री. ना. तु. ठाकूर



श्री. नानासाहेब ठाकूर हे 'ना. तु. बाग' 'जपान व अतिपुर्वेकडील देश' इ. वाङ्मयीन कृतीमुळे वाचकांना सुपरिचित आहेत. नगाधिराज हिमालयाच्या कुशीतील पवित्र स्थानांचे या पुस्तकातील वर्णन श्री. ठाकूर यांच्या संशोधनात्मक सौंदर्य दृष्टीच्या प्रचीतीचे बोल.

डॉ.विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव प्रस्तावनेत लिहितात: श्री. ठाकूर वर्तमानपत्राच्या व्यवसायात असल्याने लोकांना काय सांगावे व थोडक्यात कसे सांगावे याचा त्यांना उत्तम सराव आहे. हे पुस्तक वाचल्याने हिमालयांतील महत्त्वाच्या तीर्थ क्षेत्रांची प्रत्यक्ष यात्रा केल्याची अनुभूति मिळेल अशी माझी खात्री आहे. आमची यात्रा संस्था जागृत असून तिची सेवा करण्याचे महत्त्वाचे राष्ट्रीय कार्य हे पुस्तक लिहून श्री. ठाकूर यांनी केले याबद्दल धन्यवाद.

श्री. चंद्रकांत चंद्रात्रे, एम्. ए. अनाहूत खुशीपत्रांत म्हणतात :

हे साहित्य माहितीच्या दृष्टीने अप्रतिम वाटते. त्या त्या क्षेत्रांची अवांतर पौराणिक माहिती संस्कृत श्लोकांच्या आधाराने दिल्याने पुस्तकाचे महत्त्व वाढले आहे.